शुक्रवार, २६ मे २०२३

किंमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)

मराठी दैनिक

वर्ष - ०२ अंक -२५७

आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

● MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ● FRIDAY 26 MAY 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-257 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-12 ● PRICE-5


# नाथसागरातून संभाजीनगरला १५ जुलैपर्यंत पाणीपुरवठा करा

## भागवत कराड : शहरवासीयांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न आता लवकरच सुटणार



आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** गेल्या कित्येक वर्षांपासून छत्रपती संभाजीनगरवासीयांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न आता लवकरच सुटणार असून यासाठी पाणी पुरवठा जॅकवेलच्या कामाची गुरवारी केंद्रीय वित्त राज्यमंत्री डॉ. भागवत कराड यांनी पाहणी केली. शहराला सध्या आठ दिवसात पिण्याचे पाणी मिळते ते आता लवकरच रोज पाणी देण्याचा प्रयत्न राहील, छत्रपती संभाजीनगरला पाणी पुरवठ्यासाठी आठशे कोटी खर्चून पैठण येथील नाथसागर धरणातून जॅकवेलच्या माध्यमातून काम सुरू आहे. परंतु हे काम धिमे गतीने सुरू होते. त्याच पाणी पुरवठा योजनेची डॉ.कराड यांनी पाहणी केली, आजपर्यंत फक्त दहा टक्केच काम पुर्ण झाले असून येत्या पधंरा जुलैपर्यंत काम करा, असे आदेश देऊन या कामात हायगय केल्यास दर दिवसाला दंड आकारा, अशा सूचना अधिकाऱ्यांना दिल्या. तसेच या कामासाठी शासन स्तरावर निधीची कमतरता कमी पडू देणार नसून डिसेंबर २०२४ पर्यंत काम पूर्ण होईल व छत्रपती संभाजीनगरचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मिटेल. यावेळी भारतीय जनता पार्टी पैठणच्या वतीने केंद्रीय वित्तमंत्री डॉ. भागवत कराड यांचे नगराध्यक्ष सुरज लोळगे यांनी स्वागत केले. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे मुख्य अभियंता मधुकर पाटील, कार्यकारी अभियंता राम लोलापूर, दिपक कोळी जेव्हिपीआर कंपनीचे प्रकाश आवधुते, संजीव शर्मा, शहराध्यक्ष शेखर पाटील, भाजपा महिला आघाडी प्रदेश सरचिटणीस रेखा कुलकर्णी, विशाल पोहेकर, माजी नगरसेवक बंडू आंधळे, एकनाथ जाधव, प्रशांत आव्हाड, गणेश भोकरे, संकेत सुर्यनारायण, शिवनाथ सोनवणे, सतिष दहिहांडे, गणेश नाटकर, दीपक हानवते आदींची उपस्थिती होती.

महत्वाची बातमी

# महाराष्ट्र सदनात स्वामी रामानंद तीर्थ यांचा पुतळा उभारावा

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** मराठवाडा मुक्तीसंग्रामाचे अमृत महोत्सवी वर्ष संपायला आले तरी सरकार हे अमृत महोत्सवी वर्ष साजरे करण्यासंदर्भात गंभीर नाही. मराठवाडा आणि मराठवाड्याच्या अमृत महोत्सवी वर्षाविषयी सरकारची अनास्था आहे. या कार्यक्रमासाठी ७५ कोटी रुपयांचा निधी मंजूर असूनही मंत्रीमंडळ उपसमितीने अद्यापी कार्यक्रम आराखड्यास मंजूरीच दिलेली नाही, ही बाब अत्यंत गंभीर आहे. मराठवाडा मुक्तीसंग्रामाच्या निमित्ताने राज्यस्तरीय कार्यक्रमांचे तातडीने आयोजन करण्याबरोबरच या वर्षापासून दरवर्षी मंत्रालय तसेच विधानभवनात दरवर्षी ध्वजारोहणाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे. येत्या पावसाळी अधिवेशनात मराठवाडा अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त दोन्ही सभागृहात दोन दिवस चर्चा करण्यात यावी. तसेच दिल्लीतील महाराष्ट्र सदनात स्वामी रामानंद तीर्थ यांचा पुर्णाकृती पुतळा उभारण्याची मागणी विधानसभेचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना दिलेल्या पत्राद्वारे केली आहे.
सप्टेंबर महिन्यात मराठवाडा मुक्तीसंग्रामाचा अमृत महोत्सवी वर्ष सुरु झाले आहे. हे अमृत महोत्सवी वर्षे साजरे करण्याविषयी सरकारकडून कोणत्याही हालचाली दिसत नाहीत, सरकारला मराठवाडा आणि मराठवाडा मुक्तीसंग्रामाच्या अमृत महोत्सवाविषयी अनास्था आहे. मराठवाडा मुक्ती संग्रामाचे हे अमृतमहोत्सवी वर्ष आहे. गेल्या वर्षी सप्टेंबर महिन्यात या अमृत महोत्सवी वर्षाची सुरुवात झाली. आता हे वर्ष संपायला आले आहे. मराठवाड्याची अस्मिता राष्ट्रीयस्तरावर जागृत करणारी ऐतिहासिक अभ्यासपूर्ण माहिती संपूर्ण देशाला समजण्यासाठी तसेच मराठवाडा मुक्ती संग्रामाचा अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त राज्यस्तरीय कार्यक्रम घेणेबाबत विधीमंडळात चर्चा झाली होती. याविषयी शासनस्तरावर कोणतीही कार्यवाही झालेली नाही याबाबत अजित पवार यांनी पत्रात नाराजी व्यक्त केली आहे.

# दिल्लीच्या लोकांवर अन्याय

## अरविंद केजरीवाल : शरद पवार यांच्या भेटीत भाजपविरोधात आखली रणनीती

आधुनिक केसरी न्यूज

नवी दिल्ली : दिल्लीचे मुख्यमंत्री आणि आम आदमी पक्षाचे प्रमुख अरविंद केजरीवाल यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांची गुरुवारी मुंबईत वाय. बी. सेंटरमध्ये भेट घेतली. याआधी बुधवारी अरविंद केजरीवाल यांनी ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांचीही भेट घेतली. यावेळी केंद्र सरकारने दिल्ली सरकारला अधिकार बहाल करणारा सर्वोच्च न्यायालयाचा निकाल डावलून अध्यादेश काढत दिल्लीच्या नायब राज्यपालांना प्रशासनावरचे अधिकार बहाल केले. यावरून वाद सुरू झाला असून त्यासंदर्भात केजरीवाल यांनी काल उद्धव ठाकरे आणि गुरुवारी शरद पवार यांची भेट घेतली.



यावेळी उद्धव ठाकरेंप्रमाणेच शरद पवारांनीही दिल्लीबाबत केंद्र सरकारने घेतलेल्या भूमिकेवर तीव्र आक्षेप घेतला. यासंदर्भात भूमिका मांडताना केजरीवाल यांनी केंद्र सरकारकडून कशा प्रकारे विरोधी पक्षाच्या सरकारांना काम करू दिले जात नाही, यासंदर्भात गंभीर आरोप केला. दिल्लीच्या लोकांबरोबर खूप अन्याय झालाय. २३ मे रोजी एका साध्या अधिसूचनेनुसार अधिकाऱ्यांवर नियंत्रण ठेवण्याचे सगळे अधिकार केंद्र सरकारने हिसकावून घेतले, असे अरविंद केजरीवाल यावेळी म्हणाले. सर्वोच्च न्यायालयाने पूर्ण आदेश दिल्लीच्या बाजूने दिले. सरकारचा अधिकार मान्य केला. १२ मे रोजी न्यायालयाचा निकाल आला. १९ मे रोजी आठ दिवसांत केंद्राने पुन्हा अध्यादेश काढून सर्व अधिकार नायब राज्यपालांकडे असतील असे सांगितले. आता हे विधेयकाच्या रुपात संसदेत येणार आहे. त्यामुळे आम्ही प्रत्येक पक्षाकडे जाऊन या विधेयकाविरोधात एकमत करण्याचा प्रयत्न करतोय, असे केजरीवाल म्हणाले. शरद पवारांनी आम्हाला आश्वासन दिलंय की राज्यसभेत हे विधेयक पारित होऊ देणार नाही. त्यामुळे बिगर भाजपा पक्ष एकत्र आले तर हे विधेयक नामंजूर होऊ शकते. हा फक्त दिल्लीच्या लोकांचा लढा नसून हा संपूर्ण संघराज्य व्यवस्थेलाच धक्का आहे, असे ते म्हणाले. बिगर भाजपा सरकार एखाद्या राज्यात आले तर भाजपाचे केंद्र सरकार तीन गोष्टी करते, असे म्हणत अरविंद केजरीवाल यांनी भाजपाच्या रणनीतीवर गंभीर आरोप केले. अरविंद केजरीवाल म्हणाले एकतर विरोधी पक्षाच्या सरकारमधील आमदारांना खरेदी करून भाजपा ते सरकार पाडते आणि स्वतःचे सरकार तयार करते. दुसरे, ईडी-सीबीआयला पाठवून विरोधी पक्षाच्या सरकारमधील आमदारांना धमकावून पक्षात फूट पाडून सरकार पाडते आणि आपले सरकार बनवते. तिसरे आमदार विकले किंवा घाबरले नाही तर राज्यपालांकरवी अध्यादेश आणून त्या सरकारला काम करू दिले जात नाही. ही देशासाठी धोकादायक स्थिती आहे. महाराष्ट्रातली जनता तर यामुळेच पीडित आहे. काही महिन्यांपूर्वी इथे ईडी-सीबीआयकरवी आमदारांना फोडून सरकार पाडण्यात आलं. ही देशासाठी चांगली स्थिती नाही. आम्ही यासाठी देशातल्या सर्व विरोधी पक्षांना या विधेयकाविरोधात आम्ही एकत्र करण्याचा प्रयत्न करत आहोत, असे अरविंद केजरीवाल यांनी नमूद केले.

# पोलीस भरतीची चौकशी करा : पटोले

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** पोलीस दलात भरती होण्याचे स्वप्न बाळगणाऱ्या राज्यातील हजारो मुला-मुलींसाठी मुंबईतील ७ मे २०२३ रोजीची पोलीस भरती परीक्षा ही एक मोठी संधी होती. परंतु या पोलीस भरतीमध्ये अनुचित प्रकार झाल्याचे उघड झाले आहे. या परीक्षेत मोठ्या प्रमाणात हायटेक कॉपी करण्यात आली. कमी मार्क असलेल्या मुलांना पात्र ठरवण्यात आले, यासह भरतीसाठी मुलांकडून १५-१५ लाख रुपये घेण्यात आल्याच्या असंख्य तक्रारी आहेत. या प्रकरणात मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांनी लक्ष घालून पोलीस भरती प्रक्रिया स्थगित करावी व नव्याने पारदर्शक पद्धतीने फेरपरिक्षा घ्यावी अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे. पोलीस भरती प्रक्रियेतील घोटाळ्यासंदर्भात राज्यातील विविध भागातून आलेल्या मुला-मुलींनी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांची पक्षकार्यालय टिळक भवन येथे भेट घेऊन या परिक्षेत झालेल्या घोटाळ्याची माहिती दिली. यानंतर काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी पोलीस महासंचालकांशी दूरध्वनीद्वारे संवाद साधून सर्व प्रकार त्यांना सांगितला व कारवाई करण्याची मागणी केली. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनाही पत्र पाठवले आहे. या पत्रात पुढे असे म्हटले आहे की, पोलीस भरती प्रक्रियेत जास्त मार्क असलेल्यांना वगळून कमी मार्क्स मिळालेल्या मुलांना भरती करून घेण्यात आले आहे. शारिरिक चाचणीमध्येही पैसे घेऊन गुण वाढवण्यात आले, शारिरिक चाचणीत पात्र असणाऱ्या विद्यार्थ्यांना लेखी परीक्षेपासून वंचित ठेवण्यात आले.


महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई

कै. नारायणराव उजळंबकर वाचनालय, सिडको एन-४, छत्रपती संभाजीनगर

यांच्या संयुक्त विद्यमाने

स्व. मोहनलालजी बियाणी (काकाजी)

दै. मराठवाडा साथीचे संस्थापक संपादक यांच्या स्मृती प्रित्यर्थ



स्व. मोहनलालजी बियाणी (काकाजी)

व्याख्याते



सुधीर कोर्टीकर

ज्येष्ठ कलावंत, नाणे व टपाल तिकिट संग्राहक

उद्घाटक



सौ. सुनीता पाठक

सेवानिवृत्त प्राचार्या


मासिक व्याख्यानमाला

विषय : 'कला, गुण, छंदाचे महत्त्व'

तसेच दुर्मीळ नाण्यांचे, टपाल तिकिटांचे प्रदर्शन

पुष्प दहावे

स्थळ :कै.नारायणराव उजळंबकर वाचनालय, सिडको, एन-४ छत्रपती संभाजीनगर, दि. शुक्रवार, दि. २६ मे रोजी सायं. ५.३० वाजता





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

चेहऱ्याच्या स्नायूंना व्यायाम मिळून चेहरा प्रसन्न दिसतो. हृदय, फुफ्फुसानाही अधिक प्राणवायू मिळतो, व्यायाम होतो. असं म्हणतात की चालणाऱ्याचं नशीब चालतं, बसणाऱ्याचं नशीब बसून राहतं. त्याच धर्तीवर हसणाऱ्याचं नशीबही हसतं, रडणाऱ्याचं नशीबही रडतं असं म्हणायला हरकत नाही. हसतमुख असणारी माणसं संकटांना अधिक चांगल्या प्रकारे सामोरे जाऊ शकतात. नॉर्मन कझिन्स या नावाचा एक पत्रकार होता. तो एका दुर्धर आजाराने बिछान्याला खिळून होता. रुग्णालयात त्याच्यावर अनेक प्रकारचे उपचार सुरु होते. अनेक प्रकारची वेदनाशामक औषधें घ्यावी लागत होती. त्याशिवाय त्याला झोप लागत नव्हती. एक दिवस त्याने चार्ली चॅप्लिनचा चित्रपट बघितला. तो खळखळून हसला. त्याला असे आढळून आले की त्या दिवशी त्याला वेदनाशामक औषधांशिवाय झोप लागली. मग त्याने विनोदी साहित्य वाचायला सुरुवात केली. औषधोपचारांच्या जोडीला रोज तो खळखळून हसू लागला आणि काय आश्चर्य ! काही दिवसांनी तो पूर्ववत बरा झाला. त्याची वेदनाशामक औषधे थांबली. तो पूर्ववत सगळी कामे करू लागला. आपल्या अनाटॉमी ऑफ इलनेस या पुस्तकात त्याने ही सगळी माहिती लिहून ठेवली आहे. त्याला असे आढळून आले की आपण जेव्हा हसतो तेव्हा आपल्या शरीरात एन्डॉर्फिन नावाचा एक स्त्राव स्त्रवतो. हे एन्डॉर्फिन वेदना शांत करण्याचे कार्य करते. मनाची मरगळ दूर करते आणि आपल्याला ताजेतवाने वाटते. खळखळून हसण्याने रक्तदाब आणि रक्तातील कोलेस्टेरॉलचे प्रमाण कमी होते. शरीरातील अँटीबॉडीजचे प्रमाण वाढते. प्रख्यात मानसशास्त्रज्ञ डॉ सिगमंड फ्राईड यांनीही हसण्याचे फायदे सांगताना हसण्यामुळे मनातील राग, द्वेष, ताण तणाव यासारख्या नकारात्मक भावना नष्ट होतात असे म्हटले आहे. हसण्याबद्दल लिहिताना नॉर्मन कझिन्स म्हणतो, 'हसणं हे एखाद्या ब्लॉकिंग एजंटसारखं आहे. ते जणू बुलेटप्रूफ जाकीट आहे. नकारात्मक भावनांपासून ते तुमचं रक्षण करतं.' विनोदी चित्रपट, विनोदी नाटके यांना लोकांची कायमच पसंती असते ती यामुळेच. तास दोन तास खळखळून हसल्याने मनातली मरगळ निघून जाते, नकारात्मक भावनांचा निचरा होतो आणि आपल्याला प्रसन्न वाटू लागते. पु ल देशपांडे, आचार्य अत्रे, मार्क ट्वेन यांच्यासारख्या लेखकांचे विनोदी साहित्य म्हणजे अक्षय आनंदाचा ठेवा आहे. मधुकर तोरडमल हे विलक्षण ताकदीचे कलाकार होते. त्यांच्या 'तरुण तुर्क म्हातारे अर्क' या नाटकातील 'ह हा हि ही' ची बाराखडी कमालीची मजा आणते. त्यातून वेगळा विनोद, वेगळा अर्थ निर्माण होतो.



## आनंदी पहाट

# अनुकरण कोणाचे करावे ह्याचे भान हवे

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

लहापणापासून आपल्या बालमनावर मित्र परिवारातील प्रत्येकाचा कमी-अधिक प्रमाणांत चांगला-वाईट परिणाम होत असतो. अनकेदा आपल्या अनुकरणप्रिय मनाला मित्रमंडळीत सतत राहून त्यांचे अनुकरण करायची सवय जडलेली असते. आपण ज्या परिसरांत, वातावरणांत वावरत असतो, त्याचा थेट परिणाम आपल्या अंतर्मनावर होत असतो. आपल्या सोबत्यांचा आपल्या कार्यावर, व्यक्तिमत्वावर, वागण्या-बोलण्यावर, व्यवहारावर आणि चैतन्यावर प्रखर प्रभाव पडत असतो. म्हणून आपल्या सभोवती सुस्वभावी, धार्मिक, उच्च स्तरावर जागृत मनोवृत्तीचे लोक असणे महत्वाचे असते. जशी आपली संगति, तशी आपली मनोवृत्ती, ही बाबही तितकीच महत्वाची आहे. आपण आपल्या सोबत्यांची निवड विवेकपूर्वक करत असल्याची आपल्याला जाणीव होणे जरुरीचे असते. कारण, आपली संगत आपल्यावर वाईट प्रभाव पाडू शकते, ह्याचे विस्मरण होऊन चालणार नाही. जगण्यापलीकडचे जीवन जगताना संगत ही खूप महत्वाची बाब असते. जीवनात यशस्वी होण्यासाठी जशी उच्च शिक्षणाची गरज असते, तशीच प्रत्येक व्यक्तीला चांगल्या संगतीची सुद्धा गरज असते, हे प्रत्येक व्यक्तीने कधीही विसरून चालणार नाही. प्रत्येक व्यक्तीची ओळख त्या व्यक्तीच्या मित्रांवरून होत असते. जगात सुष्ट-दुष्ट, चांगली-वाईट, जवळची- लांबची, आपली-परकी अशी माणसे असतातच. समविचारी माणसांची आपापसांत मैत्री लवकर होत असते. वाईट संगतीत वाईट गुण आपल्यात येण्यास वेळ लागत नाही. श्रेष्ठ व्यक्तीच्या सहवासात सामान्य माणूस आला तरी त्याचा कायापालट होतो. परीसाच्या संगतीत लोखंड आल्यावर त्याचे सोने होते. त्यासाठी संगतीचा परिणाम विपरीत ठरू नये, हेही लक्षात घ्यावे.



आधुनिक केसरी

**हाचि सत्यानंद | पांडुरंग ||**
समचरण हे | विटेवरी दिसे ||
अंतरात वसे | शांतभाव||१||
जन्मोजन्मी होता | भूकेला हा जीव ||
तृप्त झाला भाव | संतांसंगे ||२||
वेदना अपार | संसारी पाशात ||
विकारी वेशात | मारेकरी ||३||
क्षणोक्षणी तुझे | करता स्मरण ||
सापडले धन | कुबेराचे ||४||
कळो आला मज | आनंदाचा कंद ||
हाचि सत्यानंद | पांडुरंग ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण


आधुनिक केसरी



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

**मन्दस्मितां चिदानन्दां
सदानन्दां शुभां शिवाम्|
तापत्रयविनाशाय दुर्गां देवीं नमाम्यहम्||
९|| मंदस्मित करणाऱ्या, चिदानंदस्वरूप असणाऱ्या शुभेला, शिवेला, दुर्गा देवीला मी तीनही तापांच्या नाशासाठी नमन करतो.**

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

**जो सुख पूर्वहिं भोगिया, सुखन ज्ञान जेहि माहिं । स्मरण देखि ता लोभिया, राग कहत हौं ताहिं ।।२४७।। जो जो दुख जिसमें भयो, पूर्व काल ही माहिं । रोष साधन स्मरण में, द्वेष कहैं बुधि ताहिं ।।२४८।।(स्वर्वेद षष्ठ मण्डल षष्ठ अध्याय) ०६/०६/२४७, २४८**

**मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :**

जे सुख पूर्वी अनुभवास आलं , ज्या पदार्थांच्या प्राप्तिमुळे सुखाचा बोध झाला, त्यांना बघून अथवा स्मरण करून त्यांच्याप्रति जे आकर्षण निर्माण होते, त्यास राग म्हणजेच आसक्ती म्हटलं जातं. ज्या-ज्या पदार्थां पासून अथवा व्यक्तीं पासून पूर्वी दु:खाचा अनुभव झाला, त्यांच्या स्मरणाने जो क्रोध उत्पन्न होतो, विद्वान त्यास द्वेष असे म्हणतात.

**संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सॲप करा ८५५४८८३१६६.**

## सुक्ष्म आशंकानिरूपण

आधुनिक केसरी




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

आपण आतापर्यंत अभ्यासले की केवळ ज्ञानमय व शक्तमय चैतन्यास देव किंवा परमेश्वर म्हणतात. आताआपण पुढच्या ओवीकडे वळूयात. अठराव्या ओळीत समर्थ म्हणतात"या विश्वमध्ये ज्या अगणित शक्ति सुक्ष्म व चैतंन्यरूपाने वावरत आहेत त्यासर्व मुळमायेचे कारण आहेत. पण ते समजण्यासाठी सिध्दपुरूषाची गरज असते. कारण तात्विक अधिष्ठान असल्याशिवाय मायेचा विस्तार कळणार नाही. म्हणून सर्थ म्हणतात की मूळमाया व मूळपुरूष एकच समजावे. तोच आपल्या समस्त प्राणीमात्राचा नियंता जगदीश, स्वामी, ईश्वर,परमात्मा आहे. आपण पहातो की या विश्वामध्ये सर्वत्र मायेचा पसारा भरलेला आहे. पण तो सर्वस्वी खरा नाही. जो खोल व सुक्ष्म अर्थ आहे तो जाणणारा क्वचितच सापडेल. या मायेला अनिर्वाच्य म्हणतात. अनिर्वाच्य हा शब्द समजावून देता येत नाही, तो स्वानुभवाने जाणावा लागतो. सतत संतसंगतीत राहिल्या स त्याचे मनापासून आकलन केल्यास संतसाहित्याची विचारधारा मनामध्ये पक्की केल्यास मुळमाया ही अगदीच साधीसोपी वाटते.

# साधनात अत्यंत सावधगिरी पाहिजे

आधुनिक केसरी

शेताची मशागत झाली, बी उत्तम पेरले, पाऊस चांगला पडला, आणि रोपही जोराने वर आले, तरी काम झाले असे नाही. कारण जसजशी एकेक पायरी पुढे जाईल तसतशी जास्त काळजी घेण्याची गरज असते. शेत वाढले तरी त्याचा नाश दोन कारणांनी होऊ शकतो; एक म्हणजे गुरेढोरे शेतात घुसून नाश करतील, किंवा दुसरे म्हणजे कीड पडून किंवा टोळधाडीसारखा काही उपद्रव होऊन शेत साफ नाहीसे होईल. यांपैकी पहिले कारण थोडे स्थूल आहे, तर दुसरे थोडे सूक्ष्म आहे. शेतात गुरेढोरे शिरली तर वरवर दृष्टी टाकूनही सहज समजते, आणि त्यांना हाकलताही येते. पण कीड पडली तर जवळ जाऊन बारकाईने पाहावे लागेल. शेताला कुंपण घालून ढोरे आत शिरणार नाहीत असा बंदोबस्त करता येतो, आणि राख, शेण, औषधे वगैरे टाकून, कीड न लागेल अशी तजवीज करता येते. हे सर्व करताना शेतकऱ्याला सतत जागृत राहावे लागते. म्हणजेच, एकसारखे शेतावर लक्ष ठेवावे लागते, हाच नियम परमार्थांतही लागू पडतो. साधकाने अत्यंत काळजीने वागणे जरूर आहे. शेताचे रक्षण व्हावे म्हणून जसे



कुंपण, तसा संसार हा परमार्थाला कुंपण म्हणून असावा. कुंपणालाच जर खतपाणी मिळाले तर कुंपणच शेत खाऊन टाकते. तसे न होईल इतक्या बेताने संसाराला खतपाणी घालावे. शेताला कीड लागली की काय हे जसे बारकाईने पाहावे लागते, त्याप्रमाणे आपली वृत्ती कुठे गुंतते की काय याकडे बारकाईने लक्ष असावे. अशा सावधगिरीने वागले तर पीक हातात येईपर्यंतचे काम झाले. पण 'पीक हातात आले, आता काय काळजीचे कारण ?' असे म्हणून भागणार नाही. पीक हातात आले तरी त्याची झोडणी झाली पाहिजे. पुढे, दाणे दास्तानांत जपून ठेवले पाहिजेत; नाहीतर उंदीर, घुशी धान्य फस्त करतील. नंतर पुढे, जरूर लागेल तेव्हा ते कांडले पाहिजे. कांडतानासुद्धा दाणा फुटणार नाही इतक्या बेताने ते कांडले पाहिजे. अशा तऱ्हेने, आरंभापासून शेवटपर्यंत अगदी जागरूकतेने वागले पाहिजे, तरच साधकाची शेवटपर्यंत तग लागेल. नाहीतर मध्येच निष्काळजीपणामुळे, आणि सर्व काही हाती आले अशा भ्रमाने वागले, तर प्रगती थांबेल. अशी उदाहरणे फार आढळतात. म्हणून अतिशय सावधगिरीने वागावे. जो साधक प्रपंचामध्ये असेल त्याला प्रपंची लोकांच्या संगतीत राहावे लागणार; पण त्याने फार सांभाळून राहायला पाहिजे. आपली वृत्ती केव्हा बदलेल याचा नेम नसतो. खरोखर, परमार्थ ही कठीण शिकारच आहे. शिकार अशी मारली पाहिजे, की आपल्या मीपणाला मारून आपण जिवंत राहिले पाहिजे, आणि आपल्याला नको तेवढेच गळून पडले पाहिजे. **आजचे बोधवचन आहे - १२३. सावधानता ठेवून नाम घ्यावे. नामाची सतत धार धरावी. म्हणजे ते वृत्तीपर्यंत पोहोचते.**

## निवडक सुभाषिते

आधुनिक केसरी

**अहो दुर्जनसंसर्गान्मानहानिः पदे पदे ।
पावको लोहसंगेन मुद्‌गरैरभिहन्यते ॥
स्पष्टीकरण - माणूस चांगला की वाईट, सज्जन की दुर्जन, हे तो ज्याच्या संगतीत राहतो, वागतो, त्यावरून ठरत असते. दुष्टदुर्जनांच्या संगतीमुळे आपले अनेक तोटे होतात. कोणी आपला सहवास टाळतात तर कोणी आपल्यावर विश्वास ठेवीत नाहीत. त्यामुळे पदोपदी आपली कामे नडतात. तेव्हा दुर्जनसंसर्ग टाळावा हे उत्तम.**

पं. महादेवशास्त्री जोशी, पुणे

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
शुक्रवार, २६ मे २०२३
adhunikkesari.com Adhunik Kesari


# टोमॅटोला प्रति किलो एक रुपये भाव

आधुनिक केसरी न्यूज

**जुन्नर :** कृषी उत्पन्न बाजार समितीच्या नारायणगाव उपबाजार केंद्रात शेतकऱ्यांनी विक्रीसाठी आणलेल्या टोमॅटोच्या २० किलोच्या क्रेटला २० ते ४० रुपये भाव मिळाला. टोमॅटोला किलोमागे एक रुपया मिळाल्याने संतप्त शेतकऱ्यांनी टोमॅटो बाजार समितीच्या आवारात फेकून निषेध व्यक्त केला. नारायणगाव उपबाजार केंद्रात बुधवारी काही शेतकरी आपले टोमॅटो विक्रीसाठी घेऊन आले होते. मात्र अनेक व्यापाऱ्यांनी टोमॅटोच्या प्रतवारीनुसार २० किलोच्या एका क्रेटला २० ते ४० रुपये बाजारभाव सांगितल्याने संतप्त झालेल्या शेतकऱ्यांनी टोमॅटो बाजार समितीच्या आवारात फेकून दिले. बाजार समितीचे संचालक माऊली खंडागळे, भास्कर गाडगे, संतोष चव्हाण, प्रियंका शेळके, माजी सभापती रघुनाथ लेंडे, संतोष खैरे, बाजार समितीचे सचिव रुपेश कवडे, चेतन रुकारी, उपसचिव शरद धोंगडे यांनी शेतकऱ्यांची भेट घेतली.



# मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण नको

## ओबीसी समाज विचारवंतांच्या बैठकीत प्रज्ञावंतांचा विरोध

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** मराठा समाजाच्या खांद्याला खांदा लावून ओबीसी समाजाने मराठा आरक्षणाला स्वतंत्र आरक्षणासाठी पाठिंबा दिला होता. मात्र आता मराठा समाजातील काही नेते ओबीसी आरक्षणातून मराठा समाजासाठी आरक्षणाची मागणी करत आहेत. शासन स्तरावरही ओबीसी समाजाच्या आरक्षणाला धक्का देण्याचे काम सध्या सुरू आहे. मराठा आणि ओबीसी संघर्ष टाळायचे असेल तर सरकारने वेळीच लक्ष द्यावे. मराठा आरक्षण हा विषय जातीय सलोख्याने हाताळावे, सामाजिक वातावरण खराब होऊ नये यासाठी मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देऊ नये, अशी मागणी करत मराठा समाजाचे ओबीसीकरण नको अशी भुमिका ओबीसी समाज विचारवंतांच्या बैठकीत घेण्यात आली. ओबीसी समाजातील सर्व घटकांना एकत्र आणून त्यांच्या संमस्यांसंदर्भात विचारविनीमय, मागण्यासंदर्भात पुढील भुमिका ठरविण्यासाठी ओबीसी समाजातील विचारवंतांची राज्यस्तरीय बैठक गुरूवारी (दि.२५) छत्रपती संभाजीनगरातील श्री. संत सेना भवन येथे पार पडली. दोन सत्रात झालेल्या बैठकीच्या अध्यक्षतेस्थानी प्रा. प्रल्हाद लुलेकर, प्रा. श्रावण देवरे होते. यावेळी कल्याण दळे, डॉ. राजेंद्र कुंभार, राजीव हाके, प्रा. प्रभाकर गायकवाड, डॉ. साहेबराव पोपळघट, प्रा. वसंत हारकळ, डॉ. संजय मून, स. सो. खंडाळकर, लक्ष्मण वडले, शंकरराव लिंगे, दिपांकर शेंडे, सुभाष दगडे, विष्णू वखरे यांची प्रमुख उपस्थिती होती. बैठकीच्या सुरूवातीलाच ओबीसी कोट्यातून मराठा समाजाला आरक्षण देण्याच्या मागणीला प्रखर विरोध करण्यात आला. सर्वोच्च न्यायालयाने मराठा आरक्षण रद्द केल्यानंतर आता ओबीसीमध्ये मराठा समाजाला सामावून घेण्यासाठी विविध नेत्यांकडून मागणी होत आहे. मुळात, मराठा समाजाला आरक्षण द्यायला ओबीसी समाजाचा विरोध नाही. मात्र, त्यासाठी ओबीसींच्या हक्काच्या आरक्षणाला धक्का न लावता सरकारने मराठा समाजाला आरक्षण द्यावे. कोणत्याही परिस्थितीत ओबीसींच्या आरक्षणाला धक्का लागता कामा नये, अशी एकमुखी मागणी बैठकीत करण्यात आली. ओबीसी समाजाचा विरोध असतानाही मराठा समाजाच्या आरक्षणाचा प्रश्न ओबीसींच्या कोट्यातून सोडविण्याचा विचार जरी सरकारने आणला तर राज्यातील तमाम ओबीसी समाज रस्त्यावर उतरेल, असा इशाराही शासनाला यावेळी देण्यात आला. बैठकीस लक्ष्मणराव सोमवंशी, उद्धव थोराईत, बबनराव पवार, प्रा. डी आर माळी, संजय जाईबहार, संदीप घोडके, अक्षय ढोके, विनोद इंगळे, एस.एम. थोरे, सुरेश आगलावे, ऍड. उत्तमभाई कोळेकर, अंबादास रगडे, डॉ. सुवर्णमाला मस्के बलभीम माथेले, दत्तात्रय घाडगे, अंबादास शिंदे, गंगाधरराव जाधव, डॉ. प्रभाकर हरकळ, भगवान हरकळ, डॉ. चक्रपाणी चौथावार, लक्ष्मीकांत मस्के, ऍड. विठ्ठल शेंद्रे, सतीश जयकर, दत्ता राजगुरू आदींची उपस्थिती होती.

**बैठकीत सर्वानुमते घेण्यात आले हे ठराव :** महाराष्ट्र विधान सभेने ओबीसीची जातनिहाय जनगणनाबाबत केलेल्या ठरावाची अंमलबजावणी करावी. सर्वच राजकीय पक्षांनी ओबीसी प्रवर्गातील सेल, आघाडी हे शब्द प्रयोग बंद करावेत. विधानसभा, लोकसभा मधील ओबीसींचे आरक्षण द्यावे, सर्व मंदिरामध्ये बहुजन समाजाला संख्येच्या प्रमाणात प्रतिनिधीत्व द्यावे. बहुजन- ओबीसी लोक, दैवतांच्या स्थळांना तीर्थस्थानांचा दर्जा देऊन त्यांचा विकास करावा. शिवाय तेथे बहुजन समाजातील पुजारी नेमण्यात यावे. ओबीसी-बहुजन महापुरुषांचा गड उभा करण्यात यावा, नव्या संसद भवनाला भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यात यावे. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० रद्द करून सर्वांना समान शिक्षण अर्थात मोफत शिक्षण देण्यात यावे. हे ठराव सर्वानुमते पारित करण्यात आले.

**जनजागृती, संघटनात्मक बांधणीसाठी राज्यभर मोहिम :** ओबीसी समाजाचे आरक्षण, जातनिहाय जनगणना यासह अन्य प्रश्नांसंदर्भात विचारविनीमय तसेच ओबीसी समाजातील सर्व घटकांना एकत्र आणण्यासाठी ओबीसी समितीच्या वतीने राज्यभर विचारवंतांची बैठक व मेळावे घेण्यात येणार आहे. यात अमरावती, अहमदनगर, गोंदिया, धुळे, कोल्हापूर, मालवण येथे ओबीसी समाजातील विचारवंतांची बैठक तर पुणे, अकोला, नागपूर, सोलापूर या ठिकाणी मेळावे घेण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला.






# कुनो राष्ट्रीय उद्यानातील चित्त्याच्या दोन बछड्यांचा मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** दक्षिण आफ्रिकेतून आणलेले चित्ते मध्य प्रदेशातील कुनो राष्ट्रीय उद्यानात ठेवण्यात आले आहेत. यातील एका मादी चित्त्याने २४ मार्चला चार बछड्यांना जन्म दिला होता. त्यामधील एका बछड्याचा २३ मेला मृत्यू झाला होता. तर, गुरुवारी ( २५ मे ) दोन बछड्यांचा मृत्यू झाला आहे. चित्त्यांच्या मृत्यू या महिन्यातील ही तिसरी घटना आहे. कुनो राष्ट्रीय उद्यानात असलेल्या मादी चित्ता ज्वाला हीने २४ मार्च २०२३ ला चार बछड्यांना जन्म दिला होता. मादी चित्त्यांमध्ये ज्वाला हीनेच बछड्यांना पहिल्यांदा जन्म दिला आहे. पण, २३ मे रोजी उन्हाळ्यातील सर्वात उष्ण दिवस होता. त्यामुळे चारही बछड्यांना उष्माघाताची समस्या जाणवली. याची माहिती मिळताच कुनो उद्यानातील प्राणी मित्रांनी बछड्यांना उपचारासाठी दाखल केले होते. पण, यातील एका बछड्याचा २३ मे रोजी मृत्यू झाला. तर आज ( २५ मे ) दोन बछड्यांचा मृत्यू झाला आहे. आणखी एका बछड्याची स्थिती स्थिर असून, त्याच्यावर पालपूर येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत. तर, 'ज्वाला' या मादी चित्त्यावरही प्राणीमित्रांकडून देखरेख करण्यात येत आहे.

कुनो राष्ट्रीय उद्यानात नामिबियातून २० चित्ते आणले होते. यातील तीन चित्त्यासह ३ बछड्यांचा मृत्यू झाला आहे. सर्वात पहिल्यांदा 'साशा' या मादी चित्त्याचा २७ मार्च रोजी मूत्रपिंडाच्या आजाराने मृत्यू झालेला. तर, 'उदय' हा चित्ता २३ एप्रिलला निश्चल अवस्थेत आढळून आला होता. नंतर त्याचाही मृत्यू झाला. 'दक्षा' या मादीचा ९ मे रोजी चित्त्यांच्या झुजीनंतर मृत्यू झाला होता. आता 'ज्वाला' या मादीच्या तीन बछड्यांचा मृत्यू झाला आहे.

# भ्रष्ट कारभाराची चौकशी करणार: सभापती चव्हाण

आधुनिक केसरी न्यूज



**औरंगाबाद :** जिल्ह्यातील फुलंब्री येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या नवनिर्वाचित सभापती अनुराधा चव्हाण यांनी सभापती पदाचा पदभार स्वीकारत माहिती दिली की, मागील काळात जे काम झाले त्याची चौकशी केली जाईल. दोषी आढळून आले तर कारवाई करण्यात येईल, अशी माहिती सभापती अनुराधा चव्हाण यांनी पत्रकारांना दिली. दि. 24 मे रोजी आ. हरिभाऊ बागडे यांच्या प्रमुख उपस्थितीत कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभागृहात विविध विषयांवर चर्चा करत माहिती देण्यात आली. कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मालकीच्या पेट्रोल पंप भाडेतत्त्वावर दिले, गाळे भाडेतत्त्वावर दिले यावरही फार भ्रष्ट कारभार दिसून आला.तसेच कृषी उत्पन्न बाजार समितीच्या खात्यात फक्त 41 रुपये आहे. गेल्या सहा ते आठ महिन्यांपासून कर्मचार्यांचा पगार नाही. यावर सगळीकडे भ्रष्ट कारभार झालेला आहे. यावेळी आमदार हरिभाऊ बागडे, नवनिर्वाचित उपसभापती दत्तात्रय करपे , संचालक सुहास शिरसाट, अझहर सय्यद, शिवाजी पाथ्रीकर किशोर बलांडे जितेंद्र जैस्वाल , सविता फुके यांच्या सह सर्जेराव पाटील मेटे, अप्पासाहेब काकडे, जगन्नाथ दाढे, योगेश जाधव सुचित बोरसे, माधवराव जाधव सचिव रणजित कदम, मनोहर सोनवणे, वाल्मिक सराईकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

# चोरट्यांनी दोन दुकाने चोरांनी फोडली

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** शहरातील शिवाजी चौक व पोलीस स्टेशन जिंतूर च्या मध्ये असलेली बालाजी वॉच सेंटर व इलेक्ट्रॉनिक तसेच पटेल शूज सेंटर हे दोन दुकाने मध्यरात्री चोरट्याने दुकानाचे टिन पत्रे सरकून दुकानात प्रवेश केला आहे यामध्ये लाखोच्या रुपयाचा ऐवज लंपास केल्याच अंदाजा व्यक्त करण्यात येत आहे.

परभणी जिल्ह्यातील जिंतूर शहरातील पोलीस स्टेशन व शिवाजी चौक मध्ये असलेले दोन्ही दुकानाचे वरचे पत्थर सरकून दुकानात प्रवेश करून चोरी केली ज्यामध्ये बालाजी वॉच सेंटर व इलेक्ट्रॉनिक या दुकानांमधील ब्रँडेड मनगटी घड्याळ, दीवाराचे घड्याळ, इलेक्ट्रॉनिक साहित्य चोरट्या लंपास केले आहे तसेच याच दुकानाच्या बाजू असलेली पटेल शूज सेंटर मधील ब्रॅण्डेड बूट व चप्पल ही चोरट्याने लंपास केले आहे या दोन्ही दुकानदारांचा लाखोचा माल लंपास झाल्याचा अंदाज आहे या घटनेची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक कुंदन कुमार वाघमारे, पोलीस हेडकॉन्स्टेबल लीला जोगदंड, देशपांडे, पोलीस उपनिरीक्षक सय्यद तसेच पोलीस कर्मचारी घटनास्थळी दाखल होऊन पंचनामा केला आहे तसेच श्वान पथक व फिंगरप्रिंट एक्सपर्ट पाचरण करण्यात येणार असल्याचे पोलीस निरीक्षक वाघमारे यांनी सांगितले आहे ही चोरीची घटना पोलीस स्टेशनचा हाकेच्या अंतरावर झाली असल्या मुळे पोलिसांनी रात्रीची गस्त वाढवावी अशी नागरिकांमधून चर्चा होत आहे.

# आशिष देशमुख सक्रिय

आधुनिक केसरी

काँग्रेस नेते राहुल गांधी आणि प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्यावर टीका करणे माजी आमदार आशीष देशमुख यांना महागात पडले आहे. त्यांची काँग्रेस पक्षातून सहा वर्षांसाठी हकालपट्टी करण्यात आली आहे. काँग्रेसच्या शिस्तपालन समितीने देशमुख यांना पक्षविरोधी वर्तनाबद्दल आणि जाहीर वक्तव्याबद्दल पक्षाच्या प्राथमिक सदस्यत्वातून सहा वर्षांच्या कालावधीसाठी निलंबित केले आहे. एकीकडे त्यांच्यवार निलंबनाची कारवाई झालेली असताना दुसरीकडे ते बाजार समितीच्या राजकरणात सक्रिय झाले आहेत. त्यांनी काका अनिल देशमुख यांच्याविरोधातच दंड थोपटले आहेत. राज्याच्या राजकारणात पुन्हा एकदा काका-पुतण्यांचे राजकारण पाहायला मिळणार आहे. कारण, काँग्रेसमधून हकालपट्टी झालेले आशिष देशमुख यांनी काका अनिल देशमुख यांच्याविरोधात दंड थोटपले आहेत. नरखेड बाजार समितीत राष्ट्रवादीचे नेते अनिल देशमुख यांचं वर्चस्व आहे. त्यामुळे, नरखेड बाजार समितीतील राष्ट्रवादीचे सभापती यांच्याविरोधात आशिष देशमुख यांनी अविश्वास प्रस्ताव आणला आहे. जिल्हाधिकाऱ्यांकडे हा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. यासंदर्भात उद्या मतदान होणार असून, राष्ट्रवादीचा सभापती नरखेड एपीएमसीमधून गेलेला असेल, अशी प्रतिक्रिया आशिष देशमुख यांनी दिली. ते टीव्ही ९ मराठीशी बोलत होते. राष्ट्रवादीच्या सभापतींविरोधात मोठ्या प्रमाणात संचालक मंडळात नाराजी होती. अविश्वास प्रस्ताव आणण्याकरता १८ पैकी ९ जण लागतात. हा अविश्वास प्रस्ताव पारित होण्याकरता १२ जणांची गरज असते. आमच्या लोकांनी त्यांच्याविरोधात अविश्वास प्रस्ताव आणला असून जिल्हाधिकाऱ्यांकडे प्रस्ताव दाखल केला. तेव्हा १२ जण आमच्याकडे आले. आता, यासंदर्भात उद्या २६ मे रोजी मतदान होईल आणि राष्ट्रवादीचा सभापती नरखेड एपीएमसीमधून गेलेला असेल, असे आशिष देशमुख म्हणाले. आशिष देशमुख हे २०१४ मध्ये भाजपकडून काटोलमधून निवडून आले होते. त्यांनी माजी गृहमंत्री व राष्ट्रवादीचे अनिल देशमुख यांचा पराभव केला होता. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी मतभेद झाल्यानंतर त्यांनी भाजपला रामराम केला. नंतर त्यांनी राहुल गांधी यांची भेट घेऊन काँग्रेसमध्ये प्रवेश केला. २०१९ मध्ये फडणवीस यांच्याविरोधात निवडणूकदेखील लढवली. आता ते पुन्हा भाजपशी जवळीक साधून आहेत. फडणवीस यांनी नुकतीच देशमुख यांच्या नागपूर येथील निवासस्थानी भेट दिली. त्यापूर्वी देशमुख यांनी भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेतली होती.

# संसदभवन पक्षाची खासगी संपत्ती नाही..



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**भारतात लोकशाही आहे. लोकशाही मध्ये सर्वोच्च ही जनता असते, आणि जनतेच्या कल्याणाच्या योजना, हक्क अधिकाराचे संरक्षण संसदेमधुन होत असते. म्हणजेच लोकांचे कल्याणकारी योजना निर्मिती चे व राष्ट्रहीत साध्य करण्याचे नियोजन हे संसदेमध्ये होत असते. म्हणजेच संसद ही लोकांची आहे. संसदेचे अंतिम मालक जनता आहे. कोणताही राजकीय पक्ष किंवा कोणत्याही राजकीय पक्षाचे सरकार संसदेचे मालक नाहीत. लोकांनी निवडून दिले म्हणून कार्यकाल पुर्ण होई पर्यंत संसदेची व जनतेची देखभाल करण्याची जबाबदारी सरकारची व ती ती देखभाल बरोबर होते की नाही हे बघण्याची जबाबदारी विरोधी पक्षाची असते. कोणताही राजकीय पक्ष संसदेपेक्षा मोठा मुळीच नाही. प्रधानमंत्री हे देशातील लोकनियुक्त असले तरीही देशाचे घटनात्मक प्रमुख हे राष्ट्रपती असतात.**

राष्ट्रपती हे देशातील सर्वोच पद आहे.

भारत सरकारने अनेक वाद निर्माण करून नविन सनसदेची निर्मिती केली. आणि निर्मीती केल्यानंतर ही वादच सुरू आहेत. सध्य परिस्थिती जी निर्माण केली आहे ती फक्त वादच निर्माण करत नाही तर देशातील लोकशाही किती धोक्यात आहे याचे देखील संकेत देत आहे. भारतीय संविधानाची पायमल्ली करून आधुनिक मनुस्मृती लागु करण्याची हि धडपड आता उघड झाली आहे. भारत सरकारने अर्थात प्रधानमंत्री व त्यांच्या काही सहकार्यांनी नवीन संसदभवन चे उद्घाटन करण्याचे ठरवले. लोकशाही व लोकांचे हक्क अधिकार जिवंत ठेवण्याचे संसदभवनाचे उद्धाटन होने हि तर खरचं गौरवाची बाब आहे. परंतु प्रस्थापित सरकारला कोणत्याही माध्यमातून वाद निर्माण करून लोकांचे लक्ष विचलीत करून त्यावर माताची बांधणी करण्याणी सवय झाली आहे. देशाच्या संसदेच्या इमारतीचे उद्धाटन हे राष्ट्रपतींच्या हस्ते व्हायला पाहिजे. कारण ते देशाचे प्रथम नागरिक आहेत. परंतु संसदेच्या उद्धाटनामधुन राष्ट्रपती यांनाच डावलून प्रधानमंत्री यांनीच स्वतः संसदेचे उद्धाटन करणे म्हणजे राष्ट्रपती यांचा अवमान, देशाचा व देशातील प्रत्येक जनतेचा अवमान आहे. सत्तेच्या मोहात बुडालेल्या सरकारने राष्ट्रपतीचे नाव कार्यक्रम पत्रिकेवर न टाकणे, त्यांना कार्यक्रमाचे निमंत्रण न देणे हे प्रामाणिक प्रधानमंत्री म्हणून प्रधानमंत्री यांना शोभणारे आहे का ? संसदेच्या इमारतीचे उद्धाटन सोहळा हा शासकीय कार्यक्रम आहे. संसदभवन म्हणजे बिजेपी ची खाजगी संपत्ती, भाजपा कार्यालय नाही. पक्षाच्या कार्यालयाचे उद्धाटन प्रधानमंत्री यांनी जरूर करावे. तिथे कोणालाच बोलवू नये. कोणी प्रश्न ही करणार नाही. परंतु संसदभवन पक्षाचे कार्यालय नाही याची जाणीव असावी. लोकशाही मध्ये विरोधी पक्षही महत्वाचे असतात. सर्वच विरोधी पक्ष, जनता जर या उद्धाटन सोसळ्याला विरोध करत असेल तर फक्त सत्ताधारी सरकारच का अरेरावी करत उद्धाटन प्रधानमंत्री यांच्या हस्ते व्हायला पाहिजे हा आग्रह धरत आहे. देशात लोकांना व विरोधी पक्षांना काहीच किंमत नाही का ? राष्ट्रपतींना वगळून राष्ट्रीय कार्यक्रम कसा घेतला जाऊ शकतो असे प्रश्न उपस्थित होत आहेत. जो पक्ष राष्ट्रपती चा सन्मान करू शकत नाही तेथे सामाजिक न्याय व सर्वसामान्य लोकांचा सन्मान होईल का ? राष्ट्रपती यांना डावलून कार्यक्रम घेणे ही खुप गंभीर बाब आहे. आणि या गंभीर बाबीविषयी स्ट्रीम मिडिया सरकार ला प्रश्न विचारले ही अपेक्षा करणे म्हणजे रेड्याकडून दूधाची अपेक्षा केल्या सारखे आहे. राष्ट्रपतींना डावलून कार्यक्रम घेणे हा देशाचा, राष्ट्रपती व जनतेचा अवमान आहेच. परंतु भाजपाच्या भाषेत बोलायचे झाल्यास हा महिलांचा व आदीवासींचाही अवमान आहे. मोदी अडनावांचा संबंध ओबीसींशी जोडून ओबीसींचा अवमान झाला असे बोलणारे लोक आज मनाचा थोडा तरी प्रामाणिक पणा दाखवून राष्ट्रपतींना डावलने म्हणजे देशाचा, राष्ट्रपतीचा, महिलेंचा व आदिवासींचा अवमान आहे असे बोलतील ? सर्वच विरोधी पक्षानी उद्धाटन समारंभावर बहिष्कार टाकल्या नंतर सरकार सदर समारंभ हा एका पक्षाचा समारंभ म्हणून साजरा करतील का ? कँमेरा व आंतरराष्ट्रीय बातमीसाठी संविधानाची पायमल्ली करून लोकशाही ची हत्या केली जाते. आणि वरुन आम्ही लोकशाही ला माणणारे लोक आहोत म्हणून आव आणला जातो. संपूर्ण जगाचे लक्ष भारताकडे आहे. कोण कशापद्धीने काम करत आहेत याचा लेखाजोखा जगाकडे आहे. हे असेच हुकूमशाही प्रमाणे वागत गेले तर परराष्ट्रीय सबंध खराब होऊन भारताला कोणीच किंमत देणार नाही. याचा विसर सत्ताधारी लोकांना पडला. भाजपाचे प्रत्येक जिल्ह्यात पक्षाचे मोठमोठे कार्यालय बांधले आहेत त्या प्रत्येक कार्यालयाचे उद्धाटन प्रधानमंत्री यांच्या हाताने करून घ्यावे परंतू संसदभवनाला एका पक्षाची वा सत्तेत असलेल्या सरकारची मालमत्ता समजून वाटेल तसे वागु नये. संसदभवन हे देशातील प्रत्येक जातीधर्मातील प्रत्येक नागरिकांच्या हिताचे, कल्याणाचे व लोकशाही जिवंत असल्याचे प्रतिक आहे. आणि त्याला राजकीय व धार्मिक रंग देऊन देशातील वातावरण दुषीत करून सरकारने देशातील जनतेच्या भावनेशी खेळू नये. भाजप हा केवळ राजकीय पक्षच नाही तर तो कट्टर हिंदुत्ववादी विचारधारा असलेला पक्ष आहे. कट्टर हिंदुत्व म्हणजे तेथे न्यायाची, समतेची व लोककल्याणाची अपेक्षा च नाही. गुजरात दंगल घडून आरोंपीना शिक्षा झाली नाही, मागील पाच वर्षात एकेचाळीस हजार महिला बेपत्ता झाल्या अजून शोध घेतला नाही, कुस्ती संघाच्या अध्यक्षावर लैंगिक शोषणाचे आरोप असुन अद्याप कारवाई नाही, भिमाकोरेगाव दंगल प्रकरणातील आरोपी मोकाट आहेत, पुलवामा जवान शहिद प्रकरण दाबले जाते, गोमांस जवळ आहे म्हणून शंका घेऊन मुस्लिम तरुणांनाची हत्या केली जाते आणि बीफ निर्णाय करणाऱ्या भाजपा समर्थक कंपनीला प्रोत्साहन दिले जाते. थोडक्यात काय तर भाजपच्या हिंदुत्वा मध्ये न्याय नाहीच. आणि भाजप हिंदुत्ववादी आहे, इतरांचा द्वेष करून एकाच धर्माची सत्ता अपेक्षित असताना इतर धर्मीय लोक देशात राहतात त्यांचे काय ? त्यांच्या मताचा सरकार विचार करणार कि नाही. जे भाजप सत्तेत असताना गर्व से कहो हम हिंदू है, हिंदू धर्म खतरे मे है म्हणते, ते सरकार लोकांचे व देशाचे काय संरक्षण करेल ? सत्तेत असतानाही यांना धर्मला धोका वाटतो तर सर्वसामान्य लोकांच्या संरक्षणाचे काय ? सत्तेत असलेल्या सरकारने गर्व से कहो हम भारतीय है म्हणायला पाहिजे, आम्ही भारतीय सुरक्षित आहे असे म्हणायला पाहिजे तर सरकारच म्हणते धर्म खतरे मे है. जर धर्मच खतरे मे है तर भारतीय नागरिक सुरक्षित असतील का ? आणि सत्तेत असताना ज्यांना धर्म धोक्यात वाटतो त्यांना सत्तेत राहण्याचा अधिकार आहे का ? सत्तेत असुनही धर्माचे रक्षण करण्यासाठी जो सक्षम नाही त्यांनी राजीनामा देऊन मोकळे व्हायला पाहिजे व देशातील जनतेला सुखी ठेवायला पाहिजे. भाजपाला जो काही अजेंडा राबवायचा आहे तो अजेंडा त्यांनी भाजपा कार्यालयामधून राबवावा, संसद म्हणजे भाजप कार्यालय नाही किंवा भाजपची वैयक्तिक संपत्ती नाही. म्हणून भाजपने मनमानी कारभार करून प्रसिद्धी साठी लोकशाहीची हत्या करून राष्ट्रपतींचा अवमान करू नये. उद्धाटन समारंभ तारीख ही सरकारने वादग्रस्त ठरवली आहे. भाजपे हिंदु मुस्लिम द्वेषाचे राजकारण आता लोक हानुन पाडत आहेत. म्हणून येथून पुढे हिंदु मुस्लिम द्वेष जास्त चालणार नाही म्हणून भाजप नवीन वाद निर्माण करत आहे. संसद भवनाचे उद्धाटन तारिख निश्चित करताना संविधान दिन किंवा ज्यांनी घटना बनवली अशा घटनाकारांची जयंती दिनी उद्धाटन करणे प्रामाणिकपणाचे लक्षण होते. परंतु संविधान दिन व घटनाकारांची जयंती दिवशी उद्धाटन न करता वेगवेगळ्या च तारखेला उद्धाटन करून नवीन वाद निर्माण करत आहेत. तारीख कोणतीही उद्धाघटनासाठी निवडली तरीही त्या तारखेला हे जास्त महत्त्व निर्माण करू देऊ शकत नाहीत, आणि इतिहासातील महत्वाच्या तारखी हे बदलु शकत नाहीत. कोणतेही काम करताना त्याला आधार असावा. कोणालाही महत्त्व देताना सत्य कधी दाबता येत नाही. थोडक्यात राष्ट्रपतींना डावलून व योग्य तारीख न निवडून, विरोधी पक्ष ल जनतेचा कोणत्याही प्रकारचा विचार न करता कार्यक्रम घेणे म्हणजे हा केवळ हिंदुत्ववादी व पक्षीय कार्यक्रम होय. सरकारी खर्चाने धार्मिक व पक्षीय कार्यक्रम होत असेल तर लोकशाही लयास जात आहे हेच सिद्ध होत आहे. संसदभवनाचे उद्धाटन करताना सरकारने तो कार्यक्रम एका पक्षाचा, एका धर्माचा होणार नाही याची दक्षता घ्यावी. संसदभवन उद्धाटन हा राष्ट्रीय व धर्म, पक्ष निरपेक्ष कार्यक्रम आहे. संसदभवन हे कोणत्याही पक्षाची खाजगी संपत्ती नाही हे लक्षात ठेवावे.



# संसद भवनाचे उद्घाटन कोणी करावे ?



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**देशातील नवीन संसद भवनाचे उद्घाटन २८ मे रोजी होवू घातले आहे. ही इमारत विद्यमान संसद भवनाची जागा घेईल. मात्र, त्याच्या उद्घाटनाबाबत सातत्याने राजकीय गदारोळ सुरू आहे. नविन संसद भवनाचे उद्घाटन कोणी करावे ?राष्ट्रपतींनी की पंतप्रधानांनी यावरून सध्या गदारोळ सुरू आहे. २८ मे रोजी होणाऱ्या कार्यक्रमावर अनेक राजकीय पक्षांनी बहिष्कार टाकण्याची घोषणा केली आहे. त्यात काँग्रेससह सर्व विरोधी पक्षांच्या नावांचा समावेश आहे. वास्तविक, २८ मे रोजी दुपारी १२ वाजता पंतप्रधान मोदी नवीन संसद भवनाचे उद्घाटन करतील. मात्र, याआधी काँग्रेस, टीएमसी, एनसीपी, आप, जेडीयू, आरजेडी, सीपीआयसह अनेक विरोधी पक्षांनी या सोहळ्यावर बहिष्कार टाकला आहे.**

समविचारी विरोधी पक्षांच्या नेत्यांनी संसद भवनाच्या उद्घाटन समारंभावर बहिष्कार टाकण्याबाबत चर्चा केली आहे. असे म्हटले जात आहे की लवकरच सर्व सभागृह नेते संयुक्त निवेदन जारी करू शकतात. यामध्ये कार्यक्रमावर संयुक्त बहिष्कार टाकण्याची घोषणा केली आहे. मात्र, अनेक पक्षांनी या कार्यक्रमात सहभागी होणार नसल्याचे आधीच सांगितले आहे. दरम्यान, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते मल्लिकार्जुन खर्गे, शशी थरूर आणि मनीष तिवारी यांनी घटनेच्या अनेक कलमांचा हवाला देत पंतप्रधानांऐवजी भारताच्या राष्ट्रपतींनी इमारतीचे उद्घाटन करावे, असे म्हटले आहे. काँग्रेसचे म्हणणे आहे की राष्ट्रपती मुर्मू यांच्या हस्ते नवीन संसद भवनाचे उद्घाटन हे लोकशाही मूल्ये आणि घटनात्मक प्रतिष्ठेसाठी सरकारच्या वचनबद्धतेचे प्रतीक असेल.

नविन संसद भवनाच्या उद्घटना वरून सध्या जो गदारोळ सुरू आहे.तो राजकीय शिष्टाचार,राजकीय प्रोटोकॉल व संविधनिक मूल्याच्या विरूद्ध जाणारा आहे.प्रश्न उद्घाटनाचा नसुन मान सन्मानाचा व कायद्याचा आहे.राष्ट्रपती देशाचे प्रथम नागरिक असून. संसदेचे एक अभिन्न अंग आहे.घटनेने राष्ट्रपतींना सांविधनिक अधिकार दिलेले आहेत.संसदेच्या दोन्ही सभागृहांनी पारित केलेल्या विधेयकावर जोपर्यत राष्ट्रपतींची स्वाक्षरी होत नाही तोपर्यंत कोणत्याही विधेयकाचे कायद्यात रूपांतर होत नाही.राज्यघटनेने राष्ट्रपतींना कार्यकारी, कायदेमंडळ, न्यायव्यवस्था, आणीबाणी आणि लष्करी अधिकार दिले आहेत. विधिमंडळाच्या अधिकारांमध्ये संसदेची दोन्ही सभागृहे, लोकसभा आणि राज्यसभा यांचा समावेश होतो. कलम ७९ मध्ये असे म्हटले आहे की, 'संघासाठी राष्ट्रपती आणि राज्यसभा आणि लोकसभा ही दोन सभागृहे असलेली संसद असेल.' त्याच वेळी, घटनेच्या अनुच्छेद ७४ (१) मध्ये म्हटले आहे, 'राष्ट्रपतींना मदत आणि सल्ला देण्यासाठी पंतप्रधानांसह मंत्रिपरिषद असेल, जी त्यांच्या सल्ल्यानुसार कार्य करेल. त्यात असेही नमूद केले आहे की राष्ट्रपती मंत्रिपरिषदेला अशा सल्ल्याचा सर्वसाधारणपणे किंवा अन्यथा पुनर्विचार करण्यास सांगू शकतात आणि राष्ट्रपती अशा फेरविचारानंतर दिलेल्या सल्ल्यानुसार कार्य करतील. कलम ८७ मध्ये असेही म्हटले आहे की राष्ट्रपतींनी संसदेच्या प्रत्येक अधिवेशनापूर्वी दोन्ही सभागृहांना संबोधित केले पाहिजे. दोन्ही सभागृहांनी मंजूर केलेले विधेयक राष्ट्रपतींच्या संमतीशिवाय कायदा होऊ शकत नाही. त्यामुळे राज्यघटनेने राष्ट्रपतींना संसदेच्या कामकाजात महत्त्वाची भूमिका दिली आहे. घटनेतील राष्ट्रपतींचे स्थान व भूमिका बघता नवीन संसद भवनाचे उद्घाटन राष्ट्रपतींच्या हस्ते व्हायला पाहिजे.या प्रसंगी पंतप्रधान देखील उपस्थित राहतीलच. मग नविन संसद भवनाच्या उद्घटनवरून वाद व श्रेय घेण्याचा व अकारण राजकारण करण्याचे कारण काय ? स्वातंत्र्यानंतर केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य वास्तुविशारद जेएम बेंजामिन यांनी नविंसंसद इमारतीची रचना केली होती. त्याची पायाभरणी ३ ऑगस्ट १९७० रोजी तत्कालीन राष्ट्रपती व्ही.व्ही.गिरी यांनी केली होती. पाच वर्षांनंतर २४ ऑक्टोबर १९७५ रोजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी या इमारतीचे उद्घाटन केले. १० डिसेंबर २०२०रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुमारे ९७१ कोटी रुपये खर्चून बांधलेल्या संसदेच्या नवीन इमारतीची पायाभरणी केली. यावेळी सर्वधर्मीय प्रार्थना सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सर्व धर्माचे प्रमुख उपस्थित होते. काँग्रेस, डावे आणि इतर अनेक विरोधी पक्षांचे प्रमुख नेते पायाभरणी समारंभाला उपस्थित राहिले नाहीत. मात्र, या सोहळ्यासाठी सरकारकडून सर्व पक्षांना निमंत्रित करण्यात आले होते. तृणमूल काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, द्रमुक आणि इतर काही विरोधी पक्षांचे नेते या कार्यक्रमापासून दूर राहिले. बिगर एनडीए पक्षांपैकी बिजू जनता दल, तेलुगु देसम पार्टी आणि वायएसआर काँग्रेसचे नेते या कार्यक्रमाला उपस्थित होते.



हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# कापड लॉबीकडून शेतकरी एकजुटीच्या पदरी निराशा

## ६ ते ७ हजार रुपयांनी कापूस करावा लागतो विक्री : प्रा. जीवन कोलते

आधुनिक केसरी न्यूज

**गोकुळसिंग राजपूत**

**सोयगाव :** तालुक्यात व सावळदबारा परिसरात यंदा कापूस उत्पादक शेतकऱ्यांनी दहा हजारांतच कापूस विकायचा ठाम निर्माण घेऊन तब्बल चार ते पाच महिने कापूस घरातच साठवून ठेवला होता आता मात्र 6800/7000रुपये किंट्ल कापूस विक्री करावी लागत आहे तसे भाव ही व्यापारी घेत आहे.

सोयगाव तालुक्यात मागिल सहा महिन्यापासून कापूस दर प्रचंड प्रमाणात घसरलेले आहेत. मागच्या वर्षी दहा हजाराच्या पुढे कापूस तर आता दर ७ हजारच्या आसपास आहे. शेतकऱ्याला गतवर्षीच्या भावाची अपेक्षा असतांना या वर्षी मात्र प्रत्यक्षात सात हजार तर कापूस सात हजाराच्या प्रति क्विंटल आसपास प्रमाणात दर स्थिर आहेत.यामुळे शेतकऱ्यांनी दरवाढीची प्रतीक्षा करायची किती दिवस हा प्रश्न उद्‌भवत आहे ?.तरी पण भाव वाढीची आशा प्रतीक्षा आता सपली असुन आता मात्र सात हजारपासून सहा हजार आठशे रुपये दराप्रमाणे क्विंटल कापूस देताना शेतकरी दिसत आहे, पुढील महिन्यात नवीन हंगाम सुरू होणार असुन बी बिजवाई खते साठी पैसे लागणार आहे त्यामुळे शेतकरी आता कापूस देऊन हात मोकळे करीत आहेत, शेतकऱ्याच्या पत्र्याच्या घरामधील , कापसाचे वजन मोठ्या प्रमाणावर घसरत आहे तर पेरणीसाठी सावकाराकडून घेतलेली कर्ज. ? या चिंतेमध्ये शेतकरी त्रस्त झाला आहे या भाववाढीच्या मानसिक दृष्ट्या त्रस्त झालेला घरातील करता माणूस पाहून सर्वच कुटुंब आर्थिक मानसिकताणामध्ये जगत आहे.त्या पुढील महिन्यात हंगामासाठी पैसे आतापासूनच उपलब्ध करून घेताना शेतकरी दिसून येत आहे.सोयगाव तालुका हा कोरडवाहू पिकांचे उत्पन्न घेणारा तालुका म्हणून ओळखला जातो.प्रामुख्याने सोयगाव व सावळदबारा परिसरात तालुक्यात खरीप हंगामात कापूस या एका पिकांना प्राधान्य दिले जाते.यावर्षी कापुस बऱ्यापैकी उत्पादित झालेले आहे तर कापसाचा भावात मात्र मोठ्या प्रमाणात घसरलेला दिसून येतो.उत्पादित



केलेला कापूस शेतकऱ्यांच्या घरात येऊन सहा महिने झाले तरी बाजारपेठेत म्हणावी तशी आवक दिसून येत नाही.त्याचे मुख्य कारण मागच्या वर्षी दहा हजाराच्या पुढे कापूस तर सोयाबीन ७ हजार दर गेले होते परंतु तेच दर यावर्षी मात्र कापूस सात हजाराच्या आसपास शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. अद्याप पर्यंत शेतकऱ्यांकडून घरातील शेत माल बाजारपेठेत न हलवता घरातच साठवून ठेवत दरवाढीची प्रतीक्षा केली जात होती.परंतु शासनाच्या चुकीच्या धोरणामुळे कापूस दर वाढ होण्याची शक्यता दिसून येत नाही. घरात साठवून ठेवलेल्या पिकास अक्षरशः उंदराकडून प्रचंड मोठ्या प्रमाणात नुकसान केले जात आहे तर कापूस पांढरे सोने म्हणून प्रसिद्ध असणाऱ्या कापूस शेतकऱ्यांनी घरात साठवून ठेवल्यानंतर अक्षरशः या कापसाला किडे लागले आहेत.व्हपा नावाचे विशिष्ट किडे कापसावर आढळून येत असल्याने घरात साठवून ठेवलेल्या या कापसामुळे शेतकऱ्यांच्या कुटुंबातील सदस्यांना याची विशिष्ट एलर्जी निर्माण होत आहेत. अंग खाजवणे अंगावर लालसर चट्टे येणे या आजाराला घरात साठवून ठेवलेला कापूस आमंत्रण देत आहे.परंतु बाजारपेठेत कमी झालेले कापसाचे दर हे शेतकऱ्यांना पिकवलेल्या कापूस पिकास योग्य दर नसल्यामुळे घरातच ठेवण्याची वेळ आली असून किती दिवस वाट पाहावी लागणार या चिंतेमध्ये शेतकरी मानसिक आर्थिक दृष्ट्या त्रस्त झालाहोता आतामात्र कमी दराने का होईना कापूस विकुन शेतकरी पुढील हंगामाची तयारी सुरू केली आहे.

**पडलेले दर वाढते व्याज आणि घटते वजन :** भाववाढीच्या आशेने कापूस साठवून ठेवला . व्याजने पैसे काढले परतु भाववाढ झाली नाही आणि कमी झालेल्या भावाचा फटका बसलाच सोबतच महिन्याचे व्याज शेतकऱ्यांना भरावा लागत .पत्र्याच्या खोलीतील कापसाचे तीव्र उन्हामुळे वजन घटले आहे, पडलेले दर वाढलेले व्याज आणि घटलेले वजन असा तिहेरी फटका कापुस उत्पादक शेतकऱ्यांना सहन करावा लागत आहे .

**मुकुंदा आनंदा मानकर, माजी उपसरपंच तथा शेतकरी, सावळदबारा**

**पश्चात्ताप भाडणे अन टोमणे :** मुहूर्तावर जाहीर झालेल्या भावामुळे यंदा कापसाचा भाव दहा हजाराच्या वरच रहिल या शेतकऱ्यांनी नऊ,आठ हजार पाचशे, आठ हजार, सात हजार पाचशे, चा वर ही येऊन सुध्दा कापुस विकलानाही आता मात्र सहा हजार पाचशे, तर सात हजार रुपये प्रमाणे विक्री करावी लागत असल्याने त्यांना पश्चाताप होत आहे तर ज्यांनी अगोदर विकला ते आता विकणाऱ्याना टोमणे मारत आहे, तर अनेक घरात कापुस विक्री वरुन मतभेद होऊन भाडणे होत आहे .

**रामभाऊ वारंगणे, शेतकरी, मोलखेडा, ता . सोयगाव**

# हिंगोलीतील अपघात, पाच जणांसह १९० मेंढ्यांचा मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**हिंगोली :** जिल्ह्यातील कळमनुरीपासून काही अंतरावर असलेल्या माळेगावजवळ एक भीषण अपघात झाला. या अपघातात पाचजणांसह एकूण १९० मेंढ्यांचा जागीच मृत्यू झाला. याशिवाय दोन जण गंभीर जखमी आहेत. मेंढ्या घेऊन जाणाऱ्या मालमोटारीने उभ्या असलेल्या फरशीने भरलेल्या मालमोटरीला समोरून जबर धडक दिल्याने ही दुर्घटना घडली.

मृतांमध्ये सलमान अली मौला अली, सत्यनारायण बळाई, लालू मीना, कदीर मेवाती, आलम आली यांचा समावेश आहे. यामधील एकजण राजस्थानमधील, तर इतर चौघे मध्य प्रदेशातील असल्याचे पोलीस सूत्रांनी सांगितले आहे.पोलीस सूत्रांकडून मिळालेली माहिती अशी की, राजस्थान येथील एक मालमोटर (एचआर-५५-एजे-३१११ ) २०० हूनअधिक मेंढ्या भरून हैदराबादकडे निघाला होता. या मालमोटर चालकासह चौघेजण केबिनमध्ये बसले होते. एक व्यक्ती पाठीमागे मेंढ्यांसोबत बसला होता. माल मोटर गुरुवारी ( २५ मे ) पहाटे तीन ते साडेतीनच्या सुमारास माळेगाव फाट्याजवळ आली असताना उड्डाणपुलाजवळ माल मोटरचालकाला डूलकी लागली. त्यामुळे त्याचा वाहनावरील ताबा सुटला आणि समोर उभे असलेल्या मालमोटरवर त्याचे वाहन आदळले.

या अपघातामध्ये मालमोटरमधील तिघेजण जागीच ठार झाले, तर गंभीर जखमी झालेल्या दोघांना पुढील उपचारासाठी नांदेडला नेत असताना मध्येच मृत्यू झाला. याअपघातात १९० मेंढ्या दगावल्या. या अपघाताची माहिती मिळाल्यानंतर कळमनुरी पोलीस ठाण्याचे



पोलीस निरीक्षक वैजनाथ मुंडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक रेखा शहारे, जमादार दिलीप पोले, संजय राठोडसह पथकात सामील असलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी अपघातातील दोन्ही जखमींना उपचारासाठी तात्काळ कळमनुरीच्या ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. परंतु त्यांची प्रकृती गंभीर असल्याने त्यांच्यावर प्राथमिक उपचार करून पुढील उपचारासाठी नांदेडला हलवले. मात्र रस्त्यातच त्यांचा मृत्यू झाल्याचे पोलीस सूत्रांनी सांगितले. अपघातामध्ये जागीच ठार झालेल्या तिघांचा मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी कळमनुरीच्या उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आला आहे. अपघातातील एका जखमीवर रुग्णालयात उपचार सुरू असून वैद्यकीय अधिकारी डॉ.आनंद मेने यांचे पथक त्याच्यावर उपचार करीत आहेत. या अपघातामधील मृतांमध्ये सलमान आली मौला अली, सत्यनारायण बळाई, लालू मीना, कदीरमेवाती, आलम अली यांचा समावेश आहे. यामध्ये एक जण राजस्थानमधील असून इतर मध्य प्रदेशातील असल्याचे पोलिसांनीसांगितले.

# हवामानतज्ज्ञ पंजाबराव डख उमरखेडमध्ये

आधुनिक केसरी न्यूज

**उमरखेड :** गेल्या तीन चार वर्षापासून



हवामानाच्या लहरीपणामुळे शेतकऱ्यांना खरीप, रब्बी व उन्हाळी पिकांना मोठा फटका बसतो आहे. शेतकऱ्यांना नेमका पावसाचा अंदाज सांगण्यासाठी हवामान तज्ञ पंजाबराव डख हे आज उमरखेड मध्ये येणार आहेत. गो. सी. गावंडे महाविद्यालयात आयोजित या कार्यक्रमातची सुरुवात 11 वाजता होणार असून या कार्यक्रमाला शेतकरी नेते माधवराव पाटील शेळगावकर हे उपस्थित राहणार असून प्रमुख अतिथी म्हणून आ.नामदेव ससाने तर कार्यक्रमाचे अध्यक्ष यवतमाळ जिल्हा अखिल कुणबी समाज संस्थेचे अध्यक्ष राम देवसरकर हे राहणार आहेत. या कार्यक्रमाला साहेबराव कांबळे बेलखेडकर, आ. प्रकाश पाटील देवसरकर मा. आ. उत्तमराव इंगळे, मा. आ. राजेंद्र नजरधने, मा. आ. विजयराव खडसे, तातु देशमुख, भाजपा जिल्हाध्यक्ष नितीन भुतडा, रामदास सुंमठाणकर, प्रा. मोहन मोरे, डॉ. अंकुश देवसरकर, चितंगराव कदम, डॉ. विजय माने ,गोपाल अग्रवाल, राजू भैय्या जयस्वाल, ॲड. संतोष जैन,बाळासाहेब चंद्रे, कृष्णा पाटील देवसरकर, विजयराव नरवाडे, उपविभागीय अधिकारी डॉ. व्यंकट राठोड, विभागीय पोलीस अधिकारी प्रदीप पाडवी, तहसीलदार आनंद देऊळगावकर, मुख्याधिकारी महेश कुमार जामनेर, गटविकास अधिकारी प्रवीण कुमार वानखेडे, ठाणेदार अमोल माळवे, वाहतूक शाखाप्रमुख सतीश खेडेकर, तालुका कृषी अधिकारी गंगाधर बळवंतकर , अतुल कुमार कदम, वनपरिक्षेत्र अधिकारी एस एस पांडे, प्राचार्य डॉ. एस बी कदम आदी उपस्थित राहणार आहेत.

# रानडुकराची शिकार करताना वाघीण जखमी

आधुनिक केसरी न्यूज

**यवतमाळ :** रखरखत्या उन्हामुळे टिपेश्वर अभयारण्यातील वाघांचा जीवही कासावीस झाला आहे. तहान भागविण्यासाठी वाघ पाणवठ्यावर येत असल्यामुळे पर्यटकांचीही या ठिकाणी गर्दी वाढली आहे. दरम्यान, पाणवठ्यावर आलेली एक वाघीण जखमी असल्याचे पर्यटकांनी टिपलेल्या छायाचित्रात दिसून आले. वनविभागाचे अधिकारी तिच्यावर लक्ष ठेवून आहेत. दोन दिवसांपूर्वी रानडुकराची शिकार करताना वाघीण जखमी झाल्याची माहिती मिळाली. तिच्या मागील पायाच्या मांडीवर जखम आहे. रानडुकराची शिकार करताना त्याचे दात लागल्यामुळे जखम झाल्याची शक्यता आहे. अनेक पर्यटकांनी या जखमी वाघिणीला कॅमेरात टिपले. सफारीमधील जिप्सीवर कार्यरत गाईडने दिलेल्या माहितीप्रमाणे, टिपेश्वर अभयारण्याचे वनअधिकारी तसेच पशुवैद्यकीय अधिकारी या वाघिणीवर लक्ष ठेवून आहे.





महाराष्ट्र Business Katta












# नागरिकत्व



नुरखाँ पठाण, रायगड
संपर्क क्र. : 7276526268


आधुनिक केसरी

**आपल्या संविधानातील 'भाग दोन' हा नागरिकत्वासंदर्भात आहे. या भागात 'भारताची नागरिकता' कोणाकोणाला लागू आहे, ती कशी मिळते वा काढून देखील कोणकोणत्या कारणांनी घेता येते, याबाबत सविस्तर माहिती देण्यात आलेली आहे. भाग दोन मधील अनुच्छेद-५ ते ११ अशा एकूण ७ अनुच्छेदांमध्ये याबाबत चर्चा करण्यात आलेली आहे. यापैकी अनुच्छेद-५ ते ८ यादरम्यान सर्वसाधारणपणे एकाच प्रश्नाचे उत्तर देण्यात आलेले आहे आणि ते म्हणजे, संविधानाच्या प्रारंभी, म्हणजेच २६ जानेवारी १९५० रोजी नेमक्या कोणकोणत्या व्यक्तींना आपल्या देशाची नागरिकता देण्यात येईल. आता ह्या अनुच्छेदांकडे वळण्याआधी नागरिकता म्हणजे नक्की काय? हे आपण प्रथमतः बघुया....**

आपण आपल्या राज्यघटनेच्या भाग-दोन मध्ये असलेल्या नागरिकत्वाबाबतच्या तरतुदींविषयी जाणून घेण्याचा प्रयत्न करत आहोत. आजच्या भागात आपण अनुच्छेद-६ विषयी जाणून घेण्याचा प्रयत्न करणार आहोत. या अनुच्छेद-६ मधील तरतुदींची पार्श्वभूमी ही आपल्या देशाची १९४७ ला झालेली फाळणी आहे. म्हणजेच अनुच्छेद-६ भारताची फाळणी झाल्यामुळे निर्माण झालेल्या नागरिकतेच्या समस्येवर तोडगा काढण्यासंदर्भात भाष्य करतो. देशाची पाळणी झाल्यानंतर निर्माण झालेल्या पाकिस्तानच्या राज्यक्षेत्रातून स्थलांतर करून भारतात आलेल्या व्यक्तींना नेमक्या कोणत्या अटींवर भारतीय नागरिकत्व देण्यात येईल, याविषयी सविस्तर तरतुदी या अनुच्छेद-६ मध्ये करण्यात आलेल्या आहेत. आणि म्हणूनच हा अनुच्छेद-६ केवळ पाकिस्तानशीच संबंधित नागरिकांविषयी भाष्य करतो, याव्यतिरिक्त अन्य दुसऱ्या कोणत्याही देशांविषयी बोलत नाही.

आपला देश स्वतंत्र होत असताना उद्‌भवलेल्या फाळणीच्या समस्येमुळे फार मोठ्या प्रमाणावर स्थलांतर झालेले होते. त्यामुळे नागरिकत्वाबाबत सुस्पष्ट तरतुदी आपल्या राज्यघटनेत करणे अत्यंत आवश्यक होते. या तरतुदी करताना फाळणी दरम्यानच्या कालखंडात पाकिस्तानच्या राज्यक्षेत्रातून भारताच्या राज्यक्षेत्रात स्थलांतर करून आलेल्या व्यक्तींचा विचार करणे देखील गरजेचे होते. आणि म्हणूनच या व्यक्तींचा विचार करून आपल्या घटनाकारांनी या संबंधित अनुच्छेद-६ चा समावेश आपल्या राज्यघटनेत केला. या अनुच्छेद-६ चे शीर्षकच मुळात 'पाकिस्तानातून स्थलांतर करून भारतात आलेल्या विवक्षित व्यक्तींचे नागरिकत्वाचे हक्क' असे असून यात पाकिस्तानातून भारतात स्थलांतर करून आलेल्या नागरिकांना कोणत्या आधारावर भारतीय नागरिकत्व देण्यात येईल, याविषयी तरतुदी करण्यात आलेल्या आहेत. आपण या अनुच्छेद-६ चे कायदेशीर वाक्य जसेच्या तसे पाहूया..

अनुच्छेद-६ः- पाकिस्तानातून स्थलांतर करून भारतात आलेल्या विवक्षित व्यक्तींचे नागरिकत्वाचे हक्क : अनुच्छेद-५ मध्ये काहीही असले तरी, जी



भाग -१७

व्यक्ती, आता 'पाकिस्तानात' सामाविष्ट असलेल्या राज्यक्षेत्रातून स्थलांतर करून भारताच्या राज्यक्षेत्रात आलेली आहे ती व्यक्ती; जर-- खंड (१) तिचा अथवा तिच्या मातापित्यांपैकी किंवा तिच्या आजा-आजींपैकी कोणाही एकाचा गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्ट १९३५ (मुळात अधिनियमित केल्याप्रमाणे) यात व्याख्या केलेल्या भारतात जन्म झालेला असेल तर; आणि खंड (२) - उपखंड (एक):- अशा व्यक्तीने १९ जुलै १९४८ या दिवसापूर्वी याप्रमाणे स्थलांतर केलेले असेल त्याबाबतीत, आपल्या स्थलांतराच्या दिनांकापासून ती भारताच्या राज्यक्षेत्रात सामान्यतः निवासी असेल तर; **किंवा** उपखंड (दोन):- अशा व्यक्तीने १९ जुलै १९४८ या दिवशी किंवा त्यानंतर याप्रमाणे स्थलांतर केलेले असेल त्याबाबतीत, तिने नागरिकत्वासाठी डोमिनिअन ऑफ इंडियाच्या सरकारने नोंदणीसंबंधात नियुक्त केलेल्या अधिकाऱ्याकडे, त्या सरकारने विहीत केलेल्या नमुन्यात व रीतीने या संविधानाच्या प्रारंभापूर्वी केलेल्या अर्जावरून, अशा अधिकार्याने तिची भारताची नागरिक म्हणून नोंदणी केलेली असेल तर, या संविधानाच्या प्रारंभी भारताची नागरिक असल्याचे मानले जाईल. परंतू असे की, कोणतीही व्यक्ती आपल्या अर्जाच्या दिनांकाच्या लगतपूर्वी निदान सहा महिने भारताच्या राज्यक्षेत्रात निवासी असल्याशिवाय तिची याप्रमाणे नोंदणी केली जाणार नाही.

अनुच्छेद-६ मध्ये करण्यात आलेली तरतुदी मुळातच पाकिस्तानच्या राज्यक्षेत्रातून स्थलांतर करून भारतात आलेल्या व्यक्तींसंदर्भात आहेत आणि म्हणूनच या अनुच्छेदाची सुरुवात ही 'अनुच्छेद-५ मध्ये काहीही असले तरी....' अशी करण्यात आलेली आहे. अनुच्छेद-५ मध्ये संविधानाच्या प्रारंभी भारतीय नागरिकत्व देण्यासंदर्भातल्या तरतुदींचा समावेश आहे. आपण त्या तरतुदींविषयी "आपले संविधान.... राज्यपद्धतीच नव्हे, तर जीवनपद्धती" या आपल्या लेखमालेच्या याअगोदरच्या भागामध्ये सविस्तरपणे बघितलेली आहे. आता या अनुच्छेद-५ मध्ये नागरिकत्व संदर्भात काही जरी तरतूद असली, तरी ती इथे अनुच्छेद-६ मध्ये पाकिस्तानातून स्थलांतर करून भारतात आलेल्या ज्या व्यक्तींचा उल्लेख आहे, त्यांना ती लागू होणार नाही, असा ह्या अनुच्छेद-६ च्या झालेल्या सुरवातचा स्पष्टपणे अर्थ आहे. जर अनुच्छेद-५ मधील अटी ह्या व्यक्तींना लागू होणार नसतील, तर मग त्या व्यक्तींना नागरिकता कोणत्या अटींवर देण्यात येईल ? या प्रश्नाचे उत्तर म्हणजेच या अनुच्छेद-६ चे विश्लेषण जागेअभावी आपण आपल्या लेखमालेच्या पुढील भागात पाहूया...

# दुसऱ्यांवर हसणाऱ्याचे कधी भले झाले का..?



संगीता ठलाल
७८२१८१६४८५

आधुनिक केसरी

**माणसाचे जीवन जगत असतांना प्रत्येकांच्या जीवनात अनेक संकटे, सुख, दुःख,अडी, अडचणी येतच असतात आणि ते आजपर्यंत कोणालाही चुकले नाही. या विषयी सर्वांनाच चांगल्याप्रकारे माहीतच असेल. ..म्हणून इतर गोष्टींकडे लक्ष न देता स्वतःही हसत, खेळत रहावे व इतरांनाही हसवत ठेवावे आणि आपल्या शेवटच्या श्वासापर्यंत हसतच रहावे असे, अनेक जण म्हणत असतात. कारण, हसणे एक प्रकारचे जीवन आहे.पण,सध्याच्या घडीला मात्र समाजात राहणारे काही लोक स्वतः तर..खूप हसत, खेळत, आनंदात राहताना दिसतात पण,दुसऱ्यांचे हसणे हिसकावून घेण्यासाठी ते, संधी सोडत नाही हे, काल्पनिक नसून वास्तव सत्य आहे.**

त्या प्रकारची विचारसरणी असलेल्यांना इतरांचे वाईट झाले तर.. हसू आवरत नाही त्यांना बघताच वारंवार हसायला सुरुवात करतात एवढेच नाही तर..त्यांची थट्टा, मस्करी करून व टोमने मारून जिवंतपणी मारत असतात. अशा लोकांची या समाजात कमतरता नाही कारण, ते, इतरांचे भले करु शकत नाही.गेल्या काही वर्षापुर्वी एका काळात अशाच काही इतर लोकांवर हसत होते, थट्टा करत होते पण शेवटी त्यांचीच कशी अवस्था झाली होती आपण कुठेतरी वाचले असणार ..बरेचदा.दुसऱ्यांवर हसायला खूप सोपे वाटते पण,जेव्हा, दुसऱ्यांवर खळखळून हसणाऱ्यांवरती तीच वेळ येत असते तेव्हा, मात्र हसणे कसे असते त्या, हसण्यालाच कायमचे विसरून जातात. ते,आधीही होते आजही आहेत आणि समोर सुद्धा हीच परिस्थिती बघायला मिळणार आहे.कारण, हे घोर कलियुग आहे इथे व्यर्थ गोष्टींना जास्त प्रमाणात साथ दिली जाते व त्यांचीच रात्रंदिवस ओढ लागलेली असते सत्याच्या वाटेवर चालत कशा प्रकारे जीवन जगावे लागते व दिवस कसे काढावे लागते याचा अभ्यास त्यांना मुळातच नसतो म्हणून ते, अज्ञानी होऊन दुसऱ्यांवर वारंवार हसत असतात अशा हसण्याला हसणे म्हणत नाही तर..स्वतः चा समाधान करणे असे, म्हणतात.

अशा प्रकारचा समाधान जेव्हा त्यांना मिळतो फक्त, तो समाधान काही वेळा पुरतं मर्यादित असतो आणि त्या वेळी, त्याच विचाराचे लोक साथ देत असतात पण,एकदा की,ती परिस्थिती बदलली की मात्र कोणाचीही साथ मिळत नाही त्या क्षणी त्यांच्या डोळ्यात अश्रू तर असतातच पण इतरांना दाखवणे होत नाही, खुलेपणाने जगू शकत नाही व आतमध्ये कुटत असतात असे अनेक उदा.नेहमीच समाजात बघायला मिळत असतात.

म्हणून कोणत्याही माणसाने स्वतः चा समाधान करण्यासाठी दुसऱ्यांवर एवढेही हसू नये की,एक दिवस हसते, खेळते जीवन जगायचे सोडून कायम रडण्याची वेळ येईल... म्हणतात ना की, प्रत्येकांचे दिवस निघत असतात कधी, कधी राजाचा रंक होतो व कधी रंकाचा राव होतो, गरीब श्रीमंत होतो व श्रीमंत कंगाल सुद्धा होतो या विषयी माहिती असताना दुसऱ्यांवर खळखळून हसणे माणुसकी पणाचे लक्षणे



नव्हेत तर..आतमध्ये कुविचारांची संगत असते हेच त्याचे परिणाम असू शकतात. कारण, कुविचारांची संगत दुसऱ्यांचे भले व्हावे याचा विचार कधीच करत नसतात तर.. दुसऱ्यांचे वाईट कधी होईल. .त्याला हरवायला मला संधी कधी मिळेल..त्या वेळेची आवर्जून वाट बघत असतात. म्हणून आजपर्यंत दुसऱ्यांवर हसणाऱ्याचे कधी भले होताना आपण बघितले आहात का. ..? व कधी काळी जर..भले झाले ही असले तरी पण,फक्त, काही क्षणापुरतेच असते व तोच क्षण त्यांना सर्वात आनंदाचा, उत्साहाचा वाटतो. व त्यातच आपले सारे जीवन व्यर्थ गोष्टींच्या मागे लागून वाया घालवत असतात काही दिवसांनी दुसऱ्यांवर हसल्याने काय परिणाम होतात सर्व हळूहळू कळायला लागतात तेव्हा मात्र , जगणेही नकोसे वाटते,शरीरही साथ देत नाही, जवळ संपत्तीही नसते , जवळचे मित्र, नातेवाईक ओळखायला तयार होत नाही, ऐन अशा वेळी दुसऱ्यांवर आलेली परिस्थिती पाहून खळखळून हसणारा माणूस एक सारखा रडत असतो व कुठेतरी आपुलकी शोधत असतो तेही मिळत नाही म्हणून अशा वृत्तीच्या माणसाजवळ मृत्यू सुध्दा यायला विचार करतो म्हणतात ना की, मृत्यू जेवढी चांगली असते तेवढीच भयानक असते दुसऱ्यांवर हसल्याने किती मोठा पाप होतो तीला माहीत असते म्हणून ती,परत मागे निघून जाते म्हणून कोणत्याही माणसांनी दुसऱ्यांवर आलेल्या वाईट परिस्थितीचा फायदा घेऊन हसू नये व व्यर्थ पाप करू नये होऊ शकेल तर माणुसकी च्या नात्याने दुःखी माणसाच्या जीवनात आनंद आणण्यासाठी प्रयत्न करावे व त्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवावे हाच खरा माणुसकी धर्म आहे.

# पराभूत सुद्धा विजयाचा मार्ग दाखवू शकतो



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**जीवनाचा उत्कर्ष व्हावा म्हणून आपण वेगवेगळ्या क्षेत्रात आपलं प्रभुत्व निर्माण करण्यासाठी प्रयत्नशील असतो.हेच प्रयत्न अंतिमतः यशा पर्यंत घेऊन जातात. प्रभुत्व म्हणजेच यश अशी सर्वसाधारण धारणा असली तरी आपण ज्या क्षेत्रात आपल प्रभुत्व निर्माण करण्यासाठी प्रयत्न करत आहोत त्या क्षेत्रात अगदी सहजपणे आपलं प्रभुत्व निर्माण होत नाही. त्यासाठी कित्येक वर्ष खर्ची घालावी लागतात . त्याच बरोबर खडतर संघर्ष अहोरात्र मेहनतही घ्यावी लागते. त्यांचं बरोबर अनेक बारीकसारीक बाबींचा काटेकोर पालन करावं लागतं आणि एवढ सगळं करून सुद्धा यश मिळेलच याची खात्री नसते मिळाले तर उत्तम आणि नाही मिळाले तर पुढे आणखी आपण शिकायचे व इतरांना शिकावायचे आहे .**

असा मनोनिग्रह करून प्रयत्न केले पाहिजे. कधी कधी अनेक वर्ष खर्ची घालुन सुद्धा यश मिळत नाही .अशा वेळी आपण निराशेच्या गर्तेत सापडता कामा नये तसेच दुःखी न होता चिंता न करता इतरांच्या जीवनामध्ये यशाचा वृक्षवेल निर्माण करण्यासाठी समर्पित भावनेने कार्य केले पाहिजे.जीवन म्हणजे यश अपयशाचा लपंडाव असतो .जीवन जगातान यश आणि अपयश या पैकी जे लाभेल ते पचवता आलं पाहिजे .यश हे सगळ्यांचा हवं हवस असतं.पण शक्यतो अपयश हे कोणालाही नको असतं हे वास्तव आहे.पण पदरी पडलं तर पर्याय पण नसतो . यदाकदाचित जर आपल्या वाट्याला अपयश आलं तर आपण चिंतित न होता खचुन न जाता इतरांना योग्य मार्गदर्शन करून यशस्वी होण्याचा मार्ग कसा दाखवता येईल यासाठी प्रयत्नशील असल पाहिजे.आपल गणित कुठे चुकल हे अनुभवाने योग्य वेळी समजत . प्रयत्न करणं आवश्यक असतं यश ,अपयश फार महत्वपूर्ण नसतं .यश मिळालं तर पुढे जाता येत अपयश पदरी पडलं तर इतरांच्या साठी मार्गदर्शक होता येत . स्वतः घडण अथवा इतरांना घडविण्यासाठी सहकार्य करणं हे जवळपास सारखच असतं . प्रयत्न केल्यानंतर यश येण नाही येणं हा वेळेचा काळाचा भाग आहे.पण प्रयत्नांची पराकाष्ठा न करणं हे उचित ठरणार नाही.



आयुष्यात अनुभव हाच गुरू ठरतो .जय पराजय हा वेळेचा प्रभाव असल्याने वेगवेगळ्या क्षेत्रातील यशासाठी आपण जेव्हा मार्गक्रमण करत असतो त्या वेळी आपल्याला त्याच क्षेत्रातील योग्य मार्गदर्शकाची आवश्यकता असतेच . विजयी होणारा व्यक्ति विजयी निश्चित ठरतो या मध्ये शंका नाही पण आपण कुठे कुठे चुकलो कुठं कमी पडलो कोणत्या वेळेला काय निर्णय घेणं अपेक्षित होतं .आपल गणित नेमकं चुकलं कस हे फक्त पराजयी व्यक्तिलाच समजतं कळत .आणि तो त्या मधुन योग्य बोध घेऊन इतरांच्या साठी उत्तम मार्गदर्शक ठरू शकतो .मार्गदर्शक म्हणून विजयी व्यक्ति पेक्षा पराजयी व्यक्ति उत्तमपणे यशस्वी होण्याचा यशस्वी मार्ग दाखवु शकतो या मध्ये तीळमात्र शंका नाही. पराभुत व्यक्तीला आपण कुठे चुकलो हे माहीत असतं . कोणत्या चुकीमुळे आपल्याला यशोशिखरावर पोहचण्या पासून वंचित राहावे लागले याची जाणीव असते. पराभवाचे योग्य चिंतन पराभुत व्यक्तिने केलेलं असतं .यश अपयश हे आपण केलेली प्रचंड अंखडित मेहनत, आपली जिद्द, दैदिप्यमान इच्छाशक्ती, प्रचंड चिकटी खडतर संघर्ष यावर अंवलबुन तर असतेच पण याच बरोबर आपण यशाचा मार्ग गाठताणा कोणाला तरी आपला मार्गदर्शक म्हणून पाहत असतो .अथवा कोणाचं तरी मार्गदर्शन घेऊन मार्गक्रमण करत असतो . यशाच्या संदर्भात मार्गदर्शन घेताना पराभुत अथवा अपयश आलेल्या व्यक्तिने दाखवलेला मार्गच यशाचा द्वार गाठतो . यशस्वी व्यक्तीला अडचण संकटं आलेलच नसतं म्हणून खाचखळगे अडवाटा अडचणी त्याला फार माहित नसतात आणि मार्गदर्शन करण्या एवढा वेळ पण त्यांच्या कड नसतो.महणुन जीवनात व्यर्थ काहीच नसतं ठरवलं तर अपयशाच पण सोन करता येत . स्वतः यशस्वी होऊन स्वतः पुरत मर्यादित रहता येऊ शकत पण अपयश आल्यानंतर सुद्धा अनेकांना मार्गदर्शन करून त्यांच्या जीवनात प्रकाश निर्माण करता येतो . त्यामुळे यश अपयश याच मुल्यमापन करताना खूप साध सरळ सोपं आहे यश मिळाल तर पुढे जा अपयश आलं तर पुन्हा प्रयत्न करा पुन्हा प्रयत्न करूनही अपयश आलं तर इतरांना यशाचा मार्ग दाखविण्यासाठी कार्य करा .हेच उत्कृष्ट आणि उत्तम कार्य आहे.

# लहान लहान नद्या वाचवायला हव्यात



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

आधुनिक केसरी

**दक्षिण-पूर्व राजस्थानच्या बुंदी जिल्ह्यात एक छोटेसे गाव आहे - सथूर. या गावात वर्षानुवर्षे एकाही नदीचे अस्तित्व लोकांना दिसले नव्हते.अलीकडेच कोटा येथील काही विचारवंत आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी पुरातत्वशास्त्रज्ञांच्या मदतीने या गावातील एका लहान नदीचा प्रवाह शोधून काढला. चंद्रभागा नावाची ही नदी गावाभोवती नाल्याच्या रूपात वाहते. अनेक दशकांपासून याला नाला मानणारे स्थानिक लोक हा नाला म्हणजे एका प्राचीन नदीचे अवशेष आहे हे जाणून रोमांचित झाले आहेत. आता या साथुर नदीचे वैभव परत आणण्यासाठी प्रयत्न सुरू झाले आहेत.**

सततच्या दुर्लक्षामुळे घाण नाल्यात रुपांतर झालेली ही काही देशातील एकमेव नदी नाही. जयपूरच्या अमानिशाह नाल्याचे प्रकरण तर देशभर चर्चेत होते. जयपूर शहराच्या आजूबाजूला जेव्हा जेव्हा मुसळधार पाऊस पडत असे तेव्हा तेव्हा हा नाला ओसंडून वाहत असे आणि आजूबाजूच्या वस्त्यांमध्ये पूरसदृश परिस्थिती निर्माण होत असे. नंतर पुरातत्वशास्त्रज्ञांनी सांगितले की, खरे तर हा नाला 'द्रव्यवती' या प्राचीन नदीचा प्रवाह मार्ग आहे. लोकांच्या दुर्लक्षामुळे आणि निष्काळजीपणामुळे संपूर्ण नदीचे नाल्यात रूपांतर झाले आहे. नदीपात्रात अतिक्रमण झाले होते. काही वर्षांपूर्वी या नदीचे पुनरुज्जीवन करण्याचा ठराव शासनाने घेतला. नदीला जीवनदान मिळाले आणि आज द्रववती नदीचा किनारा जयपूर शहराच्या मुख्य आकर्षणांपैकी एक झाला आहे. अशाच प्रकारे लोकांच्या सहभागातून महाराष्ट्रातील सांगली जिल्ह्यातील अग्रणी नदी आणि पंढरपूरच्या चंद्रभागा नदीची उपनदी झालेली कासाळगंगा, राजस्थानमधील करौली जिल्ह्यातील महेश्वरा नदी व सैरनी नदी, उत्तर प्रदेशातील ललितपूर जिल्ह्यातील बंडई नदी, महाराष्ट्रातील बीड जिल्ह्यातील अंबेजोगाईची होळणा आणि वाणा नदी पुनर्जीवित झाल्या आहेत. नाल्यात रूपांतर झालेल्या लहान लहान नद्यांना लोक चळवळीतून पुनर्जीवित केले जात आहे, ही मोठी सकारात्मक गोष्ट म्हणावी लागेल. मात्र अजूनही फार मोठे काम हाती घ्यावे लागणार आहे. डॉ. राजेंद्र सिंह म्हणतात, लोकसहभागातून जलसंवर्धन आवश्यक आहे. जवळपास 13 हजार 800 जलस्रोत लोकसहभागातून पुनरुज्जीवित केले. त्याद्वारे तब्बल 17 लाख लोकांना रोजगार मिळाला. पाण्याचे संकट ही जागतिक समस्या असली, तरी त्यावरील उपाय हा स्थानिक आहे- आपल्याकडे कमी वेळात जास्त पाणी उपसा व प्रदूषण करणारे आहेत, परंतु जलसंवर्धकांची कमतरता आहे - आधुनिक शिक्षण पद्धती माणसाला स्वार्थी बनवत आहे- देशात 17 राज्ये आणि 365 जिल्ह्यांना पाणी टंचाई, दुष्काळाने ग्रासले आहे. आपल्याकडील 30 टक्के जमीन पुराखाली, तर 60 टक्के जमीन दुष्काळाखाली आहे. ही विसंगती कमी झाली पाहिजे. भारतीय जीवनात नद्यांना खूप महत्त्व आहे. म्हणूनच नद्यांना माता म्हणतात. त्यावेळची गोष्ट आहे, जेव्हा दिवसाची सुरुवात नद्यांच्या काठावरुन व्हायची. नदीच्या काठावर स्नान आणि ध्यान केल्याने घाटांचे सौंदर्य टिकून राहायचे. पण माणसाला लागणारे पाणी नळांद्वारे घराघरात पोहोचले, तेव्हा नद्या, विहिरी, तलाव, सरोवरे, जोहाड या सर्वांचे महत्त्व कमी होऊ लागले. नद्यांच्या पाण्याच्या वापराशी पुण्य आणि सुखाच्या प्राप्तीशी जोडली असल्याने नद्यांशी निगडीत कर्मकांडाची जाणीव मानवाला राहिली, पण नद्यांच्या प्रवाहाची शुद्धता राखण्याच्या जबाबदारीकडे त्याने पाठ फिरवली.हळूहळू नद्यांची दुर्दशा होऊ लागली.

महाभारतात एके ठिकाणी लिहिले आहे - 'अतिपरिचयाद्



अवग्या भवति'. खूप जवळीक कधी कधी दुर्लक्षाचे कारण बनते. नद्यांचेही तेच झाले. जोपर्यंत मानवाला नद्यांची गरज होती तोपर्यंत त्याने त्यांची खऱ्या मनाने पूजा केली. जेव्हा त्यांची गरज भागते तेव्हा त्याची उपासना ढोंगी बनते. या दुर्लक्षामुळे छोट्या नद्यांना खूप त्रास झाला.त्यांचे पाणलोट क्षेत्र कमी असल्याने साहजिकच दुर्लक्ष झाल्याने त्यांचे रूपांतर नाल्यात झाले. अनेक ठिकाणी नद्यांच्या काठावरील अतिक्रमणामुळे नद्यांचे अस्तित्वच संपुष्टात आले आहे. मुंबईतील मिठी, दहिसर, ओशिवरा आणि पैसार नद्यांची सद्यस्थिती दर्शवते की माणसाच्या जमिनीच्या अखंड लोभामुळे नद्यांचे काय हाल झाले आहेत. काही वर्षांपूर्वी जेव्हा चेन्नईला पूर आला होता, तेव्हा कूम, अडयार आणि कोर्टलाय्यार नद्यांच्या बाजूने वस्त्या झाल्यामुळे पावसाचे पाणी वस्त्यांमध्ये शिरल्याचे दिसून आले. ही कोणत्याही एका शहराची गोष्ट नाही. वास्तविक देशभरातील लहान नद्या त्यांच्या दुर्दशेवर अश्रू ढाळत आहेत. पुराणानुसार, राजा दुष्यंत आणि शकुंतला यांची भेट कण्व ऋषींच्या आश्रमात झाली, तिच्या बाजूने एक नदीही वाहत होती. कोचिंगसाठी देशभरात प्रसिद्ध असलेले कोटा शहरात एक ऐतिहासिक ठिकाण आहे - कानसुआ. येथे महर्षी कण्वांचा आश्रम होता असे म्हणतात. पण त्या 'मालिनी' नदीचे नाव कानसुआमध्ये आढळत नाही. मात्र जर तुम्ही प्राचीन मंदिराच्या छतावर चढलात, तर तुम्हाला नदीच्या प्रवाहाच्या खुणा स्पष्टपणे दिसू शकतात, जी आता एका गलिच्छ औद्योगिक नाल्याचा प्रवाह बनली आहे. सत्तरीच्या दशकापर्यंत पावसाळ्याच्या दिवसात या ठिकाणचे दृश्य अतिशय मनमोहक असायचे. हा एकेकाळी पावसाळी नदीचा प्रवाही मार्ग असावा हे स्पष्ट आहे. उत्तर प्रदेशातील फैजाबाद जिल्ह्यातील सुमारे अर्धा डझन लहान नद्यांचे अस्तित्व संकटात आहे. यामध्ये गोमतीच्या उपनद्यांची नावे देखील समाविष्ट आहेत - तिलोडकी, तमसा, मधा, बिसुही आणि कल्याणी. तमसा आणि कल्याणी नद्या पौराणिकदृष्ट्या महत्त्वाच्या मानल्या जातात. सहारनपूरची पावनधोई नदीही घाण नाल्यात रूपांतरित झाली होती, मात्र लोकांच्या जागृतीमुळे तिची वाईट अवस्था दूर करण्यात काही प्रमाणात यश आले आहे. पण काली हिंडन, मानसियत आणि गुंता या नद्या त्यांच्या उद्धाराच्या प्रतीक्षेत आहेत.उत्तराखंडच्या कुमाऊं विभागात स्वाल नदी आपले अस्तित्व गमावत आहे.

बिहारमधील कटिहारमधून जाणाऱ्या भासना, चापी, कमला आणि पलतानिया नद्या उन्हाळा सुरू होताच दम टाकतात. सातपुड्यातील दुधी, मच्छवासा, अंजन, ओल, पलकमती आणि कोरणी नद्यांची स्थितीही चांगली नाही. मध्य प्रदेशातील दुधी नदी काही काळापर्यंत बारमाही नदी मानली जात होती, परंतु आता तिची पाण्याची पातळी खूप खालावली आहे. देशातील अशा अनेक छोट्या नद्या काळाच्या ओघात पराभूत झाल्या आहेत. महाराष्ट्र राज्यातील 21 नद्या पुनरुज्जीवित करण्यासाठी माविआ सरकारने आवश्यक निधीचा प्रस्ताव निती आयोगाकडे पाठविला होता.

छोट्या नद्यांच्या दुर्दशेमुळे मोठ्या नद्यांच्या पाण्याचा प्रवाहही कमी झाला आहे. नॅशनल रिसर्च इन्स्टिट्यूट, नागपूरने काही दिवसांपूर्वी एका अहवालात म्हटले होते की, गंगा, यमुना, नर्मदा, गोदावरी आणि कावेरी यासह देशातील चौदा प्रमुख नद्यांमध्ये देशातील ८५ टक्के पाण्याचा प्रवाह आहे.या सर्व नद्या इतक्या प्रदूषित झाल्या आहेत की, देशातील सहासष्ठ टक्के आजारांचे कारण या नद्या ठरत आहेत. अशा प्रकारे, देशातील सुमारे 223 नद्यांमध्ये असे आढळून आले आहे की, तुम्ही त्यामध्ये स्नान करू शकत नाही आणि त्यांचे पाणी पिऊ शकत नाही. ही परिस्थिती भीतीदायक आहे. विशेषतः जेव्हा तज्ज्ञांचा असा विश्वास आहे की 2030 पर्यंत जगातील पाण्याची मागणी एकूण पुरवठ्यापेक्षा जास्त होईल.याचं एक मोठं कारण हेही आहे की आपण नद्यांच्या प्रवाहात अडथळे आणले आहेत, अडथळे निर्माण केले आहेत आणि त्यात आपला आत्मा ओतणाऱ्या छोट्या नद्यांची आपण पर्वा केली नाही. नद्यांच्या काठावर अतिक्रमण करून आम्ही विकासाचा नारा बुलंद करत आहोत. साहजिकच नद्या दुःखी नसतील तर काय? ब्रिटन, फ्रान्स, जर्मनी, नेदरलँड्ससह युरोपातील विविध देशांमध्ये नद्यांचे बंधारे तोडले जात असून नद्यांना उत्स्फूर्त प्रवाहाचे स्वातंत्र्य दिले जात आहे.या संदर्भात, लहान नद्यांचे पुनरुज्जीवन करणे अत्यंत आवश्यक आहे, कारण लहान नद्या केवळ विशिष्ट क्षेत्राची पाण्याची गरज भागवत नाहीत, तर अनेक लहान नद्या मिळून एक मोठी नदी आपल्या समर्पणाने समृद्ध करतात. छोट्या नद्या वाचवण्यासाठी संसाधनांपेक्षा अधिक दृढनिश्चय आवश्यक आहे. गुरु नानकदेव यांनी एकदा पंजाबमधील सात किलोमीटर लांबीच्या कालीबाई नदीच्या काठावर काही दिवस घालवले होते, परंतु आज सर्वांच्या दुर्लक्षामुळे नदीचे नाल्यात रूपांतर झाले होते. संत बलवीर सिंग सिचेवाल यांनी ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाची असलेली ही नदी वाचवण्याचा संकल्प सोडला. त्यांचे समर्पण पाहून लोक सामील होत गेले आणि आज कालीबाई नदी पुन्हा पूर्ण सौंदर्याने वाहत आहे. लहान नद्यांबाबत संवेदनशील असायला हवे, अन्यथा येणारे दिवस संपूर्ण समाजासाठी खरोखरच कठीण असतील.

# मुलांनो मैदानात या......



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र. : ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**आजचे युग हे विज्ञान तंत्रज्ञानाचे युग समजले जाते. २१ व्या शतकातील या विज्ञान तंत्रज्ञानाच्या युगात स्मार्ट फोन, इंटरनेट हे प्रत्येकाच्या जीवनातील अविभाज्य घटक बनले आहेत. केवळ घरातील मोठ्या माणसंकडेच नव्हे तर शाळकरी मुलांकडे देखील मोबाईल फोन पाहायला मिळत आहे. कोरोना काळात ऑनलाइन शिक्षणासाठी पालकांनी घेऊन दिलेला मोबाईल अजूनही मुलांच्या हातात आहे. हाच मोबाईल आज मुलांचा सर्वात जवळचा सहकारी बनला आहे. सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत मुले मोबाईललाच चिकटून बसलेली असतात.**

आजच्या विज्ञान तंत्रज्ञान युगात मोबाईल हा गरजेचा आहे. तो गरजेपुरातच वापरला गेला पाहिजे मात्र आज मुलांसाठी मोबाईल हेच सर्वस्व होऊन बसले आहे. आजच्या मुलांना मोबाईलने भुरळ घातली आहे. दिवसातील पाच ते दहा तास मुले मोबाईल वरच असल्याने मुलांची शारीरिक व बौद्धिक वाढ खुंटत चालली आहे त्यामुळे मुलांचे बालपण हरवत चालले की काय अशी शंका मनात येते. आजची मुले जास्त प्रमाणात टीव्ही, संगणक, मोबाईल, इंटरनेट, व्हिडीओ गेम, व्हाट्सएप, फेसबुक, इंस्टाग्राम यासारख्या सोशल मीडियात दंग असतात. तंत्रज्ञानरुपी राक्षसानं मुलांचं बालपणच खाऊन टाकलंय. पूर्वी शाळांना सुट्ट्या लागल्या की गावागावातील मैदाने मुलांनी भरून गेलेली असायची पण आज ती मैदाने विज्ञान तंत्रज्ञानाच्या युगात ओस पडली असल्याचे चित्र पाहायला मिळते. क्रिकेट वगळता एकही मैदानी खेळ खेळताना मुले दिसत नाहीत. देशी खेळ तर आजच्या मुलांना माहीतच नाहीत. गोट्या भोवरे विटीदांडू खेळताना कोणी दिसत नाही. आट्यापाट्या आणि सुरपारंब्या या खेळाचे नियम तर सोडाच पण नावही आजच्या मुलांना माहीत नाही. मोठे रिंगण घेऊन त्यात गोट्यांचा डाव लावल्याचे चित्र आज पाहायला मिळत नाही. गलगुट करून खेळणे व त्यावर राज्य द्यावे लागल्याचे हल्लीच्या मुलांमध्ये ऐकिवातही नाही. भोवऱ्याच्या रिंगणाचीही तीच अवस्था. दगडावर आरी घासून भोवऱ्याला टोक करीत बसलेला मुलगा शोधूनही सापडेनासा झाला आहे. जुन्या कपड्यांचा चेंडू तयार करून खेळला जाणारा रप्पाधप्पीचा खेळ हल्लीच्या मुलांना माहीतही नाही. लपंडाव, विटीदांडू,, लगोरी, कुरघोडी, चंपूल, उडाणटप्पू हे खेळ आता दुर्मिळ झाले आहेत. लंगडी हा खेळ आता फक्त शाळेतील पिटी च्या तासापूरता उरला आहे. या खेळांमुळे मुलांचा शारीरिक व्यायाम व्हायचा शिवाय संघभावना, एकी, आपुलकी, नेतृत्व हे गुण या खेळांमुळे मुलांमध्ये विकसित व्हायचे. या खेळाची जागा आता टीव्ही, संगणक, मोबाईल व्हिडीओ गेम यांनी घेतली आहे. टीव्ही, संगणक, व्हिडीओ गेममुळे मुलांना विविध खेळांची माहिती उपलब्ध होऊन त्यातून मुलांचा बौद्धिक विकास होतो असे वाटत असले तरी त्यांचा शारीरिक विकास खुंटत चालला आहे याचा समाजातील सर्व घटकांनी गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. मुलांना पुन्हा मैदानाकडे आणण्याची जबाबदारी पालक, शिक्षक व समाजातील सर्वच घटकांची आहे.

# सरकारने विकासकामे राबवून लोकप्रियता मिळवावी !



संतोष दत्तू शिंदे
संपर्क क्र. ७७२१०४५८४५

आधुनिक केसरी

**सद्या महाराष्ट्र सरकार "निर्णय गतिमान महाराष्ट्र वेगवान"अशी सवंग लोकप्रियतेसाठी जाहिरात करत आहेत. मात्र या टॅग लाईनला साजेशे असे महाराष्ट्र सरकार राज्यामध्ये विकासात्मक कामे करत आहे का ? असा प्रश्न उपस्थित होत आहे कारण मुंबई गोवा हा आंतरराज्य महामार्ग रस्ता गेली तेरा वर्षांहून अधिक काळ बनवला जात असून तो सुरु व्हायच्या अनेक वेळा तारखा देण्यात आल्या मात्र रस्ता काही पूर्ण झालाचं नाही देशांच्या आर्थिक राजधानीला जोडणारा आणि कोकण - गोवा पर्यटनाचे प्रवेशद्वार म्हणून समजला जाणारा अत्यंत महत्वाचा आणि गरजेचा हा महामार्ग होणे क्रमप्राप्त होते.**

मात्र या राज्यात अनेक सरकारे आली आणि गेली मात्र रस्ता आहे तसाच राहिला याला कोणी वाली नाही का ? असा देखील सवाल विचारला जावू लागला आहे मुंबई गोवा हा महामार्ग सुमारे ४७० कि.मी. लांबीचा असून अत्यंत रहदारीचा आहे तसेच अरुंद व खड्डेमय महामार्गावर अनेक अपघात होऊन गेल्या तेरा वर्षात अनेक प्रवाशांना आपला जीव गमवावा






लागला आहे हा महामार्ग केंद्र सरकारच्या अखत्यारीत येत असून केंद्रीय दळणवळण आणि रस्ते बांधणी मंत्री आपल्याचं महाराष्ट्र राज्याचे नितीन गडकरी आहेत असे सोपस्कर असताना हा महामार्ग का होत नाही ? याचे गौडबंगाल काय ? हे न समजण्यासारखे कोडे आहे राज्यात डब्बल इंजिन सरकार फक्त म्हणायला आहे का ? भारत सरकारच्या अखत्यारीतील अनेक रस्ते बांधणी करुन या विभागाचे मंत्री पाठ थोपटून घेत आहेत, सगळीकडे त्यांचा बोलबाला होत आहे मात्र मुंबई - गोवा पर्यटन व्यवसाय वृद्धीसाठी आणि कोकणातील अनेक महत्वाच्या शहरांना जोडणाऱ्या महामार्गासाठी त्यांचे प्रयत्न अपुरे पडत आहेत का ? ज्या प्रकारे महाराष्ट्र सरकार जाहिरातबाजी करत आहे तसे प्रत्यक्षात काम करुन दाखवावे अन्यथा आगामी निवडणुकीत जनता वेगळा विचार केल्याशिवाय राहणार नाही !



# भोजनाचा मनावर काय परिणाम होतो ?

यावर आपण एक उदाहरण बघू. तीन महिन्यांसाठी एक प्रयोग करून बघा. सात्त्विक अन्न खाण्यामुळे आपल्यात एक प्रकारचा बदल दिसून येतो. कारण जसे अन्न, तसे मन होते. सात्त्विक अन्न हे फक्त शाकाहारी नाही, तर ते ईश्वराचे स्मरण करून बनवलेले अन्न असते. जर आपण रागाच्या भरात स्वयंपाक केला असेल, तर त्यास सात्त्विक अन्न म्हणत नाहीत. म्हणून स्वयंपाक करणाऱ्याने कधीही रागाच्या भरात, उदास, नाराज होऊन स्वयंपाक करू नये. (जेवण बनवू नये. अन्न शिजवू नये.) तसेच स्वयंपाक करत असताना कधीही आईला, बहिणीला, पत्नीला (जे कोणी स्वयंपाक करत असतील, त्यांना) ओरडू नये, रागवू नये, त्यांच्याशी भांडू नये. कारण त्या स्थितीत त्या स्वयंपाकघरामध्ये जाऊन स्वयंपाक करत असताना, त्या पदार्थांत त्याच प्रकारची (सर्व रागाची) स्पंदने जातात आणि तेच आपण खाणार असतो. ही लक्षात ठेवण्याची महत्त्वपूर्ण गोष्ट आहे. आणि म्हणूनच पूर्वी सोवळ्याने स्वयंपाक करण्याची पद्धत होती. भोजन तीन प्रकारचे असते. (१) जे आपण हॉटेलमध्ये खातो, (२) जे घरात आई, पत्नी बनवते आणि (३) जे आपण मंदिरात अन्नकोटात खातो, ते भोजन. तिन्ही भोजनांत वेगवेगळी स्पंदने असतात. (१) हॉटेलमध्ये पदार्थ बनवतात, ते विकत घेऊन खावे लागते. ते आपण नेहमी खाल्ल्यास त्यातील स्पंदने आपणास आंतरिक समाधान देत नाहीत. त्यामुळे कधी कधी त्या अन्नाने आपणास त्रासही होतो. ते पदार्थ कोण शिजवतं, त्यावेळी त्याच्या मनात काय चालले आहे, त्याचा भाव कोणता आहे, ते सगळं त्या अन्नात उतरतं, तेच संस्कार त्या अन्नावर होतात. तोच भाव आपल्यात उतरतो. (२) घरात आई, पत्नी जे पदार्थ करते, ती फार प्रेमाने करत असते. म्हणून त्या पदार्थांत सात्त्विक स्पंदने असतात, ती आपणास समाधानी बनवतात. परंतु हल्ली अनेक घरात स्वयंपाकी ठेवले जातात. त्यांच्या मनातील विचार आपणास सुख देत नाहीत. घरात मुलगा जेवत असेल आणि आपल्या आईला म्हणत असेल, की मला अजून एक पोळी वाढ. तेव्हा आईचा चेहरा आनंदाने फुलून येतो. ती अजून प्रेमाने एक पोळी त्याला वाढते. त्यात तिचे प्रेम असतं, आनंद असतो. पण हेच आपण स्वयंपाक्याकडे मागितले, तर तो वाढेल; पण त्यात प्रेम असेलच, असे नाही. असे जेवण अंगी लागत नाही. (३) मंदिरात अन्नकोटात आपण जे खातो, तो भगवंतास दाखवलेला प्रसाद असतो. ती भावना प्रसादाची असते. ते अन्न ईश्वराला स्मरण करून शिजवलेले असते म्हणून ते अन्न प्रसाद होते.

**- डॉ. मनोज जोशी, आयुर्वेद तज्ज्ञ. मो. 9822341176**

# गर्भाशयातील गाठी व आयुर्वेदिक उपचार

वंधत्वाला कारणीभूत असणारी आणखी एक मुख्य व्याधी म्हणजेच गर्भाशयात गाठी होणे. यालाच आयुर्वेद शास्त्राने "अबुद" म्हटले आहे. अबूद हा दोषाच्या असंतुलनामुळे होणारी अनावश्यक वाढ असते. गर्भाशयातील अरबुदालाच आजकाल 'फायब्रॉईड 'म्हटले जाते. आधीच्या काळी पन्नासी ओलांडलेल्या बायकांमध्ये फायब्रिडचे प्रमाण वाढताना दिसत होते. आजकाल मात्र वयाच्या बत्तीशी- 35 च्या स्त्रियांनाही फायब्रिडचा त्रास होताना दिसतो. यामध्ये मुख्यत्वे वात दोष असंतुलन व प्रकृती, आहार आचरणानुसार पित्त किंवा कफदोषाचा अनुबंध असू शकतो.

गर्भाशयातील गाठ आकाराने फार मोठी असली, तर गर्भधारणा होणे अशक्य प्राय असते. ही गाठ लहान असल्यास गर्भ राहिला तरी गर्भपात होण्याची शक्यता अधिक असते किंवा गर्भात व्यंग असण्याची शक्यता वाढते. नुसताच गर्भ राहायला हवा म्हणूनच नाहीतर एरवी ही गाठीवर योग्य उपचार करावे लागतात. कारण गर्भाशयात गाठी असलेल्या स्त्रियांमध्ये पाळी लवकर येणे, अति प्रमाणात रक्तस्त्राव होणे, ओटी पोटात जडपणा वाटणे व दुखणे, कंबर दुखणे या सायटिकाचा त्रास होणे, पायात खेचल्यासारखे दुखणे पोट व नितंबाच्या ठिकाणी मेद साठायला सुरुवात होणे, वारंवार मूत्र प्रवृत्ती होणे अधिक त्रास सुरू होतात.

गर्भाशयातील गाठीवर योग्य उपचार झाल्यास एक वेळा गाठ संपूर्णतः नाहीशी होऊ शकते किंवा अनेकदा संकोच पावून बारीकशा स्वरूपात गर्भाशयात राहू शकते. कधी कधी मूळ गाठ कमी करण्यासाठी केल्या जाणाऱ्या उपचाराबरोबरच तातडीचे उपाय म्हणून अति प्रमाणात होणारा रक्तस्त्राव बंद करण्यासाठी ही विशेष उपाय योजवे लागतात. गर्भाशयातील गाठ फार मोठी असल्यास शल्य कर्माची ही आवश्यकता भासू शकते मात्र, त्यातही शक्यतो गर्भाशय न काढता फक्त गर्भाशयातील गाठी व आयुर्वेदिक उपचार वंधत्वाला कारणीभूत असणारी आणखी एक मुख्य व्याधी म्हणजेच गर्भाशयात गाठी होणे. यालाच आयुर्वेद शास्त्राने "अबुद" म्हटले आहे. अबूद हा दोषाच्या असंतुलनामुळे होणारी अनावश्यक वाढ असते. गर्भाशयातील अरबुदालाच आजकाल 'फायब्रॉईड 'म्हटले जाते. आधीच्या काळी पन्नास ची ओलांडलेल्या बायकांमध्ये फायब्रिडचे प्रमाण वाढताना दिसत होते. आजकाल मात्र वयाच्या बत्तीशी- 35 च्या स्त्रियांनाही फायब्रिडा त्रास होताना दिसतो. यामध्ये मुख्यत्वे वात दोष असंतुलन व प्रकृती, आहार आचरणानुसार पित्त किंवा कफदोषाचा अनुबंध असू शकतो. गर्भाशयातील गाठ आकाराने फार मोठी असली, तर गर्भधारणा होणे अशक्य प्राय असते. ही गाठ लहान असल्यास गर्भ राहिला तरी गर्भपात होण्याची शक्यता अधिक असते किंवा गर्भात व्यंग असण्याची शक्यता वाढते.

नुसताच गर्भ राहिला हवा म्हणूनच नाहीतर एरवी ही गाठीवर योग्य उपचार करावे लागतात. कारण गर्भाशयात गाठी असलेल्या स्त्रियांमध्ये पाळी लवकर येणे ,अति प्रमाणात रक्तस्त्राव होणे ,ओटी पोटात जडपणा वाटणे व दुखणे, कंबर दुखणे या सायटिका चा त्रास होणे, पायात खेचल्यासारखे दुखणे पोट व नितंबाच्या ठिकाणी मेद साठायला सुरुवात होणे, वारंवार मूत्र प्रवृत्ती होणे अधिक त्रास सुरू होतात.

गर्भाशयातील गाठीवर योग्य उपचार झाल्यास एक वेळा गाठ संपूर्णतः नाहीशी होऊ शकते किंवा अनेकदा संकोच पावून बारीकशा स्वरूपात गर्भाशयात राहू शकते. कधी कधी मूळ गाठ कमी करण्यासाठी केल्या जाणाऱ्या उपचाराबरोबरच तातडीचे उपाय म्हणून अति प्रमाणात होणारा रक्तस्त्राव बंद करण्यासाठी ही विशेष उपाय योजवे लागतात. गर्भाशयातील गाठ फार मोठी असल्यास शल्य कर्माची ही आवश्यकता भासू शकते मात्र ,त्यातही शक्यतो गर्भाशय न काढता फक्त गाठच काढता येईल यासाठी अधिकाधिक प्रयत्नशील राहावे. एक गोष्ट या ठिकाणी लक्षात घेण्यासारखी आहे, की आजकाल स्त्रियांमध्ये गर्भाशयात गाठी होण्याचे प्रमाण जरी बरेच वाढलेले असले तरी अशा गाठी कॅन्सरच्या असण्याचे प्रमाण त्या मानाने नग्न आहे. त्यामुळे गाठ झाली की ती कॅन्सरचीच असेल, असे समजून घाबरून जाऊन तडका फडकी गर्भाशय काढून टाकण्याचा अविचार निर्णय घेऊ नये .कारण गर्भाशय काढून टाकल्यामुळे हार्मोन्स असंतुलनात भरच पडते; ज्याचे दुष्परिणाम पुढे आयुष्यभर भोगावे लागतात.

गर्भाशय काढून टाकण्याचे स्त्रीची गर्भाशयामुळे असलेले स्त्रीत्व पणाला लागते आणि तिच्या शरीरात पुरुष हार्मोन्स अधिक के व्हाव्यात सुरुवात होते पाळी थांबल्यानंतर असे पुरुष हार्मोन शरीरात वाढत असल्यामुळे आजकाल हार्मोन्स रिप्लेसमेंट थेरपी सारख्या उपयोजना केल्या जातात. मात्र त्याचा दुष्परिणाम ही बराच होत असल्याचे अभ्यासावरून लक्षात आले असल्याचे तसेच काही कारण असल्याशिवाय या थेरपी सरसकट उपयोग केला जात नाही.

गर्भाशय काढून टाकल्यानंतर सहा महिन्यापासून ते दोन वर्षाच्या कालावधीत बहुतांश बायकांमध्ये




एकूण प्रजनन संस्था बिघडल्याने विविध दुष्परिणाम दिसायला लागतात. अगदी कौचित एखादी लाखात एक अशी स्त्री असू शकते की जिला हे दुष्परिणाम जाणवत नाहीत. गर्भाशय काढल्यानंतर बायकांच्या कंबर ,ओटीपोटी नितंबच्या ठिकाणी चरबी साठायला सुरुवात होते, वजन एकाकी आणि अति प्रमाणात वाढते हार्मोन्सचे संतुलन होते, गंभीर स्वरूपाचा संधिवात, किंवा इतर वात रोग एवढेच नाही तर उच्च रक्तदाब, मधुमेह ,हृदयविकार, सारखे ससा बायकांना होणारे व बरे होण्यास दुष्काळ असे रोग होताना दिसतात. एकूण स्त्रियांच्या बाबतीत मुळात असे सगळे विकार होऊच नयेत यासाठी काळजी घ्यायला हवी, तरी काही कारणास्तव अशी विकार झाले तर त्यावर आयुर्वेदिक पद्धतीने उपचार करणे सर्व उत्तम होय. मात्र एवढे सगळे करूनही एखाद्या केस मध्ये परिस्थिती जर गांभीर्य व निकड समजून योग्य पावले उचलावी लागतात. वरील सर्व त्रासाचे आजकालच्या काळात विविध तपासण्या करून चटकन व नेमकी निदान करता येते आणि उपचार लगेच सुरू करता येतात. या सर्वांच्या मुळाशी पूर्वी सांगितल्याप्रमाणे हार्मोन्सचे संतुलन असल्याने ते संतुलन पुन्हा प्रस्थापित करण्यासाठी स्त्रीने काय काय करायला हवे, हे आपण पाहू....गर्भाशयात गाठी होण्याचे प्रमाण जरी बरेच वाढलेले असले तरी अशा गाठी कॅन्सरच्या असण्याचे प्रमाण त्या मानाने नग्न आहे. त्यामुळे गाठ झाली की ती कॅन्सरचीच असेल, असे समजून घाबरून जाऊन तडका फडकी गर्भाशय काढून टाकण्याचा अविचार निर्णय घेऊ नये. कारण गर्भाशय काढून टाकल्यामुळे हार्मोन्स असंतुलनात भरच पडते; ज्याचे दुष्परिणाम पुढे आयुष्यभर भोगावे लागतात.

गर्भाशय काढून टाकण्याचे स्त्रीची गर्भाशयामुळे असलेले स्त्रीत्व पणाला लागते आणि तिच्या शरीरात पुरुष हार्मोन्स अधिक के व्हाव्यात सुरुवात होते पाळी थांबल्यानंतर असे पुरुष हार्मोन शरीरात वाढत असल्यामुळे आजकाल हार्मोन्स रिप्लेसमेंट थेरपी सारख्या उपयोजना केल्या जातात. मात्र त्याचा दुष्परिणाम ही बराच होत असल्याचे अभ्यासावरून लक्षात आले असल्याचे तसेच काही कारण असल्याशिवाय या थेरपी सरसकट उपयोग केला जात नाही. गर्भाशय काढून टाकल्यानंतर सहा महिन्यापासून ते दोन वर्षाच्या कालावधीत बहुतांश बायकांमध्ये एकूण प्रजनन संस्था बिघडल्याने विविध दुष्परिणाम दिसायला लागतात. अगदी क्वचित एखादी लाखात एक अशी स्त्री असू शकते की जिला हे दुष्परिणाम जाणवत नाहीत. गर्भाशय काढल्यानंतर बायकांच्या कंबर, ओटीपोटी नितंबच्या ठिकाणी चरबी साठायला सुरुवात होते, वजन एकाकी आणि अति प्रमाणात वाढते हार्मोन्सचे संतुलन होते, गंभीर स्वरूपाचा संधिवात, किंवा इतर वात रोग एवढेच नाही तर उच्च रक्तदाब, मधुमेह, हृदयविकार, सारखे सहसा बायकांना होणारे व बरे होण्यास दुष्काळ असे रोग होताना दिसतात. एकूण स्त्रियांच्या बाबतीत मुळात असे सगळे विकार होऊच नयेत यासाठी काळजी घ्यायला हवी, तरी काही कारणास्तव अशी विकार झाले तर त्यावर आयुर्वेदिक पद्धतीने उपचार करणे सर्व उत्तम होय. मात्र एवढे सगळे करूनही एखाद्या केस मध्ये परिस्थिती जर गांभीर्य व निकड समजून योग्य पावले उचलावी लागतात.



वरील सर्व त्रासाचे आजकालच्या काळात विविध तपासण्या करून चटकन व नेमकी निदान करता येते आणि उपचार लगेच सुरू करता येतात. या सर्वांच्या मुळाशी पूर्वी सांगितल्याप्रमाणे हार्मोन्सचे संतुलन असल्याने ते संतुलन पुन्हा प्रस्थापित करण्यासाठी स्त्रीने काय काय करायला हवे, हे आपण पाहू....

-क्रमशः

- डॉ. सुचिता सावळे.
मो. 84858 03490

# गर्भधारणेसाठी पंचकर्म...

बीज शुद्धी या संस्कारा अंतर्गत आयुर्वेदिक गर्भसंस्कारामध्ये, आई-बाबा होण्याची इच्छा असणाऱ्या जोडप्याला, किंवा नवीन लग्न झालेल्या जोडप्याला आयुर्वेदिक गर्भसंस्कार मध्ये बीज शुद्धी द्वारे, शरीराचे डिटॉक्सिफिकेशन करण्याचा सल्ला दिला जातो. या बीजशुद्धीमध्ये आयुर्वेदिक पंचकर्म करण्यात येतात. स्त्री आणि पुरुष या दोघांच्या त्रासानुसार, त्यांच्या प्रकृती आणि शरीरयष्टीनुसार पंचकर्मद्वारे उपचार केले जातात, जेणेकरून त्यांचे शरीर शुद्ध व्हावे, शरीरात कुठलेही दोष असू नये, त्यांचे शरीर आणि मन दोन्हीही प्रसन्न व्हावे, म्हणजे लग्नानंतर गर्भधारणा लवकर राहते आणि उत्कृष्ट असा गर्भ वाढीस लागतो. आपल्याकडे आजार झाल्यावर त्याचा इलाज करण्याची प्रथा आहे, किंवा मृत्यूनंतर उपयोगात यावी म्हणून विमा काढण्याची प्रथा आहे. परंतु जिवंतपणी आपण या शरीराची सर्विसिंग करणे किंवा शरीराची काळजी घेणे हिताचे असते ही कुणाला उमगत नाही. आयुर्वेदीय गर्भसंस्कारामध्ये गर्भधारणा राहण्यापूर्वीपासूनच, त्या जोडप्याला सर्व बाबी समजून सांगण्यात येतात, स्वतःच्या शरीराची काळजी कशी घ्यावी इथपासून ते बाळ कसे वाढते- कसे निर्माण होते - नॉर्मल डिलिव्हरी कशी होते - बाळ झाल्यानंतर काय काळजी घ्यावी या सगळ्या गोष्टींची त्यांना कल्पना देण्यात येते. आपल्याकडे बरेचदा असं पाहण्यात येतं लग्न झालेल्या नवीन जोडपे आम्ही प्लॅनिंग करत आहोत असे म्हणतात, आणि नको ती मेडिसिन्स घेऊन पाळणा पुढे ढकलतात, आणि जेव्हा त्यांना बाळ हवं असतं तेव्हा मात्र मग इलाज करत बसतात, हे जणू काय एक चक्रच बनलं आहे, परंतु यामुळे आयु यु आय, आयव्हीएफ, आणि वंध्यत्वाच्या केसेसचे प्रमाण वाढतच चालले आहे, याबरोबरच आजकाल बदलती जीवनशैली, वाढत चाललेले लग्नाचे वय, ओरिएंटेड असणारी जोडपी अशा अनेक बाबी बाळ न राहण्यासाठी उपयुक्त ठरतात. परंतु सायन्स कितीही पुढे गेले तरी निसर्गाच्या विरोधात जाणे योग्य नसते. पाळी लांबवण्याच्या गोळ्या घेऊन किंवा पाळी अलीकडे करण्याच्या गोळ्या घेऊन सुद्धा शरीरावर वाईट परिणाम होतात हे मुळी कुणाला माहीतच नाही, किंवा माहिती असेल तर त्याला कोणी मनावर घेत नाही, यातूनच निर्माण होतात त्या नवीन समस्या. ही तर झाली कारणे, आपण प्रयत्न करूनही काही कारणे आपण दूर करू शकत नाहीत मग यासाठी आयुर्वेदामध्ये एकच उपाय पंचकर्म.. पंचकर्मामध्ये पाच पद्धतीने शरीराचे शोधन केल्या जाते. पाचही कर्म एकाच व्यक्तीमध्ये एकाच वेळी करत नसतात. ही पंचकर्म प्रत्येक व्यक्तीमध्ये वेगवेगळ्या स्वरूपात असतात आणि व्यक्तीचा सखोल अभ्यास करून ती कशी करावी हे वैद्य ठरवतात. पंचकर्मद्वारे स्त्रीबीज आणि पुरुष बीजाची उत्पादन क्षमता आणि कार्यक्षमता वाढीस लागते.




निरोगी आणि परिपूर्ण असे स्त्री बीज आणि पुरुष बीज बनायला लागते. मग आधीच्या लेखांमध्ये ज्याप्रमाणे आपण वर्णन केले आहे. की स्त्रीबीज आणि पुरुष बीज उत्तम संततीसाठीचा मुलाधार आहे, ते जर उत्कृष्ट झाले तर गर्भधारणा लवकर राहील नक्कीच.

पंचकर्म मध्ये पाच कर्मांचा समावेश होतो

1. वमन - वमन अर्थात औषधीच्या उलटींद्वारे पोटाच्या वरच्या भागातील दोष मुखावाटे बाहेर काढल्या जातात.
2. विरेचन - विरेचनामध्ये पोटाच्या खालच्या भागाचे दोष संडास वाटे बाहेर काढल्या जातात.
3. बस्ती - नखापासून ते केसांपर्यंतचे सर्व वातदोष बस्तीद्वारे गुदमार्गावाटे बाहेर काढल्या जातात. ही आयुर्वेदातील पंचकर्म मधील सर्वश्रेष्ठ अशी चिकित्सा आहे.
4. नस्य - ऊर्ध्वगत स्थित कफाचे , आणि थायरॉईड , पिट्युटरी यासारख्या ग्रंथींचे कार्य सुरळीत करण्यात येते,यात नाकावाटे औषधी सोडले जाते.
5. रक्त मोक्षण - रक्त मोक्षणाद्वारे शरीरातील अशुद्ध रक्त विविध पद्धतीने शरीराबाहेर काढल्या जाते जसे की जळू लावणे, कपिंग थेरपी , शिरावेध इत्यादी.

अशाप्रकारे पेशंटच्या हिस्टरीनुसार, किंवा जोडप्याच्या हेरीडीटेरी आजारानुसार करावे हे आयुर्वेदिक तज्ञ ठरवतात. त्यासाठी काही औषधी योजना देखील करण्यात येतात, काही जीवनशैलीमध्ये बदल घडवून आणण्यात येतात, या प्रमुख पाच कर्मांव्यतिरिक्त वेगवेगळे उपक्रम देखील करण्यात येतात, जसे की शांत झोप आणि मनःशांतीसाठी शिरोधारा ही देखील वंध्यत्वामध्ये उपयुक्त अशी चिकित्सा आहे. हे सर्व चिकित्सा करत असताना, पेशंटचे मानसिक स्वास्थ्य जपल्या जाते, ज्यामध्ये सतत कौन्सिलिंग ची गरज असते. जर पेशंट इतर अनेक ठिकाणाहून उपचार घेऊन आला असेल उपचार करून करून थकला असेल, किंवा अगोदर घेतलेल्या उपचाराचे काही साईड इफेक्ट शरीरावर झाले असतील तर आयुर्वेद तज्ञांना अगोदर त्याचीच चिकित्सा करावी लागते. एवढा सखोल अभ्यास केल्यानंतर नैसर्गिक गर्भधारणेसाठी प्रयत्न केल्या जातात. निश्चितच सहा महिने ते एक वर्ष पेशंटला स्वतःच्या चुकीच्या सवयी बदलून उत्तम असे जीवन जगणे शिकवल्या जाते. म्हणून आयुर्वेद शास्त्रामध्ये नैसर्गिकरित्या गर्भधारणा लवकर राहते.




- वैद्या. मंगल सुरेश ताठे
M. D. आयुर्वेद
संचालिका - शाश्वत आयुर्वेद व पंचकर्म चिकत्सालय
पिसादेवी, छत्रपती संभाजीनगर
Associate Professor
CSMSS आयुर्वेद रुग्णालय व महाविद्यालय,
छत्रपती संभाजीनगर
संपर्क - 91681010160

# इस सल्तनत की ताकद जाँबाजी में नहीं, बल्कि धोकेबाजी और जलसाजी में हैं !

## || मंथनाचे पैलू ||





डॉ. धोंडोपंत मानवतकर
संपर्क क्र. 9890827414

लेखांक : १८

कालच 'ताज' या मालिकेतील बादशहा अकबर आणि त्याचा मुलगा सलीम यांचा एक संवाद ऐकला. अकबर बादशहा म्हणतो, "आज तमाम दुनियां मुगलिया ताकद का लोहा माँगती है, क्योंकि तमाम दुनियाँ को मालूम है कि, हमारे जाँबाज किसीभी जंगी ललकार का जवाब देने के लिए काबिलियत रखते हैं ! यावर मुलगा सलीम दरबारात मदिरेचा प्याला घेऊन येत बादशहाला म्हणतो, " बिल्कुल दुरुस्त फरमाया आपने !" "आवो ! आवो! सलीम,... आजभी देर करदी बेटे ?" "मुझे बेटा कहने का हक आप खो चुके हैं जहाँपनाह !" पुढे बोलतांना सलीम म्हणतो, " इसमें कोई शक नहीं कि जिस सल्तनत के आप बादशहा हैं, वो इस दुनिया की, अजिमों शान सल्तनत है ! माफी चाहता हूँ कि आपकी यह बात इत्तेफाक नहीं रखता मैं " इस सल्तनत की ताकद जाँबाजीमें नहीं, बल्कि धोकेबाजी और जलसाजीमें है ! मदिरेच्या नशेतील सलीमचे हे एक वाक्य मला खरे वाटले, आणि ते आजच्या वर्तमानाशी मिळतेजुळतेही वाटले. मराठी भाषेत सांगावयाचे झाल्यास असे की, "या सत्तेची ताकद सत्यात, शौर्यात नसून धोकेबाजपणात आणि खोटेपणाच्या सोहळ्यात आणि जाहिरातीत आहे. ताज मालिकेतील हे वाक्य सलीमच्या तोंडून मी पुन्हा पुन्हा ऐकत होतो. पहिल्या सत्ताधाऱ्यांसोबत धोकेबाजी करून दुसरा सत्ताधारी सत्ता प्रस्थापित करत असतो; ही धोकेबाजी आजही सुरुच आहे मात्र जनतेच्या जीवावर निवडून येणारे आजचे सत्ताधारी जनतेसोबतही धोकेबाजी करत आहेत. जनतेला वेठीस धरून त्यांचे स्वातंत्र्य हिरावून घेत आहेत. धोकेबाजी करून सत्ता हस्तगत करण्याचा डाव हा पूर्वापार चालत आलेला आहे, फक्त त्याचे स्वरूप बदलले आहे. हिंदू-मुस्लिमांबद्दलचे धार्मिक वाद उकरून काढत जनतेत सत्ताधाऱ्यांबद्दल सहानुभूती निर्माण करण्याचा प्रकार चालू असतो. हे चालू असतानाच लोकांचे स्वातंत्र्य हिरावून घेतले जात आहे. बाहेर देशात जाऊन तिथले सोहळे दाखवले जातात. तिकडे जाऊन सांगितले जाते की, आम्ही बुद्धाच्या देशाचे आहोत. बुद्ध म्हणजे दया, क्षमा, शांती, अहिंसा, या गुणाचे प्रतिक आहे. एकीकडे तिथे बुद्धाचा देश सांगायचा आणि पक्षाच्या सत्तेसाठी भारतीय समाजव्यवस्थेत जातीय दंगली घडवून आणायच्या. ही आहे भारतीय राजनीती...जी भारतीय जनतेची सतत दिशाभूल करत असते. लोकांना सतत मुर्ख समजत असते, मुर्ख बनवत असते. आणि लोकांवर राज्य करत असते.


भारतातील मूठभर सत्तापिपासूंनी सत्ता टिकून रहावी म्हणून भांडवलदारांना सोबत घेतलेले आहे. सत्ताधाऱ्यांना भांडवलदार बळ देतात आणि भांडवलदारांना सत्ताधारी संरक्षण देतात. इतकेच नव्हे; तर ह्या सरकारने आता अनेक सरकारी संस्थांचे खाजगीकरण करून ह्या संस्था भांडवलदारांच्या ताब्यात दिल्या आहेत व त्या संस्थेला सर्वतोपरी सहकार्य करण्यासाठी भारत सरकारने आता जनतेच्याच सरकारी नोकऱ्यांवर गंडांतर आणले आहे. जनतेच्या डोळ्यात धूळ फेकून भारतीय राज्यघटनेची पायमल्ली केली जात आहे. लोकशाहीआडून हुकुमशाही सुरू आहे. विरोधी पक्षनेते खाजगीकरणावर काही बोलत नाहीत. कारण त्यांच्याकडेही आडमाप संपत्ती असल्यामुळे त्यांना भीती वाटत आहे. ईडी पाठवून विरोधीपक्ष नेत्यांचीही संपत्ती बॅन केली जाऊ शकते. म्हणून विरोधी पक्षनेते खाजगीकरणावर काहीच बोलत नाहीत. आरक्षणावर बोलत नाही. सरकारच्या विरोधात विरोधी पक्षनेता गेला की, त्याची लगेच चौकशी लावली जाते. म्हणून आता जनतेला कुणीच वाली राहिला नाही.



सत्ताधारी आणि भांडवलदार हे आता चांगले मित्र झाले आहेत. या दोन मित्रांनी संगनमत करून शासकीय नोकऱ्या संपवून टाकल्या व भांडवलदारांना विकलेल्या कंपन्यांवर आता ते खाजगी पद्धतीने नोकर भरती करणार असल्याचे व्हिडिओ व्हायरल झाले आहेत., म्हणजे जाणूनबुजून उघड उघड खाजगीकरणाची जाहिरात केली जात आहे. म्हणजे आता सरकारी नोकऱ्यातील आरक्षण संपले, संपवले. आता सरकारी नोकर नव्हे, तर कामगार निर्माण होणार. सगळीकडे कामगार. ग्रामीण भाषेत मजूरवर्ग. मित्रांनो..! आता नोकरीतील आरक्षणासाठी रस्त्यावर उतरण्याची गरज नाही. लाखोंच्या संख्येने आरक्षणासाठी मोर्चे काढण्याची गरज नाही. आरक्षणासाठी ओबीसींच्या जातिनिहाय जनगणनेची गरज नाही. शासकीय नोकरीसाठी एस्.सी. प्रवर्गातील ५९ जातीचे अ ब क ड वर्गिकरण करण्याची गरज नाही.

महाराष्ट्र राज्यातील शिंदे-फडणवीस सरकारने राज्यातील सरकारी नोकऱ्यांचे खाजगीकरण करण्याचा हा निर्णय प्रशासनावरील खर्च आटोक्यात आणण्यासाठी घेतला असल्याचे सांगितले आहे. ह्या खर्चाचा उपयोग विकास कामासाठी करणार असल्याचेही सांगितले आहे. विकासकाम करणारे सरकार विकास तर नाही परंतु "सबका साथ, सबका हिसाब" करणार आहे. जुन्या पेन्शन योजनेसाठी सरकारी कर्मचाऱ्यांनी संप पुकारलेले होते, ते या योजनेसाठी रस्त्यावर उतरलेले होते. आता शासकीय, निमशासकीय नोकऱ्यांचेही खाजगीकरण होणार आहे. प्रशासनावरील खर्च आटोक्यात ठेवण्यासाठी सरकारने हा निर्णय घेतलेला आहे. यातून वाचणारा पैसा विकास कामासाठी वापरला जाणार आहे म्हणे.! राज्यातील सफाई कामगार, शिपाई अशा चतुर्थ श्रेणीतील कर्मचाऱ्यांचे अगोदरच खाजगीकरण झालेले आहे. हा प्रयोग यशस्वी झाल्यानंतर या धोरणाची व्याप्ती वाढविण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. त्यानुसार शासकीय, निमशासकीय विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था, महामंडळे, सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम तसेच संबंधित कार्यालयातील नोकर भरती ही खाजगीकरणाच्या माध्यमातून केली जाणार आहे. ही खाजगी नोकरभरती सरकारने नेमलेल्या " मनुष्यबळ पुरवठा एजन्सी " मार्फत केली जाणार आहे. या नोकऱ्यामध्ये शिक्षक, अधिक्षक, अभियंता यांचा समावेश असेल. ही बातमी झी-२४ तास या चॅनेलवर प्रसारीत झालेली आहे. सरकारी नोकऱ्यांचे खाजगीकरण करण्याचा सरकारचा हा निर्णय जनतेसोबत धोकेबाजी करणारा आहे. विरोधी पक्षासोबत केलेली धोकेबाजी आपण समजू शकतो; परंतु जनतेसोबत केलेली धोकेबाजी ही राष्ट्रहिताला व देशहिताला घातक आहे. भारतीय राज्यघटनेच्या नियमांना बाजुला सारून हे सरकार मनमानी करत आहे. ही सरकारची मनमानी जनतेच्या हिताची नाही.. आणि ती भविष्यात सरकारच्यासुद्धा हिताची नाही. महाराष्ट्र राज्यातील शिंदे- फडणवीस सरकारचा नोकऱ्यांचे खाजगीकरण करण्याचा हा निर्णय अत्यंत चुकीचा असून या सरकारने सरकारी नोकऱ्यांचे खाजगीकरण करून सर्व प्रवर्गातील गोरगरीब जनतेचे आरक्षण संपवून टाकले आहे.

# राजहंस



मधुकर भावे

आधुनिक केसरी

**२६ मे २०२३ हा दिवस विलासराव देशमुख यांचा जन्मदिवस.... विलासरावांसाठी 'जयंती' किंवा १४ ऑगस्टला 'पुण्यतिथी' हे शब्द उच्चारायलाही जीभ जड होते. ते नाहीत, हे सर्वांना माहीती आहे. त्यामुळे त्यांची 'जयंती' किंवा 'पुण्यतिथी' या दिवशी तर त्यांच्या आठवणीने महाराष्ट्र व्याकूळ होतोच... पण, ते अकाली गेल्याची रुखरूक त्यांच्या जन्मदिनीसुद्धा मनात टोचत राहते. विलासराव असतील... आर. आर. आबा असतील... पतंगराव असतील... गोपीनाथ मुंडे असतील... तिकडे राजेश पायलट असतील किंवा माधवराव शिंदे असतील... जी माणसं या देशाला अनेक वर्षे हवी होती तीच नेमकी परमेश्वरांने उचलून नेली... विलासराव असे व्यक्तीमत्त्व... महाराष्ट्राच्या पुढच्या राजकीय जीवनात असा चेहरा.. असे हास्य...**

तणाव न घेता काम करणारा असा मुख्यमंत्री... सगळंच काही अशक्य कोटीतील वाटते. राजकारणी माणसं प्रत्येक घरात चर्चेचा विषय असतातच असा नाही. घरातील टी. व्ही. चॅनलवर त्यांचे चेहरे पाहिल्यानंतर संपूर्ण कुटुंबाला तो चेहरा पहावासा वाटतोच असे किती नेते असतील...? पण हे ठामपणे सांगता येईल की, असा घराघरात हवाहवासा वाटणारा आणि आनंद देणारा चेहरा विलासरावांचा होता. विलासराव आज असते तर... ७८ वर्षांचे असते... २ वर्षांनी त्यांचा 'सहस्त्रचंद्र दर्शन' सोहळा लातूरमध्ये किती प्रचंड जल्लोषात साजरा झाला असता.... याची कल्पना इथे बसूनही करता येते.... जग निर्माण होवून किती वर्ष झाली.... कोणी मोजली ? पण, प्रत्येक दिवसाची सकाळी कधी पारोशी वाटत नाही... ती प्रसन्नच वाटते... विलासरावांचा चेहरा, विलासरावांचे वागणे, विलासरावांचे भेटणे, विलासरावांचे भाषण आणि त्यांचे टाळी देणेसुद्धा... असे काही प्रसन्न असायचे की, महाराष्ट्राच्या आजच्या राजकारणात तर हाताच्या बोटावर मोजता येतील, एवढीही अशी प्रसन्न, दिलखुलास व्यक्तीमत्त्वे नाहीत. राजकारणाच्या धबडग्यात विलासराव होते... पाठीशी पूर्ण बहुमत नसताना सरकार चालवणारे विलासराव होते. पूर्वीच्या काँग्रेसच्या मुख्यमंत्र्यांच्या मागे विधानसभेत प्रचंड बहुमत होते. १९६७ साली २०२ आणि १९७२ साली २२२ एवढ्या बहसंख्येने सरकार चालवणारा मुख्यमंत्री काहीसा निवांत असेल... पण, विलासरावांना जी तारेवरची कसरत करावी लागली ती विलक्षण होती. बहुमत नसताना सरकार चालवायचे... १९९५ ते १९९९ या काळातील सेना-भाजपा युती सरकारकडून विलासरावांच्या हातात सरकार आले त्या सरकारने ७ हजार ९७२ कोटी रुपयांची तूट करून ठेवली होती. पाठीशी बहुमत नाही... अनेक आव्हाने समोर होती.. १ नोव्हेंबर १९९९ रोजी मुख्यमंत्रीपद स्वीकारलेले... १५ दिवसांत दिवाळी सण.... राज्य कर्मचाऱ्यांची बोनसची मागणी. अशा स्थितीत विलासरावांनी अतिशय स्पष्ट भूमिका घेवून सांगून टाकले की, 'बोनस देणे शक्य नाही... ज्या दिवशी शक्य होईल.... त्या दिवशी तुम्हाला बोलावून मी बोनस देईन... पगार वाटण्यासाठी मी आज इथे बसलेलो नाही... ' विलासरावांच्या मनाचा नितळपणा कर्मचारी- नेत्यांनाही जाणवला.. त्या सर्व काळात विलासरावांनी चालवलेले सरकार... विश्वास प्रस्ताव मंजूर करून दाखवताना पणाला लागलेले त्यांचे कौशल्य.... अशा अनेक विषयांत मनावर कसलाही ताण-तणाव न ठेवता.... विलासराव तुम्ही वावरताना पाहात होतो.

१९९५ च्या निवडणुकीत तुम्हाला घेरून पराभूत करण्यात आले. त्या पराभवानंतरही तुम्ही खचला नाहीत... १९९९ च्या निवडणुकीत महाराष्ट्रात सर्वाधिक मतांच्या फरकाने तुम्ही विजयी झालात... मुख्यमंत्री झालात.... तेव्हा हुरळूनही गेला नाहीत... खचून जाणे किंवा हुरळून जाणे... या दोन्ही मनुष्य स्वभावापेक्षा तोल आणि समतोल पक्षात आणि राजकारणात तुम्ही उत्तम सांभाळलात.... खरं म्हणजे त्यावेळच्या प्रदेशाध्यक्षा प्रभाताई राव आणि निरिक्षक मार्गरेट आल्वा यांचा तुम्हाला राजकीय पाठींबा नसतानाही तुम्ही सगळं निभावून नेलंत... १९८० साली तुम्ही विधानसभेत आलात... पहिल्याच आमदारकीच्या काळात तुम्हाला मंत्रीपद मिळेल, असे वाटले होते... पण बॅ. अंतुलेसाहेबांनी तुम्हाला संधी दिली नाही. तुम्ही नाराज झाला नाहीत... उलट राज्याच्या मुख्यमंत्र्याला लातूरला बोलावून ७ ऑक्टोबर १९८१ ला त्यांचा प्रचंड सत्कार केलात... मंत्रीपद मागितले नाहीत.... मागितले काय.... 'अंतुलेसाहेब, आम्हाला लातुर जिल्हा द्या....' बॅ. अंतुले यांनी एका क्षणात जाहीर करून टाकले, 'दिला...' त्याच अंतुलेसाहेबांनी जालना स्वतंत्र जिल्हा केला... सिंधुदुर्ग जिल्हा जाहीर केला... पण, एकाचवेळी जाहीर झालेल्या या जिल्ह्यात तुम्ही तुमच्या कर्तृत्वाने लातूर जिल्हा कुठे घेवून गेलात... सत्ता कोणाकरिता राबवायची, याचे भान तुम्हाला पूर्णपणे होते... त्यामुळेच आमदार, राज्यमंत्री, मंत्री, मुख्यमंत्री, केंद्रीय मंत्री, या सगळ्या प्रवासात तुमच्या व्यक्तीमत्त्वाची... तुमच्या प्रसन्नपणाची आणि तुमच्या माणुसकीची पाऊले ठळकपणे उमटली... २००७ साली लातूर जिल्हा निर्मितीला २५ वर्ष पूर्ण झाली... विलासरावांनी सात दिवसांचा लातूर जिल्हा महोत्सव केला... उद्घाटनाला त्यांनी आमंत्रित केले.... बॅरिस्टर अंतुले यांना.... बॅ. अंतुले तेव्हा कोणत्याही पदावर नव्हते... विलासराव, आपण त्यांना आमंत्रित करायला गेलो.... त्यांना लातूरला आणण्याची जबाबदारी तुम्ही माझ्यावर दिलीत... केवढा मोठा कार्यक्रम झाला... अंतुलेसाहेब भाषणाला उभे राहिले... 'विलासराव, मी मुख्यमंत्री झालो तेव्हा



तुम्हाला मंत्रिमंडळात घेतले नव्हते.... तुम्ही ते लक्षात ठेवले नाही... लातुर जिल्हा मी तुम्हाला दिला... हे लक्षात ठेवून २५ वर्षांनंतर तुम्ही आज मला सन्मानाने आमंत्रित केलेत... तुम्ही आज मुख्यमंत्री आहात.... पण, राजकारणात २५ दिवस कोणी लक्षात ठेवत नाही.... मी मुख्यमंत्री असताना जिल्हा दिला... ही छोटी गोष्ट होती... तुम्ही २५ वर्षांनी माझी आठवण ठेवलीत.... ही फार मोठी गोष्ट आहे.... तुमचं मन...' आणि पुढचं काही बोलायच्या आगोदर... अंतुलेसाहेबांना अश्रू आवरले नाहीत... व्यासपीठावर तुम्ही... दिलीपराव.. वहिनीसाहेब... आपण सगळेच होतो... सगळ्यांचे डोळे भरून आले... अंतुले साहेबांच्या मोठेपणाइतकाच तुमच्या मनाच्या दिलदारीचेहे त्यात नकळत वर्णन होते.... तुमच्या मनाची... तुमच्या मोठेपणाची... तुमच्या दिलदारीची.. अशी किती उदाहरणे आहेत. त्यामुळे तुम्ही आज नसताना महाराष्ट्र वैराण झाल्यासारखा वाटतो आहे. मैत्रीला तुम्ही किती पक्के.... गोपीनाथराव मुंडे भाजपाचे... तुम्ही त्यांचे विरोधक... पण, तुमचे आणि त्यांचे मैत्र आज महाराष्ट्राला दृष्ट लागल्यासारखे आहे. आजचे द्वेषाचे, सूडाचे... हे राजकारण तुम्हाला पहावलेही नसते... पण, तुम्ही जर आज असतात... तर आज महाराष्ट्रावर ही वेळच आली नसती... .काँग्रेसवर ही वेळ आली नसती... सुशीलकुमार आणि तुमचे मैत्र... अनेक मंत्रिमंडळं मी पाहिली... पण, 'दो हंसो का जोडा....' असं म्हणता येईल, असं मैत्र एका मंत्रिमंडळात आता पुन्हा कधीच होणार नाही... १ जानेवारी २००३ साली तुम्ही सुशीलकुमार शिंदे यांना मुख्यमंत्रीपदाची सूत्र दिलीत... आणि एक वर्ष दहा महिन्यांनी सुशीलकुमारांनी पुन्हा तुम्हाला मुख्यमंत्रीपदाची सूत्रं दिली... हे तुमचे मैत्र महाराष्ट्र कायमचे लक्षात ठेवतो... तेव्हा पतंगराव कदम गंमतीने म्हणाले, 'अरे, आपसात वाटून घेता का काय ?' विलासरावांनी गंमतीने उत्तर दिले... 'पतंगराव, लातूरचा रस्ता सोलापूरहून जातो....' तुमच्या वागण्या-बोलण्यात कटूता कधीच नव्हती... तुमच्या वागण्यात कधी फरक नव्हता... सत्ता मिळाल्यावर अनेकांचे चेहरे बदलतात... स्वभाव बदलतात... मोबाईल नंबर तर रोज बदलतात... आणि नवीन नंबर मिळवून कोणी फोन केला तर लगेच फोन उचचला जाईल, असे फार क्वचित घडते... पण, विलासराव ९८२११२५००० हा तुमचा मोबाईलनंबर कधीही बदलला नाही. तुम्हाला या नंबरवर ज्यांनी-ज्यांनी फोन केला, त्यांचा फोन तुम्ही उचलला नाही, असे कधीच झाले नाही. २५-२६ जुलै २००५ च्या महापुरात दिवस-रात्र तुमच्यासोबत होतो... दोन्ही रात्री आपण जागून काढल्या... आलेला प्रत्येक फोन तुम्ही घेत होतात. दहा किलो गहू.... दहा किलो तांदूळ... दहा लिटर रॉकेल.... एक हजार रुपये रोख किती वणवण फिरून तुम्ही या वस्तुंचे वाटप होतेय, की नाही, याची पाहणी केलीत... त्यावेळचे राष्ट्रपती अब्दुल कलामसाहेब तुम्हाला दूरदर्शनवर पाहात होते.... त्यांनी थेट तुम्हाला फोन केला.... काय म्हणाले, 'मिस्टर चीफ मिनीस्टर... आय एम वॉचिंग यू ऑन टी. व्ही. तुम्ही खूप मेहनत करत आहात.... माझ्याकडून जे काही लागेल ते सांगा....' तुम्ही आभार मानलेत... पूर ओसरून गेल्यानंतर दिल्लीत जावून तुम्ही त्यांचे प्रत्यक्ष भेटून आभार मानलेत.... आज हे सगळे आठवते आहे... तुम्हाला मुख्यमंत्रीपद सोडावे लागले.... शांतपणे तुम्ही वर्षा बंगल्याचा निरोप घेतलात... प्रत्येकाच्या हातात हात मिळवून तुम्ही 'वर्षा' सोडला. राजकारणात प्रत्येक मुख्यमंत्र्याला एक दिवस असा येतच असतो, असे शब्द तुमच्या तोंडून तेव्हा बाहेर आले. आज अनेक गोष्टी आठवतात.... तुमचे पिताश्री दादा लातुरला आजारी झाले... त्यांना हिंदुजा रुग्णालयात तुम्ही दाखल केलेत... दोन तास तिथं बसलात... दादाच तुम्हाला म्हणाले, 'विलासराव, तुम्हाला राज्य सांभाळायचे आहे... माझी काळजी करू नका... तुमच्या कामाला तुम्ही जा... ' त्या दिवशी रुग्णालयातून निघताना तुमचा पाय किती जड झाला होता.... आणि तुमचे डोळे काय सांगत होते, हे सगळं टिपून ठेवले आहे... तुमच्यातला माणूस खूप मोठा होता... तुमच्यातला प्रशासक खूप मोठा होता... तुमच्यातला राजकारणी खूप मोठा होता... तुमच्या जयंतीच्या दिवशी किंवा स्मृतिदिनाच्या दिवशी महराष्ट्रातील अनेकजण अस्वस्थ होतात. तुम्ही आता नाहीत... हे तर खरे... पण विलासराव, खरं सांगू का.... तुमच्या जयंतीदिनी आज मनात एकच गोष्ट येते.... तुम्ही आज नाहीत महाराष्ट्रातच्या राजकारणातील 'राजहंस'च गेला... लातुरची रया गेली.... महाराष्ट्राची रया गेली... ते राजकारणही संपले... राजकारणातला दोस्तानाही संपला.... आणि भलत्याच गोष्टीला महाराष्ट्राला समोर जावे लागत आहे... सारखं वाटतंय, आज तुम्ही हवे होतात... तुमचा वाढदिवस तर जोरातच झाला असता.... पण आजचा हा महाराष्ट्र बघायची वेळच आली नसती...

# कार्यकारी अभियंत्याने विकला कोट्यवधी रुपयांचा मुरूम

## महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जालना जिल्हाध्यक्ष प्रकाश सोळंके

आधुनिक केसरी न्यूज





**जालना :** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जालना जिल्हाध्यक्ष प्रकाश सोळंके यांनी दि.२४ मे रोजी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदनाद्वारे करण्यात आलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, जालना जिल्ह्यातील अनेक पाझर तलावातून जिल्हा जलसंधारण कार्यकारी अभियंता झोरावत यांनी कोट्यावधी रुपयाचा मुरूम विकला, उत्तम उदाहरण म्हणजे परतुर तालुक्यातील माव शिवारातील गट क्रमांक १०३/१०४ या परिसरातील पाझर तलावातून कार्यकारी अभियंता झोरावत कोणताही अर्ज नसताना सई कंट्रक्शन कंपनीला शासकीय मालमत्ता कोट्यावधी रुपयाचा मुरूम विकला म्हणून तत्काळ फौजदारी गुन्हे दाखल करून पुढील कारवाई करण्यात यावी, कारण जिल्ह्यातील अनेक बाजार तलावातून कोणताही अर्ज संबंधित एजन्सीला केलेला नाही परंतु कार्यकारी अभियंता यांनी खाजगी परवानगी देऊन कोट्यावधी रुपयाचा मुरूम विक्री केला, खरंतर जलसंधारण ( लोकल सेक्टर ) पाझर तलाव म्हणजे या डिपारमेंटची प्रॉपर्टी आहे, याचा फायदा घेत कार्यकारी अभियंता श्री झोरावत यांनी मुरूम विक्री करून कोट्यावधी रुपये कमावले, परतुर तालुक्यातील. माव ( पाटोदा ) शिवारातून गट क्रमांक १०३/१०४ या परिसरातील पाझर तलावातून शेकडो ब्रास मुरूम सई कंट्रक्शन कंपनी जालना या कंपनीच्या मालकाने जलसंधारण कार्यकारी अभियंता यांच्याकडून खाजगी मुरूम विकत घेतला कारण सई कंट्रक्शन या कंपनीने अर्ज सुद्धा केलेला नाही, म्हणून यांना कोणत्याही प्रकारची परवानगी घेतलेली नाही, याचा अर्थ कार्यकारी अभियंता यांच्याकडून खाजगी मरून विकत घेतला, म्हणून संबंधित एजन्सीच्या मालकाने या पाझर तलावातून शेवगा ते अंतरवाली फाटा या रस्त्याच्या पूर्ण कामावर हा मुरूम वापरला, राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५८४ माव ते पाटोदा येणारा या रस्त्याच्या कामासाठी पूर्ण मुरूम याच पाझर तलावातून वापरला, माव येनोरा पाटोदा, तसेच शेवगा ते अंतरवाली फाटा, हे दोन रस्ते प्रधानमंत्री ग्रामीण सडक योजनेअंतर्गत करण्यात आले, येनोरा कुंभारी पिंपळगाव २२३ रामा,ते दैठणा फाटा,माव,पांडे पोखरी हा रस्ता सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यालय क्रमांक २ जालना या कार्यालय अंतर्गत होत आहे,या रस्त्याच्या कामावर या पाझर तलावातून चोरी करून मुरूम वापरला, शासकीय मालमत्तेची चोरी केल्याप्रकरणी जिल्हा जलसंधारण ( लोकल सेक्टर ) कार्यकारी अभियंता जालना व सई कंट्रक्शन फौजदारी गुन्हा दाखल केला पाहिजेत, कारण ही मंडळी पैसे कमवायचा हेतू डोळ्यासमोर ठेवून बेकायदेशीर कामे करतात यांना धडा शिकवण्यासाठी कठोर कारवाई होणे गरजेची आहे,करण सई कन्ट्रक्शन कंपनीचे मालक सागर बरदापूरकर यांनी परतुर घनसावंगी तालुक्यातील त्यांना मिळालेल्या कामावर याच पाझर तलावातून जिल्हा जलसंधारण कार्यकारी अभियंता यांच्याकडून मुरूम विकत घेऊन कामावरती वापरला, खास बाब म्हणजे या पाझर तलावातून ज्या ठिकाणाहून मुरुम उत्खनन केला तो पाझर तलावाच्या अगदी भिंतीला खेटून मुरूम खोदकाम केल्यामुळे खालच्या भागात पोकळी निर्माण झाली हा पाझर तलाव केव्हाही फुटून त्या भागातील शेतकऱ्यांचे नुकसान होऊ शकते ? म्हणून असे जर झाले तर त्या शेतकऱ्यांची नुकसान भरपाई कोण देणार संबंधित कॉन्ट्रॅक्टर का कार्यकारी अभियंता, हा खूप गंभीर प्रश्न आहे, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने प्रत्यक्षात पाझर तलावाची पाहणी महसूल विभागामार्फत करण्यात यावी कारण या पाझर तलावातून शेकडो ब्रास मुरूम खोदकाम करून संबंधित गुत्तेदार सागर बरदापूरकर, यांनी कार्यकारी अभियंता जलसंधारण विभाग जालना यांच्याकडून विकास घेतला, म्हणून यांच्यावर लवकरात लवकर कारवाई करण्यात यावी ही महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अपेक्षा आहे. कारण दि,२१ मे २०२३ रोजी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने पाझर तलावाची पाहणी केली असता पाझर तलावाचे नुकसान करून या पाझर तलवातून जिल्हा जलसंधारण कार्यकारी अभियंता श्री झोरावत यांनी मुरूम विकल्यानंतर त्यानंतर दिवसाढवळ्या सई कंट्रक्शन जालना या कंपनीचे तीन ट्रक एक जेसीबी एकूण चार वाहने त्या पाझर तलावातून मुरूम खोदकाम करून चोरी करीत असताना पळून गेले, कारण त्या पाझर तलावाकडे कोणी तरी येत आहे म्हणून त्या परिसरात लोकेशन घेऊन मुरमाची सतर्क राहून चोरी केल्या जाते, हे सगळे वाहने सई कंट्रक्शन कंपनीचे मालक सागर बरदापूरकर यांनी कामावरती लावलेली आहेत, किंवा त्यांच्या मालकीचे सुद्धा असतील पाझर तलावातील खोदकाम करून मुरूम कायदेशीर कार्यकारी अभियंता यांच्याकडून मुरुम विकत घेतला, त्याचे जिओ टॅग फोटो पुरावा म्हणून या पत्रासोबत आपणास देत आहोत. शेवटी असेही पत्रात नमूद केलेले आहे.



# काँग्रेस विरोधात भाजयुमोर्चाचे आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**परतूर :** छत्रपती शिवाजी महाराज हे आमचे आराध्य दैवत असून, काँग्रेस आणि काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांची तुलना आमच्या आराध्य दैवतासी केलेली आम्ही खपवून घेणार नाही असा सज्जड इशारा भारतीय जनता युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष राहुल लोणीकर यांनी दिला. ते परतुर येथे तहसील कार्यालयासमोर काँग्रेस व राहुल गांधी यांच्या विरोधात करण्यात आलेल्या आंदोलना प्रसंगी बोलत होते. पुढे बोलताना ते म्हणाले की, काँग्रेस नेत्यांनी आपली बुद्धी गहाण ठेवली असून आमच्या प्रेरणा आणि ऊर्जा स्त्रोता बाबत अशा प्रकारचे, कृत्य करणाऱ्याना भारतीय जनता युवा मोर्चा माफ करणार नाही, आज आम्ही शांततेच्या मार्गाने आंदोलन करत असून काँग्रेस नेत्यांनी आपल्या जिभेला वेळेत आवर घातला नाही तर त्याचे परिणाम त्यांना भोगावे लागतील असा इशारा यावेळी बोलताना युवा मोर्चा प्रदेशाध्यक्ष राहुल लोणीकर यांनी दिला.

पुढे बोलताना ते म्हणाले की अखंड हिंदुस्तानाचे आराध्य दैवत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांची साधर्म्य व्हिडिओ बनवणाऱ्या मीच प्रवृत्तींना ठेचून काढण्याची हिंमत आमच्या युवकांमध्ये असून यापुढे असले कृत्य खपवून घेणार नाही असेही यावेळी बोलताना त्यांनी सांगितले

दरम्यान युवा मोर्चाच्या कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी करत राहुल गांधींचा पुतळा दहन केला, दरम्यान युवा मोर्चा प्रदेशाध्यक्ष राहुल लोणीकर व कार्य पदाधिकाऱ्यांनी जोरदार घोषणाबाजी करत राहुल गांधी यांच्या पुतळ्याला जोडे मारले यावेळी भाजप ता अध्यक्ष रमेश भापकर, भगवानराव मोरे युवा मोर्चा ता अध्यक्ष शत्रुघ्न कणसे, शहाजी राक्षे, संभाजी वारे सिताराम राठोड बबलू सातपुते आष्टीचे सरपंच मधुकर मोरे, बाबाराव थोरात विठ्ठलराव बिडवे भगवान आरडे, नगरसेवक संदीप बाहेकर कृष्णा आरगडे, सिद्धेश्वर सोळंके, गजानन लोणीकर मारुती थोरात बाळू लहाने, गजानन लिपणे, अनिल चव्हाण, रवी सोळंके बंडू मानवतकर,राजेभाऊ खराबे अनिल चव्हाण सुभाष बागल अरुण खराबे दत्ता खराबे सचिन घाडगे सोनू कुरेवाड उद्धव मोरे गोविंद खरात सुदाम मोरे यांच्यासह शेकडो युवा कार्यकर्त्यांची उपस्थिती होती .

# शॉर्ट सर्किटमुळे आग; दुकाने भस्मसात

## मा.आ. दीपकआबा साळुंखे पाटील यांच्याकडून माणुसकीचे दर्शन

आधुनिक केसरी न्यूज

> संपूर्ण सांगोला तालुका हा आपला परिवार आहे . परिवारातील प्रत्येक सदस्यांची आपण ज्या पद्धतीने काळजी घेतो त्यांच्या सुख-दु :खात सहभागी होतो . त्याच पद्धतीने जवळा येथील आत्तार परिवाराचे अश्रू पुसण्याचा आपण प्रयत्न करत आहोत . हा संस्कार आणि आदर्श आपणास संपूर्ण गावाची मातेप्रमाने काळजी घेणाऱ्या ह .भ .प . स्व . शारदादेवी साळुंखे पाटील ( आई ) यांनी दिला आहे .आपल्या मदतीने एका कुटुंबाचा संसार पुन्हा उभा राहणार असेल तर यासारखे समाधान नाही . **मा . आम . दिपकआबा साळुंखे पाटील**

**सांगोला :** जवळा, ता. सांगोला येथील इनामदार कॉम्प्लेक्समधे बँगल्सचा व्यवसाय चालवून आपला आणि आपल्या परिवाराचा उदरनिर्वाह चालवत असलेल्या शाहरन चांद आत्तार आणि गफुर नदाफ यांच्या स्वीट मार्ट अशा दोन दुकानास अचानक शॉर्ट सर्किटमुळे आग लागल्याने दोन्ही दुकानातील हजारो रुपयांचे साहित्य जळून भस्मसात झाले. जवळा परिसर आणि सांगोला तालुक्यातील प्रत्येक दुःखी आणि पिडीत कुटुंबीयांचे अश्रू पुसण्यासाठी नेहमीच पुढाकार घेणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष माजी आमदार दिपकआबा साळुंखे पाटील यांनी तत्काळ घटनास्थळी भेट देऊन अत्यंत गरिबीतून स्वतःचा व्यवसाय चालवणाऱ्या आत्तार परिवाराला आधार देत त्यांना २५ हजार रुपयांची मदत जाहीर केली. मंगळवार दि २३ रोजी सायं ७.३० वा. अचानक झालेल्या शॉर्ट सर्किटमुळे इनामदार कॉम्प्लेक्समध्ये शाहरन चांद आत्तार यांच्या रेहाना बँगल्स आणि स्टेशनरी तसेच गप्पूर नदाफ यांचे महम्मदीया स्वीट मॉल या दोन दुकानास आग लागली. यामध्ये आत्तार यांच्या दुकानातील बांगड्या आणि अन्य स्टेशनरीचे साहित्य जळून भस्मसात झाल्याने आत्तार परिवाराचे हजारो रुपयांचे नुकसान झाले. तर नदाफ यांचेही या शॉर्ट सर्किटमुळे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. शाहरन चांद आत्तार इनामदार कॉम्प्लेक्समध्ये अनेक वर्षापासून व्यवसाय चालवत होत्या. दरम्यान अचानक दुकानास आग लागून प्रचंड आर्थिक नुकसान झाल्याने आत्तार परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला होता ज्या दुकानावर संपूर्ण परिवाराचा चरितार्थ सुरू होता तेच जळून गेल्याने आता काय करायचे.. ? हा प्रश्न संपूर्ण परिवाराला सतावत होता. याचवेळी नेहमी दुःखी पिडीत लोकांचे अश्रू पुसून त्यांना मदतीचा हात देण्यासाठी पुढे असणारे माजी आमदार दिपकआबा साळुंखे पाटील यांनी बुधवार दि २४ रोजी सकाळी जळालेल्या दोन्ही दुकानाची पाहणी केली आणि आत्तार परिवाराला धीर देत पुन्हा नव्याने व्यवसाय सुरू करण्यासाठी २५ हजार रुपयांची मदत जाहीर केली. यावेळी जमीर बागवान, लतीफ नदाफ, पैगंबर नदाफ, समीर नदाफ, मैनू खलिफा, आफताब ( पप्पू ) इनामदार, सिकंदर ( भाऊसाहेब ) इनामदार, उपसरपंच नवाज खलिफा, गफूर नदाफ, पोलीस पाटील अतुल गयाळी, बाबासाहेब इमडे, इलायत खलिफा, साहिल इनामदार, सचिन सिंदकर, दीपक कांबळे व विकास मागाडे आदीसह मुस्लिम समाजातील बहुसंख्य तरुण उपस्थित होते.

# दैठणा शिवारात गावठी हातभट्टीवर कारवाई

आधुनिक केसरी न्यूज

**परतूर :** तालुक्यातील दैठणा खुर्द शिवारात दैठणा ते खांडवीकडे जाणारे रोडचे बाजुला दैठणा एका शेतातील पत्राचे शेडमध्ये गावठी हातभट्टी दारूची विक्री होत असतांना आष्टी पोलिसांनी छापा मारून एकास पकडून त्यांच्यावर कारवाई केली आहे. दैठणा खुर्द शिवारात दि २३ मे रोजी सायंकाळी साडेदहा वाजेच्या सुमारास अवैधरित्या पत्राचे शेडमध्ये गावठी हातभट्टी दारूची विक्री होत असल्याची माहिती सहाय्यक पोलिस निरीक्षक सोमनाथ नरके यांना मिळाली. तत्काळ सपोनि सोमनाथ नरके, सपोउपनी भीमराव मुंढे, पोना राहुल वाघमारे यांनी सदरील ठिकाणी छापा मारून संशयित रवी मुरलीधर बनसोडे यांच्या ताब्यातून विनापरवाना बेकायदेशीर रित्या प्रोव्हिशन 'गुन्ह्याचा माल आंबट उग्र वास असलेली एक हजार पाचशे रुपये किमतीची गावठी हातभट्टीची तीस लिटर दारु चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने वाहतुक करताना मिळुन आले. या प्रकरणी पोना राहुल वाघमारे यांच्या फिर्यादी वरुण आष्टी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास सपोउपनी भीमराव मुंढे हे करीत आहेत.



# मक्रणपूर ग्रामपंचायत बॉडी, गुत्तेदाराने केली शासनाची फसवणूक

## कठोर कारवाही करणार : जि.प. पाणीपुरवठा उपअभियंता

आधुनिक केसरी न्यूज

> सत्य म्हणजे जल जिवण मिशन योजना सदरील ही गावा बाहेरील वंचित असलेल्या नागरीकांन पर्यत पाणी पोहचवायला हवी हा मुख्य हेतु शासनाचा असुन यात इस्टमेट प्रमाणे काम व्हावे पाईप दर्जेदार वापरावे तसेच पाईपलाईन ही इस्टमेट प्रमाणे लांबी रूंदी असावी परंतु मलीदा खान्यासाठी गावातच पाईपलाईन करुन थातुर मातुन वरच्यावर पाईपलाईन करून बिल काढण्याचा प्रयत्न सुरू आहे . मात्र जिल्हा परीषद पाणी पुरवठा उपअभियंता रमेश कोयलवार यांच्या कडे तत्कार केली असता त्यांनी गावात सत्य काय आहे जाणुन घेण्यासाठी शाहनिशा केली असुन गुत्तेदाराला बिल मिळणार नाही असे म्हणाले .

**कन्नड :** शहरालगत असलेल्या मक्रणपूर गावामध्ये विहीर व पाईल लाईन होती. परंतु विहीर नदिपात्रात असल्याने नागरीकांना दुषीत पाणी मिळत असताना यांचे गांभीर्य लक्षात घेऊन मक्रणपूर ग्रामपंचायतच्या माजी सरपंच जयश्री जाधव, सोसायटी चेअरमन अब्दुल वाहब ग्रामपंचायत सदस्य व प्रतिष्ठीत नागरीक यांनी जिल्हा परीषद सदस्य किशोर पवार यांच्या माध्यमातुन जल स्वराज टप्पा दोन या योजनेतुन सुमारे 4 कोटी 53 लाख रुपयाची योजना मंजुर करून घेतली ती योजना 2019 ते 2020 मध्ये अंबाडी पकल्प येथे नविन विहीर खोदुन संतोष जाधव यांच्या शेतात गावाला पुरेल 2.5 ( अडीच लाख लीटर ) येवढी पाण्याची टाकी बनवुन गावमध्ये प्रत्येकाच्या घरासमारे नळ देऊ स्वच्छ पाणी दिले पाणी आता उन्हाळा असुन सुध्दा मुबलक पाणी आहे तेही स्वच्छ आणि सुंदर आता गावा मध्ये जुनी पाईप लाईन व जल स्वराज टप्पा दोन अश्या दोन जल वाहीन्या असुन पुन्हा 2023 मध्ये गावाबाहेर असनाऱ्या नागरीकांन साठी जलजिवन मिशन अंतर्गत सुमारे 30 लाख रुपये मंजुर झाले असुन या योजनेचे इ निविदा झाली आहे परंतु गावा बाहेर पाण्यापासुन जे लोक वंचित आहे अश्या नागरीकांन साठी केंद्र सरकारने या योजना ग्रामपंचायतला दिली असुन मात्र मक्रणपुर येथील गुत्तेदार व ग्रामपंचायत सरपंच उपसरपंच सदस्य यांनी मलिदा खान्यासाठी गुत्तेदाराशी संगतमत करून टक्केवारीसाठी गावातच या जलवाहीनी केल्याचा आरोप गावातील नागरिक बापू गवळी यांनी केला आहे.

> जल जीवन मिशन योजनेचे काम गुत्तेदार व ग्रामपंचायत बॉडीने संगतमत पाईप लाईनचे काम थातूरमपूर दिसून येत आहे व आम्ही जो प्लॅन दिला आहे त्याप्रमाणे झाले नाही म्हणून आम्ही गुत्तेदाराला कामाचे देयक अदा करणार नाही .
> **रमेश कोयलवार**, जि . प . पाणी पुरवठा उपअभियंता

> मक्रणपुर या गावा मध्ये जल जिवन योजनेचे काम अतिषय निष्कृष्ट दर्जेचे झाले असुन गुत्तेदार तसेच ग्रामपंचायत सरपंच उपसरपंच ग्रामपंचायत सदस्य यांनी शासनाची फसवणुक केली म्हणुन यांच्यावर कठोर कारवाही करावी . **बापु गवळी, ग्रामस्थ**

> गावातील नागरिकांच्या हितासाठी काही ठिकाणी गावात पाईपलाईन टाकली काही ठिकानी गावाबाहेर आवश्यक त्या ठिकाणी पाईप लाईन केली आहे सर्व काम इस्टीमेट प्रमाणे झाले आहे विरोधक बोलतच असतात . **सना शेख अस्लम, सरपंच मक्रणपूर**



# सासवड मुन्सिपल कामगार क्रेडिट सोसायटीच्या निवडी जाहीर

## विकास राठोड अध्यक्षपदी, सुमीत साबळे उपाध्यक्षपदी

आधुनिक केसरी न्यूज

**लोणंद :** पुरंदर तालुक्यातील सासवड नगरपरिषदेच्या अंतर्गत सासवड मुन्सिपल कामगार क्रेडिट सोसायटीच्या निवडी जाहीर करण्यात आलेल्या असून विकास राठोड यांची अध्यक्षपदी तर सुमीत साबळे यांची उपाध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली आहे. ही निवड प्रक्रिया निवडणूक निर्णय अधिकारी श्रीमती. एस. एन. देसाई यांनी पार पडली.मोहन चव्हाण व राजेंद्र निरगुडे यांनी अध्यक्ष व उपाध्यक्षपदाचा राजीनामा दिल्याने दोन्ही जागा रिक्त झाल्या होत्या. यारिक्त जागांसाठी निवडणूक घेण्यात आली. यावेळी विकास राठोड आणि सुमीत साबळे या दोघांचेच अनुक्रमे अध्यक्ष, उपाध्यक्षपदासाठी एकमेव अर्ज आले होते.त्यामुळे दोघांची बिनविरोध निवड करण्यात आली. या निवडीनंतर सासवड नगरपालिकेचे मुख्याधिकारी निखील मोरे यांनी अध्यक्ष विकास राठोड आणि उपाध्यक्ष सुमीत साबळे यांचे अभिनंदन केले. संचालक मंडळामध्ये मोहन चव्हाण, सोपान जगताप, काळूराम भोंडे, सविता जगताप, ज्ञानेश्वर जगताप, राजेंद्र टिळेकर, राजेंद्र बोरावके, राजेंद्र निरगुडे, धनराज जाधव, आशा रणपिसे, संगीता जाधव, प्रमोद भोंडे, राजेंद्र रणपिसे, सचिव तुकाराम जगताप आदींचा समावेश आहे. कामगार म्हणून जनतेच्या सेवेसाठी आम्ही कायम तत्पर आहोत तसेच सर्व कामगारांच्या न्याय हक्कांसाठी लढत राहू. कामगारांच्या ज्या काही मागण्या येतील त्या पूर्ण करण्यासाठी प्रयत्नशील राहणार आहोत. कामगारांच्या चांगल्या जीवनासाठी चांगल्याप्रकारे त्यांना सोई सुविधा मिळवून देण्यासाठी,तसेच सुरक्षितता मिळवून देण्यासाठी सुद्धा संघर्ष करणार असल्याचे अध्यक्ष विकास राठोड व उपाध्यक्ष सुमीत साबळे यांनी म्हटलेले आहे. जो विश्वास दाखवून आम्हाला कामगारांच्या दृष्टीने काम करण्याची संधी मिळवून दिली आहे.त्या विश्वासास कोणताही तडा न जाऊ देता काम करणार आहोत.सर्वासोबत मिळून मिसळून राहून कामगारांसाठी जबाबदारीपूर्वक काम केले जाईल, असा विश्वास ही व्यक्त करण्यात आला.

# लायन्स क्लबच्या अध्यक्षपदी डॉ. धर्मवीर भारती यांची फेरनिवड

## लायन्स क्लब ऑफ लातूर सिटीची नूतन कार्यकारिणी जाहीर

आधुनिक केसरी न्यूज



**लातूर :** लायन्स क्लब ही सामाजिक संस्था जागतिक स्तरावर काम करणारी संस्था आहे. साधारण 210 देशात सध्याच्या स्थितीत लायन्यचे काम चालू आहे, लायन्स क्लबच्या कामाचा विस्तार लक्षात घेता क्लबच्या विविध विंग आहेत. डॉ. धर्मवीर भारती यांचे अध्यक्ष पदावरील उल्लेखनीय सामाजिक काम लक्षात घेता 2023-24 या वर्षाकरीता लायन्स क्लब ऑफ लातूर सिटीच्या अध्यक्षपदी सामाजिक कार्येकर्ते तथा प्रसिध्द बांधकाम व्यावसायिक डॉ. धर्मवीर भारती यांची फेरनिवड करण्यात आली आहे. या संदर्भातील एक बैठक नुकतीच संपन्न झाली या मध्ये नुतन कार्यकरणी जाहीर करण्यात आली. यामध्ये सचिव नागनाग गित्ते, उपाध्यक्ष ॲड. संगप्पा परमा, अनिल झंवर, कोषाध्यक्ष ॲड.योगेश शिंदे, तर जनसंपर्क प्रमुख म्हणून अनिल पुरी यांची निवड करण्यात आली. यावेळी लायन्स क्लबचे राजेश मित्तल.जगदिश डेड्डा, व्यंकट ठणके, बस्वराज मंगरुळे, सुहास पाचेगावकर,मनोज देशमुख लक्ष्मीकांत कालीया आदीची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.




# देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण समाज मंडळातर्फे सर्व शाखीय उपनयन संस्कार सोहळा

आधुनिक केसरी न्यूज



**छत्रपती संभाजीनगर :** दे . ऋग्वेदी ब्राह्मण मंडळातर्फे भव्यदिव्य सर्व शाखीय सामुहिक उपनयन संस्कार कुलस्वामिनी मंगल कार्यालयात ( सिडको ) येथे निविघ्न पार पडला छत्रपती संभाजीनगर मध्ये एवढ्या मोठ्या प्रमाणात उपनयन संस्कार झाला मंडळाचे हे दुसरे वर्ष आहे संभाजीनगर नगर सोबत बाहेर गावाहून पण बरेच बटुं उपनयन संस्कारसाठी उपस्थित होते मंडळाच्या या उपक्रमात १५०० जण उपस्थित होते प्रत्येकाने मंडळाच्या या उपक्रमात सहभागी झाले व मंडळाचे आभार मानले. कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ६ वाजल्यापासून झाली सुरुवात ही पुण्यवाचन चौलविधी ने झाली त्या नंतर मातृभोजन मंगलाष्टके होमहवन भिक्षावळ इत्यादी सर्व विधी अत्यंत मंगलमय वातावरणात व आनंदात श्री मंदार कुलकर्णी व त्यांचे सहकारी यांच्या उपस्थितीत मंत्रोच्चारात पार पडला. बंटु व त्यांच्या १७०० लोकाची जेवणाची व्यवस्था ही मंडळानी व्यवथीत सुरेख पार पडली या वेळी मंडळचे अध्यक्ष नरेश जोशी, उपाध्यक्ष रवी जेहुरकर, सचिव अनंत कुलकर्णी, सहसचिव अमोल पांडव, कोषाध्यक्ष अंबादास कुलकर्णी, श्रीपाद मुगुटे, प्रशांत दाभाडकर, नरेश पटवर्धन, गोपाल कुलकर्णी, वैभव देशपांडे, देशमुख, दभडगावकर महिला पदाधिकारी श्रीमती मोनिका चौधरी, मयुरी दाभाडकर, उत्कर्षा पारनेरकर, सिमा कस्तुरे, योगिनी देशमुख, विभा देशपांडे, योगिता पुराणिक, कल्पना जोशी, संध्या मुगुटे, कल्पना कुळकर्णी, जयश्री अकोलकर, रुपाली कुलकर्णी या सर्वांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.



# ॲड. के.के. मुळे यांचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**धाराशिव :** बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र आणि गोवा वकील परिषद दि. 5मे रोजी धाराशिव येथे झाली. यात वैजापूर शहर जिल्हा न्यायालय अधिवक्ता मंडळातील ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. के.के. मुळे यांचा सर्वोच्च न्यायालयातील सन्माननीय न्यायाधीश श्री भूषण रामकृष्ण गवई यांच्या हस्ते ज्येष्ठ विधिज्ञ दीपस्तंभ म्हणून विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी मा. न्यायाधीश भूषण रामकृष्ण गवईजी म्हणाले की, ॲड. के.के.मुळे यांनी गेली 58 वर्ष विधीज्ञ म्हणून अविरत सेवा केली आहे. म्हणून आज त्यांना गौरविण्यात येत आहे. पुढे सर्वोच्च न्यायमूर्ती म्हणाले की, नवीन विधिज्ञांना ते एक आदर्श वकील म्हणून आपल्या व्यवसायात नेहमीच त्यांचे गुण घ्यावेत. यावेळी न्यायाधीशासह सर्व विधीज्ञ मंडळी उपस्थित होती.



# दै.आधुनिक केसरीचा दणका; बसविले नवीन रोहित्र

## पंधरा दिवसांपूर्वी जळाले होते रोहित्र; ग्रामस्थांनी मानले महावितरणचे आभार

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** नांदातांडा येथून जवळच असलेल्या नादांगाव येथील रोहित्र गेल्या पंधरा दिवसा पासून जाळल्यामुळे गावठाण गेल्या पंधरा दिवसा पासून ग्रामस्थाना उकाड्याचा त्रास सहन करावा लागत होता. परंतु दैनिक आधुनिक केसरी मधे बातमी दि.२१ मे रोजी प्रसिद्ध होताच सावळदबारा महावितरण झोपेतून खडबडून जागे झाले आणि तात्काळ उपकार्यकारी अभियंता निरज बिदे सोयगाव यांनी बातमीची दखल घेऊन नवीन राहित्र बसवून गावठाण चालू करून दिले त्यामुळे समस्त ग्रामस्थांनी सावळदबारा महावितरण कार्यालयाचे आभार मानले. नाहीतर उष्णतेने जिव्हाची लाही लाही होत होती आणि गावात विद्यूत पुरवठा बंद असल्यामुळे गावातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर झाला होता. ग्रामस्थांनी दिला होता इशारा कि येत्या एक दोन दिवसात जर नादांगाव येथील रोहित्र आला नाही तर छत्रपती संभाजीनगर येथील जिल्हाअधिकारी यांच्या कार्यालय समोर तीव्र आंदोलन करण्यात येईल अशा ईशारा येथील गुरुप ग्रामपंचायतचे सरपंच मोरसिंग चव्हाण व ग्रामस्थ रवींद्र पाटील, ईश्वर राजपूत, नरेंद्र पाटील, मनोहर राजपूत, जुलालसिंग राजपूत, नितिन पाटील, प्रविण पाटील, महेंद्रसिगं राजपूत, राजेंद्र पाटील, योगेश राजपूत व कृष्णा पाटील व गावातील ग्रामस्थाच्या वतीने देण्यात आला होता.

आमच्या महावितरण कंपनी कडून थोडा उशीर झाला होता कारण आम्ही नवीन रोहित्र आणून बसवून त्यामध्ये आईल शुद्धा टाकण्यात आले होते परंतु रोहित्र पुन्हा फालटी निघाले परत ते रोहित्र वापस करून नवीन रोहित्र आणून बसवून दिले आहे .यामुळे सावळदबारा चार ते पाच दिवस त्यांनी लखलखत्या उन्हात परिश्रम घेतले परंतु आता नांदागावचा विज पुरवठा सुरळीत चालू आहे . **निरज बिदे, उपकार्यकारी अभियंता सोयगाव**

# शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथे मंजूर पदे भरण्याची प्रक्रिया सुरू

## राजेंद्र दाते पाटील यांच्या मागणीची वैद्यकीय शिक्षण विभागाने घेतली दखल

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथे मंजुर डॉक्टर-नर्स यांची पदे, सुपरस्पेशालिटीची पदे अँजिओप्लास्टी व इतर महत्वपुर्ण ऑपरेशन होणे कामी तात्काळ भरण्याचे आदेश निर्गमीत झालेले आहेत. तशा जाहिराती माध्यमांनी प्रसिध्द केल्या आहेत, अशी माहिती वैद्यकीय शिक्षण विभागाच्या वरिष्ठ सुत्रांनी दिली.

पीपल्स फोरम फॉर सोशल कॉजचे सचिव शहर विकासाचे जेष्ठ अभ्यासक राजेंद्र दाते पाटील यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली त्यानंतर मुख्यमंत्र्यांनी हा प्रस्ताव वैद्यकीय शिक्षण मंत्रालयाकडे पाठवला. त्यावर वैद्यकीय शिक्षण विभागाने तातडीने निर्णय घेतल्याचे सूत्रांनी सांगितले. या विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन मुख्यमंत्र्यांनी सदरचा प्रस्ताव पुढील कारवाई साठी वैद्यकीय शिक्षण विभागाच्या अव्वरसचिव अश्विनी जोशी यांचे कडे पाठविला होता. या बाबत सविस्तपणे निवेदनात नमूद केले आहे की, छत्रपती संवाजीनगर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथे मंजूर डॉक्टर नर्स यांची पदे,सुपरस्पेशालिटीची पदे अँजिओप्लास्टी व इतर महत्वपुर्ण ऑपरेशन होणेसाठी सदरची पदे भरणे रुग्ण संख्या वाढीमुळे अत्यावश्यक झाले आहे या बाबत तपशीलवार बाब अशी आहे की, सुपरस्पेशालिटीची १५० कोटींची इमारत १३ जून २०२० रोजी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालयाच्या ( घाटीच्या दवाखाना ) ताब्यात आल्यानंतर कोरोना रुग्णांवर उपचार करण्यात आले. त्यानंतर राज्य सरकारने ८ जानेवारी २०२१ रोजी डॉक्टर, नर्सची २१९ पदे पहिल्या टप्प्यात भरण्यास मंजुरी दिलीअसताना देखील अद्याप पदभरती झाली नसल्यामुळे गोरगरीब रुग्णांना अतिशय गंभीर परिस्थितीला सामोरे जावे लागत आहे. आवश्यक ती मंजूर पदभरती नसल्यामुळे अतिविशेष उपचार या रुग्णालयात शस्त्रक्रिया होत नाही. राज्य प्रशासनाच्या नाकर्तेपणामुळे रुग्णांना खासगी रुग्णालयात जावून महागडे उपचार घ्यावे लागत आहे. केंद्र सरकारने औरंगाबाद, लातूर, अकोला, यवतमाळ येथे सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल सुरू केले आहेत. त्यासाठी सर्व यंत्रसामग्रीही दिली आहे मात्र, पद भरतीमुळे सर्वच सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलसमोर अडचणी निर्माण झाल्या आहेत. सुपरस्पेशालिटी मध्ये आठ विशेष उपचाराचे विभाग आहेत. नर्सची ८१ पदे मंजूर असून केवळ एकच भरले आहे. डॉक्टरांअभावी ऑपरेशन करता येत नाही. सध्या ओपीडी, एमआरआय, डायलिसिस सुविधा अत्यंत धीम्या गतीने सुरू आहे आणि विशेष बाब म्हणजे हृदयरोग विभागात डॉक्टर आहेत, मात्र इतर महत्वाचे कर्मचारी वर्ग ज्यात नर्स नसल्यामुळे अँजिओप्लास्टी होत नाही. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचा पीपीपीला विरोध होता. तत्कालीन वैद्यकीय शिक्षणमंत्री अमित देशमुख यांनी सुपरस्पेशलिटी च्या पीपीपी मॉडेलची घोषणा केली होती. तेव्हा तत्कालीन विरोधी पक्षनेते म्हणून देवेंद्र फडणवीस यांनी विरोध केला होता. नवे सरकार आल्यानंतर मुख्यमंत्र्यांनी पीपीपी मॉडेल रद्द केल्याचे छत्रपती संभाजीनगर ( औरंगाबाद ) मध्ये पहिल्याच पत्रकार परिषदेत स्पष्ट केलेले होते. त्यानंतर सुपर स्पेशालिटीची पदे भरली नसल्यामुळे ऑपरेशन पूर्ण क्षमतेने उपचार होत नाहीत. परिस्थितीचे गांभीर्य आणि वाढती रूग्ण संख्या पाहता अति तत्काळ औरंगाबाद शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथे मंजुर डॉक्टर-नर्स यांची पदे, सुपर स्पेशालिटीची पदे अँजिओप्लास्टी व इतर महत्वपूर्ण ऑपरेशन होणे कामी भरण्याचे अति तात्काळ आदेश जनहितार्थ निर्गमीत व्हावेत अशी जनहितार्थ मागणी पीपल्स फोरम फॉर सोशल कॉजचे सचिव शहर विकासाचे जेष्ठ अभ्यासक राजेंद्र दाते पाटील यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली होती.त्याची गंभीर दखल शासनाने घेतली.



# सोयगाव तालुक्यात पर्यावरण जीवनपद्धती अभियानांतर्गत विशेष सप्ताहनिमित्त कार्यशाळा

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यात पर्यावरण पूरक जीवन पद्धती अभियान अंतर्गत विशेष सप्ताह निमित्त तालुकस्तरीय कार्यशाळा संपन्न करण्यात आली.

मा. पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी Life-style for Environment Mission ( पर्यावरण पूरक जीवन पद्धती अभियान ) यांची घोषणा केली हवामान बदलाच्या दुष्परिणामांची तीव्रता कमी करण्यासाठी प्रत्येकाने आपले योगदान द्यावे हे या अभियानाचे प्रमुख उद्दिष्टय आहे. त्यानुसार सदरील अभियांनाचा सप्ताह संपूर्ण महाराष्ट्रात दिनांक २२ मे २०२३ ते २८ मे २०२३ या कालावधीत आयोजित करण्यात आला आहे यात प्रामुख्याने हवामान बदल व त्यावर मात करण्यासाठी जिल्हास्तरीय कार्यशाळा दिनांक २२ मे २०२३ रोजी आयोजित करण्यात आली होती. दिनांक २३ मे २०२३ रोजी राज्यस्तरीय ऑनलाइन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. दिनांक २४ मे २०२३ रोजी कृषि क्षेत्रातील सर्व अधिकारी कर्मचारी यांची कार्यशाळा तालुकास्तरावर आयोजित करण्यात आली आहे. दिनांक २५ मे २०२३ रोजी महिला मेळावा आयोजित करण्याच्या सूचना आहेत. दिनांक २६ मे २०२३ रोजी क्षेत्रीय भेटी कार्यक्रमाचे आयोजन करावयाचे नियोजन आहे. दिनांक २७ मे २०२३ रोजी क्षेत्रीय किसान गोष्टी कार्यक्रम आयोजन करावयाचे नियोजित आहे व दिनांक २८ मे २०२३ रोजी सप्ताहाचा समारोप जिल्हास्तरावर कृषि विज्ञान केंद्र येथे कार्यक्रम घेऊन करावयाचे नियोजित आहे.

त्यानुसार आज दिनांक २४ मे २०२३ रोजी क्षेत्रीय कर्मचारी व प्रगतिशील शेतकरी यांची तालुकास्तरीय कार्यशाळा तालुका कृषि अधिकारी कार्यालय सोयगाव येथे आयोजित करण्यात आली होती यात प्रामुख्याने कार्यक्रमाची प्रस्तावना आर. जी. गुंडिले तालुका कृषि अधिकारी सोयगांव यांनी केली. बी. बी. एफ व शून्य मशागत तंत्रज्ञान याविषयी माहिती एम. पी. सैदाणे कृषि अधिकारी सोयगांव यांनी दिली. मूलस्थानी जलसंधारण व सूक्ष्म सिंचन याविषयीची माहिती के. पी. महाजन कृषि पर्यवेक्षक यांनी दिली. संरक्षित शेती शेडनेट व पॉलीहाऊस यांची माहिती ए. जे. पाटील कृषि पर्यवेक्षक यांनी दिली. बिजाप्रक्रिया व सद्य स्थितीत वापरवायचे वाण याविषयीची माहिती ए. एस. महाजन तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक यांनी दिली. पिकांच्या विशिष्ट वाणांचा वापर याविषयी माहिती एच. बी. देशमुख कृषि पर्यवेक्षक यांनी दिली. आजच्या कार्यक्रमास प्रगतिशील शेतकरी यांची उपस्थिती होती.

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका

(रविवारी मोफत तपासणी)

डॉ. शेख ए.एच.
या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार

किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही
सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118
www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर